# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL. 5 AKOLA :—SATURDAY EVENING— AUGUST, 6 1870 NO 32

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख ६ माहे आगष्ट सन १८७० इ॰. अंक ३२

### विनती

आमच्या पत्राचे टाइप बरेच झिजले त्यामुळे पूर्ववत वर्तमानपत्र चांगलें छापलें जात नाहीं हें आमचे प्रिय वाचकांस कळविण्यास आम्हांस फार दिलगिरी वाटते व ती उणीव काढून टाकण्याची आम्ही तजवीज योजिली आहे; म्हणजे मुंबईस नवे टाइप मागविले आहेत व ते सुमार एक महिन्याचे आंत एथें येऊन दाखल होतील, तोंपर्यंत मात्र वर्गणीदारांनीं संभाळून घेण्याची कृपा करावी.

वऱ्हाड समाचाराचे मालक

## तांब्याचें खोटें नाणें.

नाणें हें व्यापाराच्या सोईकरितां आहे. व व्यापार हा पतीचा आहे, त्यांत दगलबाजी होऊं लागली म्हणजे लोकांचें मोठें नुकसान होतें. हल्लीं नागपुरचलनी खोटे पैसे वऱ्हाडांतील कित्येक व्यापाऱ्याकडे मिळाल्यावरून मोठी धरपकड झाली आहे. व हजारो रुपयांचे खोटे पैसे पकडले आहेत. ह्याविषयीं नागपुरच्या सेंट्रल प्राव्हिन्स ग्याझेटांत ता. २३ माहे जुलईची पुरवणी निघाली आहे व तींत तपशिलवार मजकूर लिहिला आहे. त्यांतील तात्पर्य:—

थोड्या आठवड्यामागें कमटीचे पोलिस इन्स्पेक्टरास अशा नाण्याचा संशय आल्यावरून त्यांनीं हरदजन, चिंगामल, कालुराम, व हरदेव यांच्या दुकानचा झाडा घेतला तो शेकडो रुपयांचे खोटे पैसे सांपडले. व हरदजन यानें सांगितलें कीं माझा बापाचीं दुकानें वऱ्हाडांत खामगावास व अकोल्यास आहेत तेथून हें नाणें मी आणिलें. खामगावच्या दुकानचें नाव शिवबक्ष हरदजन आणि अकोल्याच्या दुकानचें नाव भिवराज हरदजन आहे. त्यावरून नागपुरचे पोली सु॰नीं आकोल्याचे पो॰ सुप॰ यांस तारायंत्रांतून वर्तमान कळविलें. त्यांनीं दोन्ही ठिकाणीं पकडापकडी करून बहुत नाणें धरलें. उमरावतीचे गणेशदास कुंजबिहारी यांनीं कालसा प्रेमनाथ नागपुरवाले यांजकडे या खुर्द्याच्या पाच पेट्या आगगाडींतून रवाना केल्या होत्या व त्याचा भाव चालविला आहे असें नागपुरवाल्यास कळतांच त्यांनीं त्या परत पाठविल्या. व नागपुर पोलिसचे बातमी वरून उमरावती पोलिसानें त्या बडनेरास पकडल्या त्यांत सुमारें ७००० रुपयांचा खुर्दा होता व गणेशदासचे मुनिम रघुनाथ व खुशालचंद दुकानचे मुनिम द्वारकाप्रसाद यांस कैद केलें तेव्हां असें समजलें कीं आणखी सुमारें ७००० रुपयांचें नाणें या पूर्वींच विल्हेवारीस लागलें आहे. गणेशदास कुंजबिहारी हा झांशी परगण्यांत माव म्हणून गाव आहे तेथें राहत असतो व तेथें असें नाणें तयार करून जवळ पुरवा त्याचा भरती टेकचंद मिसरी याचे मार्फतीनें तो वऱ्हाडांत पाठविलो असा शोध लागला. नंतर दुसरी तेथीलच आणखीं तीन सावकार पकडले आहेत व त्यांनी एथील गुरसामल गणेशदास नावाच्या व्यापाऱ्याकडून अकोल्यास व खामगावास हें खोटें नाणें येत असतें असा शोध लागला परंतु बेदानी हा गाव कोठें आहे त्याचा बरोबर पत्ता नाहीं. जयपुर, अलवार, अथवा ल्होटक यांत तो गाव असावा असा संशयावरून त्या संस्थानांस खबर दिली. खामगांवास व अकोल्यासही हा खुर्दा ५००० रुपयांचा पकडला आहे हा खुर्दा लोकांमध्यें पसरल्यास सुमारें च्यार महिने झाले. नागपुरच्या जुन्या पैशापक्षां याची धातु वाईट आहे. नागपुरचा हा खुर्दा पाडण्याचा कारखाना पुष्कळ वर्षांपासून बंद आहे आणि हे कार पैसे एकदम [?]र पडले त्यावरून संशय आला. अकोल्याच्या पोलिस सुपरिंटेंडेंटानीं शोध करितां यांस पत्ता लागला कीं जयपुरसंस्थानांत लाहार म्हणून एक गाव आहे तेथें हें खोटें नाणें तयार होतें आणि गुरुसामल याचे मार्फतीनें वऱ्हाडांत व नागपुराकडे जातें. कैद केलेल्या लोकांजवळ पत्रें सांपडलीं त्यावरून असें कळतें कीं वऱ्हाडांत हें नाणें येऊं लागल्यास बारा महिने झाले. लाहारच्या नवाबाजवळ कित्येक टंकशाळ आहेत व त्या बंद होत्या. हल्लीं वऱ्हाडांतून हा नाण्याचा मामला तिकडेस गल्यावरून तिकडून हें नाणें तयार होऊन आलें. जबलपुराहून १७४ मण तांब्याचें खोटें नाणें वऱ्हाडांत व नागपुराकडेस आलें आहे. झांशी परगण्यांत माव एथें झाडे घेत असतां कुंजबिहारीचा मुलगा काशीराम याजवळ नागपुराहून गेलेलें ता॰ २९ जूनचें एक पत्र सांपडलें त्यांत असें लिहिलें होतें कीं पोलिस कामदार झाडे घेणार आहेत, तुम्ही सावध रहा, इकडे पुष्कळ खुर्दा पकडला व लोक कैद केले आहेत या साठीं तुमचे आपला बचाव होईल तें करा. माव एथें दुसऱ्याही कित्येक दुकानांचे झाडे घेतले त्यांत अशीं आणखीं कित्येक पत्रें सांपडलीं व सुकू तिवारी याचे एथें खुर्दा पाडण्याचे हतोडे व दुसरीं त्या कामाचीं हत्यारें व अर्धे तयार झालेले १९ मण नाणें व १२ मण तांब्याचा कास सांपडला.

या प्रमाणें ही तांब्याच्या खोट्या नाण्याची हकीकत आहे व आणखी पुढें काय होतें तो पाहू.

## कोल्हापुरकर महाराजांचा विलायतेंतल प्रवास.

कोल्हापुरचे महाराज गेल्या मे महिन्याच्या २२ वे तारखेस मुंबईहून निघून विलायतेस गेले ते जून महिन्याच्या १८ वे तारखेस लंडन एथें आगगाडींतून जाऊन पोंचले म्हणून आम्ही मागील अंकांत लिहिलें होतें. आतां महाराजांविषयीं कांहीं अधिक वर्तमान कळण्यांत आलें आहे तें आम्हीं आज आमच्या वाचणारांस सादर करितों. शिकंदर्या एथून महाराज ज्या आगबोटींत बसून पुढें गेले ती आगबोट समुद्राच्या अखातांत गेली तेव्हां वादळ झालें, परंतु तथून मार्सेल्स शहर दिसूं लागलें म्हणून कांहीं भीति वाटली नाहीं. महाराज संध्याकाळचे ५ वाजतां आगबोटीवरून उतरले, आणि सुमारें २४ तास मार्सेल्स शहरीं राहून दुसरे दिवशीं आगगाडींत बसून पारिस एथें गेले. तेथें पोंचल्यावर कप्तान वेस्ट हे महाराजांस एका मोठ्या प्रसिद्ध हॉटेलांत घेऊन गेले आणि त्यांनीं तेथें सर्व सोई करून दिली. पारिस एथें महाराज सारे दोन दिवस होते तितक्या अवधींत त्यांणीं त्या शहरांत जितकें पहातां आलें तितकें पाहून घेतलें. तेथें एका प्रसिद्ध फोटोग्राफरानें त्यांची तसबीरही काढली. नंतर ते लंडनास गेले तों सर बार्टल फ्रियर आणि इन्डिया हौस एथील पोलिटिकल सेक्रेटरी मि. के हे स्टेशनावर सामोरे आले होते, ते एक उत्कृष्ठ घर हैडपार्क याजवळ घेऊन ठेविलें होतें तेथें लागलेच महाराजांस घेऊन गेले. तेथें सर्व यथास्थित तजवीज केली होती. महाराज लंडनांत गेल्यापासून एकसारखे बाहेर जात येत आहेत. १६ वे जून रोजीं रात्रौ सर रॉबर्ट मान्टगॉमरी यांच्या एथें महाराजांस बोलाविलें होतें तथें दुसरीही मंडळी आली होती. त्या समयीं महाराजांचें इंग्लिश भाषेचें ज्ञान व शिष्टाचार पाहून संतोष झाला. दुसरे दिवशीं महाराज इंडिया हौस एथें गेले तेथें त्यांची आणि आर्गाइलचे डयूक व मिस्तर ग्रांट डफ यांची भेट झाली. तिसरे तारखेस महाराज लेडी फ्रियर यांच्या भेटीस गेले. २१ वे तारखेस रात्रीं बकिंघम नामक राजवाड्यांत मोठा सरकारी बॉल (नाच) झाला त्यास महाराज गेले होते, तेथें यांची आणि युवराज प्रिन्स आफ् वेल्स व यांची पत्नी यांची मुलाखत झाली. तेसमयीं राजकन्येची थोरपणाची व विनयाची चाल पाहून महाराज फार संतुष्ट झाले. २५ तारखेस महाराज ऑक्सफर्ड युनिवर्सिटीचा मोठा समारंभ झाला त्यास गेले होते. तेथें त्यांचा चांगला आदर सत्कार झाला, आणि तेथील विद्यार्थ्यांनीं यांच्या नावानें त्रिवार जयजयकार केला. नंतर डाक्तर आकलंड नामक विद्यागुरूनें सर्व विद्यामंदिर महाराजांस बरोबर नेऊन दाखविलें. त्यादिवशीं ते परत लंडनास येत तंव रात्रीस साडे दहा वाजले. दुसरे दिवशीं महाराज प्रथम पार्लमेन्ट सभेंत आणि नंतर सर्व भूमंडळावर तारायंत्र चालू झालें तदानंदप्रदर्शक मोठा समारंभ मिस्तर पेन्डर यांच्या एथें झाला त्यास गेले होते. श्रीमंत महाराणी साहेब हल्लीं वुइन्सर राजवाड्यांत राहतात तेथें महाराज २४ वे तारखेस सकाळीं फराळास जावयाचे होते, आणि अर्थात महाराणी सा॰ची मुलाखत व्हावयाची होती. २९ वे तारखेस क्रिस्तल पॅलस एथील पुष्पप्रदर्शन पहाण्यांत घालवावयाचा बेत होता

याप्रमाणें विलायतेंत महाराजांचें कालक्रमण होत आहे. महाराजांसमागमें कप्तान वेस्ट असतात. विलायतेंत जें जें मनास बोध करणारें व मन विशाळ करणारें आहे तें तें महाराज लक्षपूर्वक पाहून घेत आहेत. त्यांची ज्ञानसंपादनाविषयीं उत्सुकता, इंग्रजी भाषेचें ज्ञान, साधारण माहिती, सुस्वभाव, आणि शिष्टाचाररीतें हीं पाहून तेथील लोकांचा त्यांविषयीं फार चांगला ग्रह होत आहे. हें सर्व आमच्या देशास मोठें सुचिन्ह आहे. परमेश्वराच्या कृपेनें असाच क्रम चालावा, आणि राजाराम छत्रपति संपूर्ण महाराष्ट्र राज्यकर्त्यांमध्यें कुळानें व मानानें आहेत त्याप्रमाणें विद्येनें व गुणांनीं शिरोमणी व्हावे हो आमची इच्छा आहे.

हिं॰रि॰

## स्टांपाविषयीं नियम

गुदस्त सालीं जो जनरल स्टांप आक्ट झाला आहे तो वऱ्हाडांत अमलांत आणण्याचे कामीं मेहेरबान रोसिडेंट साहिब यांनीं कांहीं नियम करून हिंदुस्थान सरकारचे परवानगीनें प्रसिद्ध केले आहेत. त्यांची एक प्रत एथील अधिकाऱ्याकडून आम्हांस मिळाली आहे तिचें भाषांतर वाचकांकरितां आम्हीं एथें घेतों. सपटंबर महिन्याचे पहिले तारखेपासून हे नियम अमलांत येतील.

१ —ह्या नियमांच्या कारणासाठीं स्टांपाचे दोन वर्ग केले आहेत.

वर्ग पहिला—सन १८६९ चे जनरल स्टांप आक्टांत सांगितलेले सर्व प्रकारचे चिकटणारे स्टांप.

वर्ग दुसरा—सन १८६९ चे जनरल स्टांप आक्टांत सांगितलेले इतर प्रकारचे दुसरे स्टांप.

२ —पहिल्या वर्गांतील स्टांप पाहिजे त्या मनुष्यानें विकावे दुसरे वर्गांतील स्टांप सरकारी वेंडरांनें व लैसेन्स घेतलेले वेंडरांनें ह्या नियमाप्रमाणें विकावे.

३ —ठिक ठिकाणचे सरकार ज्या सरकारी नौकरास नेमील ते सरकारी वेंडर होतील.

डेपोटी कमिशनर अथवा लैसेन्स देण्याविषयीं ज्या अंमलदारांस ठिकठिकाणचें सरकार अधिकार देईल तो अंमलदार ज्या मनुष्यास लैसेन्स देईल ते लैसन्सवेंडर होतील.

४ ठिकठिकाणचे सरकार ज्याप्रकारचे स्टांप विकण्या विषयीं हुकूम करील त्या प्रकारचे स्टांप सरकारी वेंडरानें विकावे लैसेन्स वेंडरानें आपले लैसन्सांत सांगितलेले स्टांप विकावे.

५ प्रत्येक लैसेन्स जा हुद्देदारानें दिला असेल साच्या हुकुमानें पाहिजे तेव्हां परत घेतला जाईल.

प्रत्येक लैसेन्सांत लैसेन्स घेणाराचें नांव, लैसन्सा अन्वयें कोणत्या प्रकारचे स्टांप विकावे याचें वर्णन, विकरी करण्याचें ठिकाण, आणि दुसऱ्या ज्या गोष्टी लिहिण्याची जरूर असेल त्या गोष्टी, यांचा तपशील असावा व लैसेन्स देणाऱ्या अंमलदाराची सही असावी.

६ नियम ८ ह्यांत अनुसरून कोणी स्टांप वेंडर सरकारापासून रोख पैसा हजर करून जिल्ह्याचे सदर स्टेशनाचे जागीं अगर पोटतुकडीचे जागीं एका वेळीं २५ रुपयांचे किंवा २५ रुपयांहून ज्यास्त किंमतीचे दुसऱ्या वर्गाचे स्टांप घेईल तर स्टांपाच्या किंमतीवर दरशेकडा ३ रुपये प्रमाणें डिसकौंट मिळेल व जिल्ह्याच्या इतर प्रदेशात घेईल तर ४ रुपये प्रमाणें दरशेंकडा डिसकौंट मिळेल.

७ नियम ८ ह्यास अनुसरून कोणी मनुष्य सरकारांत रोख पैसा भरून पहिले वर्गाचे स्टांप घेईल तर त्यास खालीं लिहिलेल्या रकमापेक्षां ज्यास्त डिसकौंट मिळणार नाहीं.

आठ आण्याच्या आतील किंमतीचे स्टांप प्रत्येक वेळीं ५ रुपयांचे किंवा त्याहून ज्यास्त रुपयांचे घेईल तेव्हां दरशेंकडा डिसकौंट ६८४

आठ आणे किंमतीपेक्षा ज्यास्त व पांच रुपयांचे आंतील दराचे स्टांप २० रुपयांचे घेईल तर दरशेंकडा डिसकौंट ४

पांच रुपयांहून ज्यास्त व ५० रुपयांचे आंतील दराचे स्टांप कितीही रकमेपर्यंत घेतले तर शेंकडा डिसकौंट २

८ रुपये ५० पेक्षां ज्यास्त किंमतीचे दराचे स्टांपास अगर स्टांप विकत घेणारानें छापण्याकरितां आपल्या पदरचे कागद हजर केले असतां त्यावर डिसकौंट मिळणार नाहीं.

९ सरकारी स्टांप विकणारा शिवाय दुसरे वेंडरास उधार स्टांप मिळणार नाहींत स्टांप पदरीं घालण्यापूर्वीं रोख पैसा घेतला जाईल.

१० प्रत्येक लैसेन्स वेंडरानें आपल्या विक्रीकरण्याच्या जागीं लोकांच्या दृष्टीस पडे अशा ठिकाणीं एक फळी लावावी व त्या फळीवर इंग्रजींत व देशभाषेंत "स्टांप वेंडरचें दुकान" असें लिहावें. त्यानें विकरीचे जागीं स्टांपाच्या संबंधीं कायदे कौन्सलनें केलेले आक्ट व परिशिष्टें टांगून ठेवावीं याचप्रमाणें या नियमांच्या इंग्रजींत व देशभाषेंत प्रती टांगून ठेवाव्या.

११ लैसेन्सवेंडरास शिवाय इतरास स्टांप द्यावयाचे त्यावर सरकारी वेंडरानें व लैसेन्स वेंडरानें जे स्टांप विकले त्यावर ते स्टांप दुसऱ्या वर्गांतील असतील तर विकरीची तारीख, विकत घेणाराचें नांव व राहण्याचें ठिकाण अक्षरी किंमत व रीतीप्रमाणें आपली सही करावी. व त्याच वेळीं खालीं लिहिल्याप्रमाणें ठरलेल्या रजिस्टरांत त्याची नोंदणी करावी.

| | |
|---|---|
| तारीख. | |
| स्टांपाचें वर्णन. | |
| स्टांपाची किंमत | |
| विकत घेणाराचें नांव. | |
| विकत घेणाराचें राहण्याचें ठिकाण. | |

जे स्टांप विकतील त्या विषयींची नोंदणी कोणीही वेंडरानें जाणून बुजून खोटी करूनये.

१२ विकरीकरितां जे स्टांप वेंडरापाशीं शिल्लक असतील ते घेण्याकरितां कोणी मनुष्य जिल्ह्याचे डिपुटि कमिशनराकडे जें चलन चालतें तें चलन हजर करील तर मागण्या बरोबर त्यास स्टांप दिले पाहिजेत.

१३ ज्या स्टांपाचा उपयोग योग्य अधिकाऱ्यानें मना केला आहे ते व ज्या विषयीं लैसेन्सावरून परवानगी नाहीं ते स्टांप कोणी वेंडरानें विकूनयेत.

१४ नियम ११ ह्यांत जें रजिस्टर सांगितलें आहे तें बरोबर ठेविलें आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां जिल्ह्याच्या डिपुटि कमिशनरानें, अथवा इलाक्याच्या सरकारानें ज्यास अधिकार दिला असेल त्या अंमलदारानें मागितलें असतां दिले पाहिजे.

१५ प्रत्येक स्टांप वेंडरापाशीं स्टांप शिल्लक राहिले असतील ते जिल्ह्याचे डेपुटि कमिशनरानें अथवा इलाक्याचे सरकारी अधिकाऱ्यानीं मागितले असतां परत दिले पाहिजेत. व त्याबद्दल पैसा भरला असेल तर डिसकौंट वजा करून पैसा दिला जाईल.

१६ जनरल स्टांपआक्टाच्या ४९ वे कलमाप्रमाणें जे सरटिफिकेट पाहिजे आहे याचा नमुना ठिक ठिकाणचे सरकारानें ठरवून द्यावा व त्या नमुन्याप्रमाणें अंमलदारांनीं ठिक ठिकाणचे सरकारानें दिलेले अधिकाराप्रमाणें सरटिफिकिटें द्यावीं.

(हुकुमावरून)
डब्ल्यू. टवुडी. मेयर.
आ. क. अ. रेसिडेंट.

## नवीन चमत्कारिक आगगाडी.

अमेरिकन लोक जितके चमत्कारिक शोध करतात व जितक्या चमत्कारिक युक्ती काढतात तितक्या दुसऱ्या कोणत्याहि देशांतील लोक क्वचित काढीत असतील. अलिकडेस त्यानीं पासिफिक रेलवेच्या रस्त्यावर एक नवी गाडी चालू केली आहे तिला "ट्रान्स कान्टिनेन्टल एक्सकर्शन ट्रेन" किंवा "पुलमन हॉटेल एक्स्प्रेस" किंवा "प्यालेस ट्रेन" असें म्हणतात. तिचें वर्णन लंडन टैम्स पत्रांत केलें आहे. याचें अक्षरशः भाषांतर करतां येईल असें नाहीं, तरी यांतील मुख्य हकीकत वाचकांस सादर करतों.

या प्रकारची गाडी करावी म्हणून बऱ्याच दिवसांपासून विचार चालला होता. तिजविषयींची सूचना प्रथम गेल्या आक्टोबरांत बॉस्टन एथील "बोर्ड आफ ट्रेड" नामें मंडळीस केली होती, पण गेल्या मे महिन्यापर्यंत याविषयीं कांहीं केलें नाहीं. त्या महिन्याच्या २३ व्या तारखेस १२५ मनुष्यें बॉस्टन एथून पासिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील सानफ्रान्सिस्को शहरची सहल करण्याकरितां निघाली. याच्या अगोदर यानीं या प्रकारच्या गाड्या करण्यास सांगितलें होतें आणि तेव्हां पासून ४० दिवसांत सर्व गाड्या तयार झाल्या. त्यांस एकंदर १,७५,००० डालर म्हणजे ३,५०,००० रुपये खर्च लागला, त्या करणाराचें नांव पुलमन साहेब.

शनवार ता० २१ माहे मजकूर रोजीं ह्या लोकांच्या कारकीत गाड्या बॉस्टन येथें येऊन दाखल झाल्या. तेव्हां शेंकडो हजारों लोक त्या पाहण्यास आले. यांस त्या पाहून जसा आनंद झाला तसा पूर्वी कधीं झाला नसेल. सोमवार ता० २३ रोजीं प्रातःकाळीं सहल करावयास जाणारी मंडळी निघाली. तेव्हां ५,००० लोक जमा झाले होते, यांनीं मोठा आनंदघोष केला. गाड्यामध्यें मंडळी येणें प्रमाणें होती;— ६८ साहेब, ४० मडमा व १७ मुलें. हे साहेब सदरील बोर्ड आफ ट्रेड मंडळीचे सभासद असून कोणी मोठाले व्यापारी, कोणी मोठाले सरकारी हुद्देदार व दुसरे श्रीमान व संभावित गृहस्थ होते, व यांत एक उपदेशकही होता.

या गाडीस आठ गाड्या जोडलेल्या होत्या. त्या इतक्या सुंदर व टुमदार आहेत कीं, अमेरिकेंत सुद्धां तशा पूर्वी कधीं झाल्या नव्हत्या. यांचीं नांवें व वर्णन येणें प्रमाणें (१) "बग्गेज कार" म्हणजे बोजाची गाडी. तिच्यांत बोजे वगैरे टेवितात. तिच्यांच आंत बर्फ ठेवण्याचीं कढतालें किंवा कपाटें ५ आहेत, आणि फळें व दुसरे खाण्याचे पदार्थ थंड ठेवण्याचें एक यंत्र आहे. (२) "स्मोकिंग कार" म्हणजे तंबाखू ओढण्याची गाडी. इच्यांत निरनिराळ्या कोठड्या आहेत; एक चुटा ओढण्याची, एक वैन वगैरे पिण्याची असून यांत गंजिफा इ० खेळण्याकरितां टेबलही आहे. एक केंस विंचरण्याची व श्मश्रु करण्याची, आणि एका कोठडींत छापखाना आहे. तेथें सर्व प्रकारच्या टैपाच्या केसी (पेट्या) आहेत या आघातरीं धावणाऱ्या छापखान्यांत छापण्याचें काम फार सुरेख होतें, व दररोज एक वर्तमानपत्र निघतें! [३] "वाशिंगटन कार" व [४] "रिवियर कार" ह्या वोचखान्याच्या गाड्या आहेत. त्यांत स्वयंपाक घर, चुली, चिनीचीं भांडीं ठेवण्याची जागा, जेवण्याचें घर व निजण्याचें घर आहे. यांतून ज्या कोठडींत ज्या प्रकारचें सामान असलें पाहिजे त्या प्रकारचें सामान आहे. निजण्याच्या कोठडींत महाजाजातील तक्त्याच्या बिछान्याप्रमाणें एकावर एक बिछाने वगैरे आहेत. (५) "सेंट चार्लस" व [६] "लेट क्लौड" ह्या मोदिखान्याच्या म्हणजे कोठीच्या गाड्या आहेत. यांतहि स्वयंपाक खोली, जेवणघर, व निजण्याची खोली आहे. (७) "पालमेरा" व (८) "मार्केट" या दोन दिवाणखान्यांच्या गाड्या आहेत. यांत सुंदर उंच गालिचे, पडदे, मेजें, खुरच्या, पेट्या वगैरे उत्कृष्ट प्रकारचें सामान आहे. तेथेंच दोन पुस्तकसंग्रह आहेत यांत इतिहास, काव्यें, कादंबऱ्या आदिकरून अनेक प्रकारचे निवडक ग्रंथ पुष्कळ आहेत. याचप्रमाणें उत्तम प्रकारचे दोन वाजे आहेत.

रात्रीं उजेडाकरितां दरोबस्त गाड्यामध्यें ग्यासाचे (धुराचे) दिवे लावतात! हा ग्यास हायड्रो कार्बोन नामें पदार्थापासून उत्पन्न करतात, व तो करण्याची भट्टी किंवा यंत्र व कारखाना गाडीवरच असून याच्या नळ्या सर्व गाड्यांत नेल्या आहेत; आणि अशी कांहीं चमत्कारिक योजना केली आहे कीं, दिव्याच्या तोट्या उघडून पेटविल्या ह्मणजे ग्यास उत्पन्न होण्याचें काम चालू व्हावें, व दिवे विझवून तोट्या बंद केल्या ह्मणजे ग्यास होण्याचेंही बंद व्हावें!

या गाडीवर दररोज जें वर्तमानपत्र निघत असतें म्हणून वर लिहिलें आहे या विषयीं कांहीं विशेष सांगितलें पाहिजे. या पत्राचें नाव या गाडीच्या नांवावरून "ट्रान्स कान्टिनेन्टल" (महाद्वीपावर भ्रमण करणारा)" असें ठेवलें आहे. यांत तारेनें येणाऱ्या देशोदेशींच्या ताज्या बातम्या, चालू विषयांवर निबंध, दुसऱ्या पत्रांतील उतारे, जाहिराती, व चित्रेंही असतात. तें या गाडीवरच छापतात, मग गाडी बॉस्टन व सानफ्रान्सिस्को याच्या दरम्यान कोणत्याहि ठिकाणीं असो; जमीनीवर कधीं छापित नाहींत. याच्या पहिल्या पुस्तकाचा पहिला अंक ता० २४ मे सन १८७० रोजीं नायगारानदीच्या धबधब्यापाशीं छापला. त्याच्या शिरोभागीं आगगाडीचें चित्र आहे. तिला चार सुंदर गाड्या जोडल्या असून ती उजाड रानांतून भयानक पर्वताकडे भरधाव चालली आहे; आणि वाटेवर एक रानटी इंडियन एका खडकावर बसून आश्चर्यचकित होऊन तिच्याकडे पहात आहे, असें दर्शविलें आहे. दुसऱ्या पृष्ठावर आनेरबल अलेकझांडर रैस, बोर्ड आफ ट्रेडचे अध्यक्ष, यांची तसबीर व हकीकत आहे. पुढें तारेच्या बातम्यांचे दोन कालम आहेत, त्यांत पारिस, माद्रिद, वायना, लंडन वगैरे ठिकाणच्या आदल्या दिवशीं आलेल्या खबरी, व लंडन टैम्स पत्रांतील उतारे आहेत. शेवटच्या पृष्ठावर त्या गाडीची खबर, म्हणजे तिच्यांत किती उतारू आहेत वगैरे माहिती आहे.

या गाड्या राजमंदिराप्रमाणें सुंदर व रमणीय आहेत म्हणून यांस "प्यालेस ट्रेन" असें नांव दिलें आहे. या फार जलद म्हणजे दर तासास २० पासून ३० कोस, २४ मिनिटांत २३ मैल इतक्या

रंगानें चालवितात, आणि त्या आटलांटिक महासागराच्या तटाका पासून तर पासिफिक महासागराच्या तटाकापर्यंत म्हणजे अमेरिकेच्या संपूर्ण महाद्वीपावर फिरणार म्हणून त्यांस "ट्रान्स कान्टिनेन्टल एक्सप्रेस ट्रेन" म्हणतात.

तिच्यावर कालक्रमण व मनोरंजन, सुख व आनंद होण्याचीं उत्कृष्ट साधनें आहेत. एका गाडींतून दुसरींत याप्रमाणें सर्व गाड्यांत फिरतां येतें; खाणें, पिणें उत्तम; राहण्याची, बसण्याची व निजण्याची सोय उत्तम; ग्रंथ वर्तमानपत्रें वगैरे वाचण्याची, व एकत्र बसून गोष्टी मारता सांगण्याची, पाहिजे असेल तर सभा करून भाषणें किंवा उपदेश करण्याची सोय उत्तम; रात्रीं उत्तम प्रकारच्या दिव्यांचा प्रकाश असून गाणें वाजविणें वगैरे करण्याची सोय उत्तम; नायका, मुलें इष्ट मित्र बरोबर घेण्याची व स्नान वगैरे करण्याची सोय उत्तम आहे. आपल्या देशात आपल्या घरीं राहून जें सुख भोगण्यास कित्येक श्रीमंतांस सुद्धा मिळत नाहीं तें या गाडींत बसून अटव्य भरण्यांत देखील मिळतें, हा विद्येचा किंवा ईश्वरानें परम दयेनें मनुष्यास जी बुद्धि दिली आहे तिचा केवढा प्रताप प्रकाश करण्याचीं अशीं साधनें असल्यावर त्यापासून लोकांस देशांची माहिती व अनेक गोष्टींचें ज्ञान याचा किती लाभ होईल! याप्रमाणें या देशांत व दुसऱ्याही देशांत होईल तर बरें होईल. ज्ञा.द.

## वऱ्हाड

निजाम सरकार ने हल्ली गादीवर आहेत त्यांचे चुलते नवाब रोशनउद्दवला साहब गेले महिन्याचे २७ वे तारखेस मरण पावले असें वाईट वर्तमान आलें आहे.

निजाम सरकारानें आपले राज्यांत आलीकडे बिगारी मनुष्य, बैल गाड्या, घोडीं वगैरे घेतल्यास त्यास काय मजुरी द्यावी याविषयीं नियम छापून प्रसिध्ध केले आहेत व ते अमान्य करणारास मोठी शिक्षा मिळेल असेंही त्यांत लिहिलें आहे

मे. दस्तुर वाहिमनजी नामासली सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते आफिशियेटिंग फर्स्टक्लास असिस्टंट कमिशनर ता.४ जून पासून झाले व त्याच तारखेपासून त्यांचे बंधु मे. रतनजी नामासली आफिशियेटिंग फर्स्ट क्लास होते ते सेकंड क्लास झाले. व मे. थामसन सेकंडचे थर्ड क्लास झाले असें हिंदु. सरकारचे या आठवड्याचे ग्याझेटावरून कळतें.

मि० त्रिंबकराव यशवंत तहशिलदार आपले गांवीं राजुरास गेले आहेत व त्यांचे बंधू मि० गोविंदराव अकोटचे तहशिलदारही १५ दिवसांची रजा घेऊन घरीं गेले आहेत. यांचे वडील बंधू मरण पावले असें कळतें.

वाशिमचे तिसरे प्रतीचे तहशिलदार रा. रा. भास्कर राव व्यंकटेश यांस दुसरे प्रतीचे तहशिलदार केलें. यांच्या कोणत्या मोठ्या उत्कृष्ट गुणावरून यांस बढती मिळाली ठाऊक नाहीं. यांचे गुण, वर्तन वगैरे विषयीं आम्हाकडे एक खाव कबक पत्र आलें आहे त्याच्या खरेपणाचा शोध लावून आम्ही लवकरच आमि षयीं कांहीं लिहिणार आहों. वास्तू, अकोल्याचे तहशिलदार मि. गोविंदराव अण्णा हे भास्कर रावा पेक्षां बढतीस पात्र होते असें आमचें मत आहे. यांचें काम काज, स्वभाव, व इंग्लिश भाषेचें ज्ञान अधिकाऱ्यांनीं मनावर घेण्या जोगें आहे.

बुलढाण्याकडून आमच्या बातमीदाराचें पत्र आजच्या डाकेपर्यंत आलें नाहीं. ऐकीव बातमी दाजी नारायण वकील व दुसरे दोन इसम यांजवर खुनाचा चार्ज(?) ठेवून चौकशी सुरू झाल्याची कळतें. मि. सेलकाल पोलिस इन्स्पेक्टर यांजवर ही त्या खुनाच्या संबंधानें खटला चालु आहे.

यवतमाळचे तहशिलदार रा. रा. भास्कर महेश्वर यांस दारव्हास नेमून तेथील रा. रा. अंबादास अंतो यांस यवतमाळास नेमिल्याचें ऐकतों.

### अकोला

असें ऐकण्यांत आलें आहे कीं, मे० ल्यायल साहेब कमिशनर विलायतेस रजेवर जाणार आहेत

मे० स्त्रेटल सा० डिपुटि कन्सरवेटर आफ फारेस्ट यांची स्वारी एथें आली आहे.

डिपुटी कमिशनर साहेबांनीं येथील नदीवरील नाव वरचेवर बुडून लोकांस इजा होऊं लागल्या वरून त्यांनीं एक जाहिरनामा प्रसिद्ध केला आहे कीं दहा मनुष्यांहून अधिक लोक नावेंत बसवू नयेत—पावआणा उतार घ्यावा. टपालचे व पोलिसचे शिपाई सरकारी कामाकरितां जातील तर त्यांपासून कांहीं घेऊंनये. कचेरीस येण्याच्या व जाण्याच्या वेळेस सरकारी नोकर लोकांस दुसर लोकांचे आधीं नावेंतून न्यावें. नदीचे दोन्ही बाजूस एकेक कानस्टेबल रहावा. व त्यानें यानियमाप्रमाणें अमल होतो किंवा नाहीं तें पहावें. नियम मोडणारास शिक्षा मिळेल.

येथील डिपुटि एजुकेशनल इन्स्पेक्टरचे शिरस्तेदार रा.यशवंत गोविंद यांनीं राजिनामा दिला व त्यांचे जागीं रा.सखाराम गोविंद हुंडिवाले यांस नेमिलें

आम्हांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं रा. रा. माधवराव हरि सहस्रबुद्धे डिपुटि कमिशनरचे क्लार्क आफ धि कोर्ट यांस आमच पुत्ररत्न झालें

## वर्तमानसार

इंदुरास नदीच्या पाण्यानें नुकतेंच जें नुकसान झालें त्याचा आकार आठ लक्षांचा झाला आहे, व मनुष्यें सुमार ४० मेलीं

रा. रा. खंडेराव विश्वासराव रास्ते यांचें नाव सेकंड क्लास सरदारांत दाखल झालें.

कपुरथळ्याचे व पतियाळचे राजे विलायतेस जाणार अशी बातमी होती ती खोटी ठरली. कपुरथळवाल्याच्या दोघी बहिणी मात्र आपले मातोश्रीसह विलायतेस विद्याभ्यास करण्यास गेल्या.

हिंदुस्थानांत पईचें नाणें आहे तें सरकार काढून टाकणार असें वर्तमान आहे. त्याचा फारसा उपयोग पडत नाहीं व व्यापारी वगैरे बरोबर दरानें तें नाणें पुष्कळसें घेत नाहींत हें बंद करण्याचे मुख्यकारण आहे

चंद्रपुरचें हायस्कूल शेवटीं बंद झालें. व रा० रा० गोविंद रामचंद्र भागवत तेथील हेडमास्तर यांस नगरचे हायस्कुलावर कायम नेमून रत्नागिरी हायस्कुलावर अकटिंग हेडमास्तर नेमिलें. व चंद्रपुरचे असिस्टंट मास्तर रा० यशवंत आनंदराव उदास यांस कामाठीस नेमिलें.

### लढाई.

या आठवड्यांत लढाईकडील आलेल्या बातम्या:—फ्रान्स देशांत लढाईचे संबंधानें नवीन खर्च आला म्हणून चहावर व काफीवर कर बसविले.—पारिस शहरांतील गल्ल्या व किल्ले यांची डागडुजी केली.—रोम शहरांतून फ्रेंच फौज लढाई करितां पायवाट निघाली—फ्रेंच आरमार म्हणजे पाण्यांतील फौज दक्षिणेकडे चालली आहे—फ्रेंच बादशहा व त्याचा पुत्र लढाईचे जागीं आले—प्रशियाचा राजा मेन्स एथें आला—सारब्रुक एथें ३० वे तारखेस दोन तास लढाई झाली. तींत प्रशियाचा पराभव होऊन त्यास तेथून काढून दिलें. फ्रेंचाच्या तोफा २३ होत्या.—इंग्लंडदेशानें हत्यारबंद(?) राहून लढाई पाहण्याचा निश्चय केला व फौजेंत २०००० लोकांची नवीन भरती केली इतकीं वर्तमानें आलीं आहेत.

### मागाहून आलेल्या नोटिसा.

नोटिस—तानकी मर्द महादू महाकर रहाणार जामगांव तालुके बाळापूर जिल्हा अकोलें हजला महादू वल्लद गठु बाइकर वस्ती मौजे निंबखेळे तालुके मलकापुर जिल्हा बुलढाणें यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं माझी लग्नाची बायको असून माहेरी राहून वाइट लोकांचे नादीं लागून मजला एक गैरशिस्त नोटिस तारीख २३ माहे जुलई सन १८७० इसवीचे वऱ्हाडसमाचार पत्रांत दिली आहे स तिचें उत्तर येणें प्रमाणें.

मी दोन वर्षें आपले बापाचें घरीं होतें असें तूं लिहितेस तें खोटें आहे. आम्ही तुला पाठवीत नव्हतो परंतु तुझी आई व मेहुणा येऊन कांहीं बतावणी करून तुजला घेऊन गेले पुढें लागलीच एक महिन्यानीं खुद आम्ही तुला बोथे या गांवींन्यावयास आलों पण तूं आमचे घरीं आली नाहींस हा तुझा दोष आहे. व त्याउपरही पांच सहा वेळा आम्ही तुला आणावयाकरितां पाठविलें असून तूं आली नाहींस असें असतां बापाचे घरचा भोजन खर्च मागतेस तो तुला साफ मिळणार नाहीं.

तुला पदर येऊन सुमारें दहा वर्षें झालीं तुम्ही आम्ही एकत्र होतों व जनरीतिप्रमाणें संसार करित होतों व वर्षांस तूं आपले माहेरीं जाईस व परत येईस कधीं कसला बोभाट नव्हता. सुमारें दोन वर्षांपूर्वीं मला हीव ताप लागून आग सुजून गेलें होते. व च्यार महिने पडून होतों त्या वेळीं तुझे बहिणीचा नवरा गंगाजी वल्लद नठवाजी गावंडे बोथेकर हा येऊन तुला घेऊन गेला व त्यानें तुला काय सांगितलें व तुझें मन त्यानें कसें फिरविलें तें ठाऊक नाहीं. तेव्हां पासुन तूं आमचे घरीं येण्यास टंटेली करूं लागलीस तुझ्याचे नादीं लागून नवऱ्याशीं उलट गोष्टी सांगणें बरोबर नाहीं याचा तुला पश्चात्ताप होईल.

मला पुरुषत्व नाहीं असें लिहिलें आहेस तें अगदीं खोटें आहे. आठ वर्षें रात्रंदिवस तूं व मी एके ठिकाणीं नांदत असतां त्या गोष्टीविषयीं तुझी कधींच तक्रार नव्हती ती माझे गैर मर्जीची खोटी गोष्ट बनवापुढें काढावयास तुला जाब या ठायीं परंतु वाइट लोकांच्या सल्लागिरीनें असें काम तुजकडून झालें असावें. जामगांवास माझे परिक्षेची पंचाईत करण्याकरिता मला बोलाविलें असता मी आलों नाहीं असें लिहिलें तें खोटें आहे. मानराव देशमुख यांचे पत्रावरून पंचाईत करण्याकरितां बरोबर च्यार भले लोक घेऊन आम्हीं आलों होतों. व तुझे बापाचें घरीं राहिलों होतों. परंतु त्यावेळीं तुझे आईनें तुला लपवून ठेविलें व परिक्षेस येऊं दिलें नाहीं. ही चूक तुमचे कडील आहे याचप्रमाणें नागपुरास दोन्हीकडील पंच मिळून परिक्षेचा प्रसंग आम्ही आणिला असता तूं टंटेलीनें त्यास कबूल झाली नाहींस व चौघांसमक्ष म्हणालीस कीं माझा याचा पुन्हा संबंध घडला तर मी आफू खाऊन जीव देईन अशी तुजकडून वर्तणूक झाली असतां आम्हाला दोष ठेवितेस हें गैर आहे.

घोवटची(?) गोष्ट ही तुला कळवितों कीं तुला सोडण्यास मी राजी नाहीं. मी पुरुष त्वात आहे समज तूं चालीप्रमाणें आपले देहाची व्यवस्था लावण्यास अधिकारी नाहीं. ती सर्व व्यवस्था आम्हाकडून झाली पाहिजे इतक्या उपर गंधर्व वगैरे करशील तर तुजवर फिर्याद करू व मग सरकारचे कायद्याप्रमाणें तुला व गंधर्व करणाराला सात वर्षांची कैदेची शिक्षा होईल हें पक्कें समजून काय करणें तें करावें. अजून तूं माझे घरीं नांदावयास यावें व मी तुजबरोबर आनंदानें संसार करीन. या नोटिशीचा जबाब पंधरा दिवसांचे आंत द्यावा कळावें तारिख ४ माहे आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) महादू वल्लद गटूबाइकर निशाणी खुद हातची असे.

नोटिस गणेश वल्लद मचल परदेशी वस्ती शेगांव तालुके बाळापुर यांसीं व रहो खाम खेडे तालुके मलकापुर जिल्हा बुलढाणें यांस देण्यांत येते कीं रुपये ४९१ ऐवजी तुम्हीं आपल्या दुकाना कवेलुच्या कसब शेगांव तालुके बाळापूर येथील जागा सहित गहाण लिहून दिल्या त्यातील हप्ते टळले असतां निकाल केला नाहीं करितां ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांत कराराचे शर्तीप्रमाणें रुपये द्यावे न दिल्यास दुकाना आमचे ताब्यांत द्याव्या. याप्रमाणें न केल्यास दिवाणी कोर्टांत फिर्याद करण्यात येईल व नोटिशीचा खर्च घेण्यात येईल. कळावें तारीख ४ माहे आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) रणछोडदास हरी वाणियाटदार कसबे शेगांव.

## पत्रव्यवहार.

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस.

वि. वि. खालील मजकूर प्रसिध्ध करावा.

वाशिम—पाऊस फार पडत आहे. यामुळें झालेले शेतीचे पेरे नासत चालले आहेत. लोकांचीं घरें पुष्कळ पडलीं

नानार भार्वहा दिवसानुदिवस वाढत चालला आहे. हल्लींच्या पर्जन्यास लोक आतां फारच त्रासले आहेत. अगर असाच आणखी कांहीं दिवस पाऊस पडत गेल्यास मोठी नुकसानी होण्याची भीति आहे. गांवात महामारी सारखा एक रोग उद्भवला असून त्यामुळें कांहीं लोक आजारी पडले आहेत व होत आहेत. ह्या रोगानें दोन मनुष्यें प्राणास मुकलीं.

कांहीं महिन्यामागें अकोला जेलांतून जो बाध्या नावाचा नाईकवडा पळून गेला होता. तो पुसद तालुक्यांतील लोकांस थोडे दिवसांपासून त्रास देत होता. त्यास महागांव स्टेशनचे पोलीस चीफ कान्स्टेबल फतेयावरखा व दुसरे त्यांचे हाताखालचे लोक मिळून धरिलें. ह्या मनुष्यास व तो ज्याचे घरांत लपून बसला होता त्यास आणि त्याचा एक मिळाफी ह्या तिघांस काल रोजीं वाशीम येथें आणिलें. सदरहु इसम आपले बापकोसेमत गंगाराम नावाचे मनुष्याचे घरांत आधाळ्यावर लपून बसला होता हल्लीं त्याजवर तीन च्यार गुन्हे केल्याचा आरोप आहे असें समजतें. सदरहू इसमाचे धरण्याबद्दल पोलिसाची तारिफ करणें योग्य आहे.

पश्चिम भागचे कमिशनर मे० लायल साहेब बहादूर यांची स्वारी आगष्ट महिन्याच्या पहिल्या तारखेस येथें येणार होती परंतु पाऊस फार म्हणून आली नाहीं त्यांचे समोर खुनाचा एक मुकदमा चालणार आहे.

येथें पदलतीर्थ नांवाचें एक तळें आहे तें जीर्ण होऊन मोडकळीस आलें होतें ही गोष्ट येथील कांहीं उद्योगी लोकांचे नजरेस आल्यावरून तें चांगलें करण्याची तजवीज चालविली आहे. वर्गणीही जमली असून सरकारातूनही आश्रय मिळेल असें ऐकण्यांत आलें आहे. मात्र हल्लीं पर्जन्याची झडी फारच लागून पडल्यामुळें तूर्त हें काम मागें पडलें आहे. हा उद्योग वर्णनीय होय यांत संशय नाहीं.

गावांत सडकेचे बाजूनें गटार खांदून सडकेवर माती टाकल्यामुळें सर्व चिखल होऊन जाणारे येणारे लोकांस फारच त्रास होतो. त्याची लवकर दुरस्ती केल्यास लोक आभार मानितील यानकरितां हें काम ज्याकडे असेल त्या अधिकाऱ्यांनीं ह्या गोष्टीवर लवकर लक्ष पोंचवावें हें त्यांस मागणें आहे. तसेंच सदरस्टेशनकडे करकून व दुसरे जाणारे येणारे लोकांस गुडघ्याबरोबर चिखल तुडविणें पडत आहे त्यामुळें त्यांचे अतिशय हाल होतात. व्हिक्टोरिया रोड नावाची जी पायवाट बांधली होती तिचे दोन तीन पूल पुरानें वाहून गेले. त्याची जलदीनें रिपेर न झाल्यास चांगलें होईल.

वाशिमकर रहिवासी.

---

रा. रा. वऱ्हाड समाचार कर्ते यांस विनंती विशेष बरेच दिवस आपली सेवा करून कृपेचा मेवा मिळाला नाहीं यास्तव आपले मनात हेवा येऊन शांती जीवा देण्यास वा वा कराल म्हणून हेवा लयास जावा व केव्हां केव्हां असें होतें हे कबूल करून जेव्हां जेव्हां घडतें तेव्हां तेव्हां त्या बद्दल देवा देवा करण्याचा वेळ थोडा मजकूर ज्याहात व त्याजवर आपले नेत्र व्हावा हें इच्छून जरा लिहित आहे

न यावा म्हणून आपले कृपेचा ठेवा मागून

सृष्टी कर्त्याची कृपादृष्टी फारच सैल झाल्यानें मेघ वृष्टी अशी होत आहे कीं तेणें सर्व लोक कष्टी होऊन लवकरच जर मेघ वृष्टी थांबेल तर बरें म्हणून दीन वाणी हें पाणी कमी होण्यास दूध पाणी सोडून चक्रपाणीस विनवितांहेत. ग्रहणापासून आजपावेतों एकसारखी लागलीच आहे, पण परवा रात्रीं अशी झड झडली, कीं तेणें सर्व जिकडे तिकडे खडाखड पडापड होऊन धडाधड लोकांचें नुकसान झालें व होत आहे. इतके दिवस सारखें जलवर्षण चालल्यानें सूर्यदर्शन तर होतच नाहीं, याकरितां ढगघर्षण बंद होऊन सध्या अवर्षण होईल तर बरें आणि गळून सर्व मळून गेल्यानें तसेंच सदन कोरडें नाहीं म्हणून मदन कोमून मदन अरीस प्रार्थीत आहेत. असा हा प्रजन्य प्रबळ होऊन जिकडे पहावें तिकडे प्रलयच जल, पण फळ काय; शेती कांहीं पेल उरलें नाहीं नालेच्या पेऱ्याची गळ होऊन त्यात खळखळ पाणी वहात आहे त्याची कळकळ जर देव न करील व असेंच करडी नजर ठेवील, तर कोडी भरडी किंवा ओलीकोरडी भाकर पुढें कसी मिळेल म्हणून लोक हळहळ करीत आहेत.

मुरुम टाकून सडक केवळ खडक करून टाकणें पण अगदी भडक घाण होऊन गेली आहे व सफा ठेवण्यास कडक हुकूम असतां मग काय सडक चाली जसेल ती असो. सडक दुरस्त व नाली भङ्गून कां झाली नाहीं? सत्तर रुपये दिले आहेत, असें जर सरकार विचारील तर पाटील काय उत्तर देईल कोण जाणे परस्परासबरपयामी ह्याप्रमाणें सध्या गावा नजीकच्या शेताची मजा होऊन राहिली आहे. कारण त्यांतील मोठ मोठे फत्तर काढण्यास सत्तर आहेतच आणि त्या करितां जो पदर खर्च होणें त्याची कदर आतां करणें नलगे. उन्हाळा जाऊन पावसाळा आला तरी गावाचे वेशीसी पाणी तुंबून रस्ता बंद झाल्यानें खस्ता खाणें प्राप्त होतें तें तसें न होण्यास नाली बांधणें पण अद्याप कां झाली नाहीं कोण जाणे. मे. डे क. सा० बाहादूर व मुख्यत्वें तहशिलदार सा० चिलकी हे जर ह्याजवर नजर पुरवतील तर फार आभारी होऊं कारण रयतकल्याणाचें काम होय.

“शंकर घाली लोटांगण इतराचा पाड कोण” अभंगांतील ह्या वाक्याप्रमाणें तहशीलदारी सारखी भारी पण भारी भारी कामें केली त्यांचे ही वित्तास पित्ताचा विकार होऊन सत्ताबळें स्नेहविनास धक्का बसतो व मास्तरानें मुलांस शिक्षा केली म्हणून अक्षास फिरवून त्याजवर खटला करण्यास लक्षांत उभारणी येते मग पटवाऱ्या सारख्या क्षुल्लकाची कथा काय व त्या पथात सरून त्यानें ही मास्तरांस व्यथा देण्याचे वृथा श्रम शरम सोडून गरम होऊन केले तर आश्चर्य? गावांत काय ते पटवारी ब्राह्मणे आणि तेच जर असे बाईट वहाणें करूं लागले तर आडाण्या लोकांनीं गऱ्हाणें केल्याचें नवल कायतें? मास्तर मुलांच्या कल्याकरितां मुलास शिक्षा करितात. तर मुलानें एकाचे दोन करून सांगितलेलें मनावर घेऊन शाहणपण खरचणें हें चांगल्याचें काम नव्हे. वय पोक्त पण विचार पोक्त नाहींत. पारकट बुध्धीजी संगती संगदोषेण वाणी बटावांत बसून अहंपणाच्या गोष्टी सांगणें तेव्हां आंधळ्यांत काणा राजा ह्या प्रमाणें व वाण्याचे पुढांपण्या पुरतें ज्ञानाची संगत तेथें त्या पटवाऱ्यास पंकाची नक्कल करून शिकूल करण्या पुरती अक्कल कोठून!

दिवसें दिवस जंगलाचा तर फारच बंदोबस्त होत चालला आहे. जनचराई बद्दल तहसील कचेरींत ‘की’ भरून ‘पास’ आणल्या खेरीज ढोरें कोणी डोंगरांत नेऊं नयेत अशा विषयीं बा० कन्सरव्हेटरचा हुकुम जाला असून त्या प्रमाणें अमलात आणण्याची मुदती केली म्हणून १५ रु० दरमहाच्या रामराव नामें दफेदारास २ व १२ रु० दर महाच्या कालम भार्यास १ रुपया दंड जाहाला सदरील मुलांस मारल्या बद्दल काडी नजर करून मास्तरावर दाढी पाडून आपणास पदरी गोवाळून घेऊन गरदी गार करणार होते ते हेच. सदरील दफेदार गृहस्थ होत.

तारिख ८ मिनहूस मि० डाव साहेब अ० इंजिनियर शिकारी करितां आले होते हे शाळेत येऊन परिक्षा घेऊन फारच खुष जाहले. शरा तर फारच उत्कृष्ट दिला आहे. असेच सर्व लोक जर नेहमी शाळेकडे देतील तर फार चांगले पाटील पांडे तर बिलकूल मदत करीत नाहींत. आमचे नवे आलेले तहसीलदार मास्तर लोकांचे किती हक्कांत उतरतात पहावे? शाळेला चांगल्या प्रकारें मदत देतील असी बहूत उमेद आहे व विनंती ही आहे. सर्व ‘विझिटर’ लोक परिक्षा घेऊन हरवक्त खूष होतात पण ह्याकडे बारिष्ट लक्ष देऊन कष्ट पावून इष्ट असें कांहीं च करीत नाहींत हें मोठें नवल आहे !!! कारण ‘जाईल तिकडे दृत्ती व नाहीं तिकडे जाईना राई’ म्हणून.

नवऱ्या बायकोचा विनोद व विन पैशा खेरीज तमाशा हे आनंद भाडोत्यास व हुतेक करून दररोज होत असतात. यांतील पुढील फार्स तर फारच चमत्कारिक जाहला. तो असा बायको म्हणाली आज मी उपास. नवऱ्यानें उत्तर केलें तूंच उपास नी स्नान केलें आहे. असी कुरकुर होतां होतां शर्टी नवा साहेब लागल्या उपासाचा. पण कुरकुर होऊन पतीनें प्रथमतः चापट पोळ्या मुष्टी मोदक वगैरे नारी उपासण्याची मजुरी दिली तेव्हां ती पुरेसी न झाल्यानें व न आवडून ‘मार तुला गुद्दा आवत आहे’ म्हणून मोरीतील मळ आंगावर टाकण्यास [नवऱ्याच्या] व त्याबद्दल सदरील मोदकाच बक्षीस नवऱ्यानें देण्यास आरंभ जाला. शेवटीं प्रमाणें मोल पहाण्यास बराच थवा जमला होता. सारांश खुप शिमगा माजला होता. मला वाटतें शिमग्याची होस राहिलेली बाईनें पुरी करून घेतली असतू पण “बहुरत्ना वसुंधरा” ह्या प्रमाणें असें ही निवडक प्राणी आहेतना !! असो विस्तार भयास्तव पुरें करतो हें विनती.

भाटोले ता. चि. २० जुलई १८७०

एक विलक्षण

---


## जाहिरात.

केरोपंतांचीं पंचांगें या साली ग० स० छा० त छापलेलीं आम्हांकडे विकावयास आलीं आहेत. किंमत दर प्रतीस ० ३ आणे.

| किंमतीचा ठराव. | रु. | आ |
|---|---|---|
| वर्षाची अगाऊ देणारास ... ... | ६ | ० |
| डाक अगाऊ ... ... ... | ७ | ० |
| सहा महिन्याची अगाऊ ... ... | ३ | ८ |
| एक अंकास | | ९ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ११ आठवड्यांबद्दल डाक खर्च अगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व मागाहून १ रु० ८ आणे.

☞ अगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारासही त्यांचा मागील हिशेब सफ़ा करून नवें साल चालू होई तेपून २ महिन्याची मुदत समजावी

नोटिसा वगैरे छापण्याचा दर.

१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया

१० ओळींवर प्रत्येक ओळीस ० १॥

इंग्लिश नोटिसीचा दर ओळीस ० ४

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.


TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते मालकांस लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बालबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अजीच वर्षें होऊन गेलीं तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजबद्दलची व मागील गुदरून गेल्यासाला बद्दलचें बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्ध आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता. १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हे पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छ. प्र. केलें.

# वऱ्हाडसमाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL 5 AKOLA :—SATURDAY EVENING— AUGUST, 13 1870 NO 33

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख १३ माहे आगष्ट सन १८७० इ०. अंक ३३

## अरोराजहाजाचा खटला-आणि युरोपियन अपराध्याविषयीं न्यायाधीशाचें मत.

मुंबईंत अरोरा नामक जहाजाचा एक फार मोठा खटला आलीकडे दोन महिने गाजत होता त्याची चौकशी होऊन अपराध्यास शिक्षा झाल्या. त्याची थोडक्यांत हकीकत अशी:—

दोन युरोपियन दलाल मि. व्हाइटवेल व मि. एल्मस्टोन यांनीं आरोरा जहाजावरील कप्तान हारियट व सुतार मार्क यांच्याशीं संगनमत केलें. मुंबईंत व्यापाराची अशी चाल आहे कीं, जहाजावर माल पाठवणारे लोक कप्तानास कोणी जामिन देऊन माल जहाजावर पाठविण्यापूर्वींच तो पोंचला म्हणून कप्तानाची पावती घेत असतात. व तीवरून मालाचा विमा उतरतात आणि ते दोन्ही दस्तऐवज एकाद्या बँकेकडे गहाण टाकून त्याच्या सुमारानें तिजपासून पैसा घेतात. मग तें जहाज ज्या ठिकाणीं जावयाचें असतें तेथें ती बँक आपल्या अडत्याकडे ते गहाणाचे दस्तऐवज पाठवून त्यांकडून पैसा घेते. व वाटेंत कदाचित जहाज फुटलें, बुडालें, अगर जळालें तर विमा घेणाऱ्यांकडून त्यांस पैसा मिळतो. या चालीपासून आजपर्यंत कोणी कोणाचें नुकसान केलें नाहीं, परंतु या आरोरा जहाजाच्या नुकसानीस ही चालच प्रतिबंधक झाली. सदरीं सांगितलेल्या व्हाइटवेल व एलस्टोन या दलालांनीं कप्तान हारियट यांशीं करार केला होता कीं अमुक दिवसांत आम्हीं तुमचे जहाजावर माल भरून देत. पण त्या मुदतींत माल भरला गेला नाहीं व कप्तानास काळजी प्राप्त झाली तेव्हां त्या दलालांनीं त्यास कपट युक्ति अशी सांगितली कीं, आम्ही माल भरला नाहीं तरी माल जहाजावर घालतो व तुम्ही चांगल्या व पुष्कळ मालाची पावती द्यावी व विमेवाल्यांकडून त्या पावतीबरहुकूम विमापत्र घेऊन बँकवाल्यांकडे तें कागद गहाण टाकून पैसा काढूं व मार्गांत जहाज बुडवून टाकूं म्हणजे बँकवाले विमेवाल्यांकडून पैसे घेतील आणि आपण अलग राहूं. कप्तानास ही युक्ति मान्य होऊन त्यानें माल जहाजावर पोंचल्याची पावती दिली व तिजवरून एक लक्ष सत्तर हजार रुपयांचा विमा उतरला. व बँकेकडून पैसे घेऊन दोघे युरोपियन, दलाल, एक कप्तान, व एक नेटिव दलाल यांनीं ते घशास उतरले. व जहाजावरील सुतार मार्क नामक साहेब यास सहा हजार रुपये देऊ करून त्याजकडून अर्ध्या वाटेंत जहाज समुद्रांत बुडविण्याचा करार केला व लाकडी वगैरे सर्व सामान या साठीं दुसरे दिवशीं एक फतेमारी रवाना केली. अरोरा जहाजास मार्क साहेबानें निघाल्याच्या दुसरे दिवशींच आग घालून जाळून टाकिलें. पुढें विमेवाल्यांच्या बारीक चौकशीनें हा अपराध उघडकीस आला. व या च्यारी युरोपियनांवर माजिस्त्रेटकडे खटला होऊन हायकोर्टांत सेशन कमिट झाले. प्रत्येकाकडून वेग वेगळे बारिस्टर होते, व यांनीं बहुत तक्रारी काढिल्या. शेवटीं फुलकोर्टापुढें हा खटला जाऊन यांनीं आरोपितास शिक्षा दिल्या. व त्यावेळीं मि. जस्टिस बेली साहेब यांनीं भाषण केलें तें फार चित्तवेधक आहे त्यांतील तात्पर्य असें:—

कैदीलोकहो, आमचे स्वदेशीय तुम्ही चौघे गृहस्थ शहाणे व बरेच विद्वान असतां घोर अपराध करणारे वाईट लोक जे येथें चौकशी करितां उभे राहतात तेथें तुम्हीं उभे अहा, हें पहाणें मोठें दुःखाचें व शोककारक आहे व तें येथें मोठ्या हाटीनें जमलेल्या पहाणारे लोकांसच आहे असें नाहीं, हिंदुस्थानातील सर्व इंग्लिश लोकांस आहे. जेथें आपली वस्ती कोट्यावधी हिंदुसमाजापुढें फारच थोडी म्हणजे खंडोस एक पावरती या मानानें आहे, जेथें आपल्या देशबांधवाचीं सर्व प्रकारचीं कृत्यें आपल्या भोवतालच्या एतद्देशीय नेटिव लोकांकडून फार बारिक नजरेनें पाहिलीं जातात व त्यांवर टीका केली जाते, व जेथें गुण आणि आचरण जसें ज्याचें असेल तसें त्यास चांगलें किंवा वाईट फळ मिळण्याचा जबरदस्त ओघ आहे. तें हें आपले देशापासून व घरापासून फार दूर असणारें पूर्व महाद्वीप आहे, यांत या शहरांतील व्यापारी लोकांस तुमच्या या घोर अपराधाच कृत्यापासून जो मोठा धक्का बसला त्याचें वर्णन कोण करील? आम्हा इंग्लिश लोकांचा व्यापार संबंधीं भलेपणा, इमानदारी व थोरवी पाहून नेटिव लोक आज पर्यंत वर्षें आम्हांस मान्यता देत आले आहेत तेथील लोकांच्या मनावर या तुमच्या कृत्याचा आतां कसा ठसा उठला असेल? सुमारें २९ वर्षां मागें म्हणजे सन १८४१ चे आक्टोबर महिन्यांत मुंबईस सर एर्स्किन पेरी साहेब सुप्रिम कोर्टाचे जज्ज असतां भलू पारू नावाच्या एका मातबर जहाजावर चिनास जाणारे बलवेडर नावाचें जहाज बुडविण्याचा अपराध केल्याची शाबिदी होऊन जन्मपर्यंत काळ्या पाण्याची शिक्षा त्यास झाली होती. व दुसऱ्या दोन नेटिवांस थोडथोडक्या शिक्षा झाल्या होत्या. मि. एल्मस्टोन व व्हाइटवेल, तुमच्या वर्तणुकीमध्यें त्याहून कमी प्रकार आम्हांस कांहीं दिसत नाहीं. हा दुष्कीर्तिकारक व्यूह तुम्हीं आप आपसांत रचला, हारियट साहेबाचें मन तुम्हीं बिघडविलेंत व यांचे मध्यस्थीनें मार्क साहेबास वाईट मार्गाकडे तुम्हीं योजिलेंत व तेणें करून तुम्ही पुष्कळ द्रव्य मिळविलेंत. तीन हुंड्या लिहून ७२००० रुपये तुम्हीं आग्रा बँकेकडून घेतलेत. उत्तम कापसाचे ६०० बोजे जहाजावर चढवावयाचें तुम्हीं मिष केलेंत पण त्यापैकीं पाचसें तर चढविले नाहींत व चढविण्याविषयीं तुमचा बेतही नव्हता. आणि शंभर बोजे कापूस चढविला तो सर्व बाजारांत टाकाऊ व अगदीं हलक्या प्रकारचा होता. या पेक्षां अधिक निर्लज्य व अपराधकारक दुसऱ्या वर्तनाची कल्पना करणें असंभव्य आहे. मि. हारियट, आणि मि. मार्क, ही युक्ति तुम्हांस बरी वाटली आणि विपुल द्रव्य मिळण्याचा सुमार रंग दिसला तेव्हां तुम्ही या अरोरा जहाजाच्या नाशाच कामीं या लोकांस मदत करण्याचें कबूल केलेंत. तुम्ही या कृत्याचे भागिदार अहा व हें कृत्य महद्दोषाचें आहे तरी एल्मस्टोन व व्हाइटवेल यांचपाहून तुमचा अपराध हलका दिसतो सबब शिक्षा तुम्हांस हलकी द्यावी असें दिसतें. तुम्हा सर्वांच्या बचावाविषयीं विद्वान बारिस्टर लोकांनीं जें जें भाषण केलें तें तें सर्व आम्हीं लक्षपूर्वक ऐकिलें; परंतु मोठ्या बातबेतानें जो अपराध केला आहे व ज्याचें स्वरूप फार भयंकर आहे त्या विषयींची कबुलायत आणि खेद ही माझ्या मतें शिक्षा कमी करण्याच्या विनंतीस कान द्यावयास पात्र नव्हत.

मि. एल्मस्टोन, व मि. व्हाइटवेल तुम्ही महासमुद्रामध्यें अरोरा जहाजाचा अतिसाहसानें नाश केल्याचा अपराध तुम्हांवर शाबित झाला आहे व त्याकरितां तुम्ही जन्मभर सक्तमजुरीनिशी कैद भोगावी. मि. हारियट तुम्हांवर जो अपराध शाबित झाला आहे त्याकरितां तुम्हांस पंधरा वर्षांची सक्तमजुरीनिशी कैदेची व मि. मार्क तुमचे अपराधाकरितां तुम्हांस दहा वर्षें सक्तमजुरी कैदेची शिक्षा देण्यात आली आहे.

---

फ्रान्स व प्रुशिया ह्यांमध्यें लढाई उत्पन्न झाली आहे असें वर्तमान ऐकून लढाई पासून हजारों माणसें प्राणास मुकणार, कोट्यावधी रुपयांच्या मालमत्ता ज्यांचा व्यापार धंद्यांत उपयोग झाला असता व त्या मुळें हजारों प्राण्यास जीवनाचें साधन झालें असतें त्याचा व्यर्थ नाश होणार, वगैरे आपदा पडणार ह्याचा विचार मनांत येऊन कोणाही विचारी मनुष्यास वाईट वाटल्या वांचून राहिलें नाहीं. शिवाय ह्या लढाईपासून आपल्या देशावर काय परिणाम होणार ह्याचा विचार करणाऱ्या पुरुषाच्या तेव्हांच लक्षांत आलें असेल कीं, युरोपखंड व मुख्यत्वेंकरून जे देश लढाईंत गुंतले आहेत त्यांच्याशीं ह्या देशाचा व्यापार चालत आहे त्यांत हरकत आल्याविना रहाणार नाहीं. व त्याजपासून आपल्या देशाचा गैर फायदा होईल. त्याप्रमाणें हल्लीं कांहीं अंशीं घडलें आहे. लढाईपूर्वीं कापसाचा भाव सवानऊ साडेनऊ पेनीचा होता. लढाईची बातमी पसरतांच भाव सवासहा पेनीवर आला. कारण फ्रान्स व जर्मनी ह्यांत हिंदुस्थानचा कापूस जात होता त्याचा खप नाहींसा झाला आहे. ह्याही भाव कमी होण्याचा रंग दिसत आहे; कारण अमेरिकेंत गेले सालापेक्षां यंदा जास्ती कापूस पेरण्यांत आला आहे व इकडेही गेले सालाप्रमाणें पेरला आहे. यंदाच सालीं व्यापाराची एकंदर मंदी असल्या कारणानें मुंबईस शेंकडो माणसें बिन रोजगार पडलीं आहेत. व कापसाचे भावांत घट आल्यामुळें कितेक व्यापारी नसणार, कारण आणखी माणसें बेकार होणार व या सर्वांचा परिणाम आंतील देशावर झाल्याविना राहणार नाहीं व एकंदर यंदाचें साल व्यापार धंद्यास हानीचें झालें आहे.

पण ह्या लढाईचें वर्तमाना शिवाय आह्मांस दुसरी एक काळजी उत्पन्न झाली होती. ह्या लढाईकडे इंग्लंडांतील राजकारणीय पुरुषांचें लक्ष वेधून गेल्या कारणानें आपले देशावर प्रांतविरोध कराचा जो जुलूम चालला आहे व तत्संबंधानें लष्कर, सरकारी बांधकामें यांजवरील अवाढव्य व उडाऊ खर्च व एकंदर उत्पन्नाचा खर्च करणें व राखणें ह्या सर्व गोष्टींचा विचार करून त्याविषयीं योग्य तजवीज करण्याबाबद जे अर्ज चोहोंकडून गेले आहेत त्यांजकडे त्या राजकीय पुरुषांचें लक्ष देण्यांत येणार नाहीं व कदाचित दिलेंच तर योग्य लक्ष न पोहोंचल्या कारणानें आपली तत्संबंधी दुःखें जावीं तितकीं दूर होणार नाहींत. पण ईश्वर कृपेनें आपणास ह्या प्रकरणांत योग्य दाद मिळेलसा आलीकडे भरंवसा आला आहे. तारीख २७ जुलै रोजी सर चार्लस ट्रिविलिन ह्यांनीं कांहीं पार्लमेंटांतील सभासदांपुढें या प्रकरणीं भाषण केलें. त्या सभेंत हिंदुस्थानची माहितगारी असणारे ही कांहीं इसम होते. सर चार्लस ह्यांनीं या भाषणांत इकडील लष्कर व सरकारी बांधकामें ह्यांचे उडाऊ खर्चाबाबद कांहीं टीका केल्या. प्राप्तीवरील कर निरर्थक जुलमी आहे व एकंदर उत्पन्नाचा खर्च करणें राखणें ह्यांविषयीं व्यवस्था अयोग्य आहे म्हणून सांगितलें. या नंतर जमलेल्या सभासदांनीं असा ठराव केला कीं, या गोष्टीवर विचार करण्यास पार्लमेंट सभेस अर्ज करण्याकरितां एक सिलेक्ट कमिटी नमावी व त्याप्रमाणें एक नेमली. ह्याप्रमाणें सर चार्लस ट्रिविलिन ह्यांनीं हें काम आपले डोईवर घेतलें आहे. ह्या सारखे ज्ञाते पुरुषानें हें काम आपल्या शिरावर घेतलें नसतें तर त्या प्रकरणीं शेंकडो अर्ज्या झाल्या असत्या तरी त्यांचा उपयोग नव्हता. पार्लमेंटांतील बहुतेक (किंबहुना शेंकडा नव्याण्णवांस म्हटल्यास ही चालेल) सभासदांस हिंदुस्थानची माहिती नसल्या कारणानें त्यांस ह्या देशाचे कामांत पक्का विचार करतां येत नाहीं व सर्व प्रकारें स्टेट सेक्रेटरीवर भरं

वता ठेवाया लागतो हे अंमलदार आपण केलेल कामाचा मोड अशा प्रकारचो समजूत पार्लमेंटात कतील ही इच्छा करणें व्यर्थ आहे. तरी जर सर चार्लस व्याणीं या प्रकरणात हात घातला नसता तर त्यात आपणास दाद मिळण्याची आशा नव्हती. सर चार्लस यांचे एकंदर विचार व कृति कशी आहे हें सर्व हिंदुस्थानास माहीत आहे. सन १८६० साली पहिले इनकमटाकसाच विरुद्ध आपले मत प्रगट करण्याचा या वेळेस आपले मद्राशेस गवरनरचे जागेची परवा धरली नाहीं. अशा बहादुर व योग्य पुरुषांनीं ह्या कामांत हिंदुस्थानास हातीं धरले आहे तेव्हा त्यात पार्लमेंटाकडून चांगला विचार होईल असा पूर्ण भरंवसा वाटतो. व जें काय फायदे ह्या कामीं होतील त्याविषयीं आपणास सर चार्लस यांचे आभार मानले पाहिजेत.

---

## लढाईसंबंधीं या आठवड्यांतील तारेंतील वर्तमानें.

ता० ४ आगस्ट.

प्रशियन लोकांना विसेनबर्ग एथें एक मोठा जय मिळाला. व दोहोबाजूंचे पुष्कळ लोक मरण पावले.

ता० ६ आगस्ट.

प्रशियन लोकांचे मोठें सैन्य बाडर व जोकच्या रानात जमा झालें. व त्यानें विसेनबर्ग या ठिकाणीं जनरल डुये याच्या हाताखालच्या फ्रेंचाच्या तीन पलटणीवर हल्ला केला फ्रेंच लोक पुष्कळ बेळ लढले, परंतु शेवटीं त्यांचा पराजय होऊन जनरल डुये मरण पावला.

ता० ६ आगस्ट

बर्लिन एथील बातमी समजते कीं, प्रशियाचा सेनापति विलेनबर्गच्या पलीकडे आपल सैन्यासह चाल करित आहे. पारिस एथें फ्रेंचाचा पराजय झाल्यामुळें लोक फार दिलगीर आहत. फ्रान्स देशातले जर्मन लोकास पारिसापुढें हजर होऊन त्या देशात राहण्याविषयीं परवाणगी मागण्याविषयीं हुकूम झाले आहत.

प्रशियाच्या सेनापतीनें पुन्हा फ्रेंचाचा जनरल म्याकमेहाण याच्या सैन्याचा वेर्थ या ठिकाणीं पराजय केला.

ता० ७ आगस्ट

वेर्थ एथील लढाईत प्रशियानें फ्रेंचाचे ४००० लोक पाडाव केले व त्यांच्या तोफा वगैरे पुष्कळ हिसावून घेतल्या. सारबर्गच्या पश्चिमेस प्रशियन लोकांची व फ्रेंच लोकांची लढाई झाली. तींत फ्रेंचांचे पुष्कळ लोक त्यांनीं पाडाव केले व दोहोकडील पुष्कळ नाश झाला.

फ्रेंच लोकाच्या तर्फेची बातमी नेपोलियन बादशाहाकडून तारेतून वर्तमान आलें कीं प्रशियन लोक फार असल्यामुळें जनरल म्याकमेहान याचा पराजय झाला. त्याची टोळी व्यवस्थित रितीनें मागें परतली. फार एथेंही लढाई झाली तींतही प्रशियन लोक पुष्कळ होते.

पारिस शहराला फ्रेंच लोकांनीं आपल्या सैन्याचा वेढा देऊन ठेविला आहे. बादशाहानें निरोप पाठविला आहे कीं आजपर्यंत आपलें जें नुकसान झालें आहे ते भरून येईल. व आपले लोकांचें म्हणण्यासारखें नुकसान झालें नाहीं, परंतु शत्रु आपले मुलखात आले; म्हणून त्याकरितां आता आपणास फार झटलें पाहिजे. सैन्याची उमेद खचली नाहीं.

पारिस येथें नेपोलियन बादशहाची राणी एम्प्रेस युजिनी राज्य कारभार पाहत आहे तिनें असा जाहिरनामा लाविला आहे कीं सर्व लोकांनीं धैर्य धरावें आणि आपल्या देशाच्या अर्थां करितां झटून मदत करावी.

तीसपासून चाळीस वर्षांपर्यंतच्या वयाचे सर्व सशक्त लोक पारिस शहराचा बंदोबस्त करण्याकरितां व किल्याच्या दुरुस्ती करितां बोलाविले आहेत.

तीस वर्षांच्या आतील वयाचे सर्व लोक पलटणीत भरण्याचा विचार झाला आहे.

पारिस शहराच्या रक्षणाची कडेकोट तयारी चालली आहे.

मि० ग्लाडस्टोन इंग्लंडचे मुख्य प्रधान यांनीं पार्लमेंट पैकीं हौस आफ कामन्स या सभेस असें कळविलें कीं ता० ३० जुलाई रोजीं इंग्लिशांनीं फ्रेंच लोकांशीं व प्रशियन लोकांशीं एकतह केला कीं बेलजम देशास या दोहो पैकीं कोणे राष्ट्रानें उपद्रव दिला तर त्याच्याशीं लढण्याकरितां इंग्लिश लोक त्याच्या विरुध्द पक्षास मिळतील,

बेलजमचे संरक्षणाशिवाय दुसरे कोणते कामाकरितां इंग्लिश लोक लढाई करणार नाहींत.

ता० ९ आगष्ट

फ्रेंचाच्या प्रधान मंडळींनें आपआपले जागेचा राजिनामा दिले. फ्रेंच सैन्य लढाईचे जागीं २,३०,००० जमलें आहे.

वर्थ एथें जी लढाई झाली तींत ५००० फ्रेंच लोक मेले व जखमी झाले. व २००० लोक कैदी होऊन शत्रूचे हातीं सांपडले प्रशियन लोकांचे ३६०० लोक मेले.

ता० १० आगष्ट

डुव्हरनाइस या नावाच्या एका गृहस्थानें फ्रान्स देशाच्या राजकीय सभेस अशी सूचना केली कीं जी प्रधान मंडळी आपले देशाचे संरक्षणाची तयारी करण्यास लायक असेल तिला मदत देण्याचा आपला निश्चय असावा. व हें सर्वांस मान्य झाल्यावरून आलिव्हर मुख्य प्रधान यांनीं आपले कामाचा राजिनामा दिला व जनरल मौटाबान यांस मुख्य प्रधान नेमिलें

फ्रान्स देशांतील राजकीय सभेत फार दंगा झाला. लेफ्ट नावाच्या एका पक्षांतील लोकांनीं असें म्हटलें कीं बादशाहा सेनापतीचे कामास लायक नाहीं. याकरितां त्यास परत बोलवावें.

जनरल ब्वाझिनी हा फ्रेंच सैन्याचा मुख्य सेनापति झाला. जनरल माकमहान यानें आपलें सैन्य पुन्हां गोळा करून नान्सीकडे चालविले आहे.

पारिस शहरातील लोक फार गडबडले आहेत. सर्व लोकास हत्यारबंद करावें अशा विषयीं बहुतेक सर्व वर्तमानपत्रकर्त्यांचा आग्रह आहे.

प्रशियन लोकांकडून आलेले वर्तमान असें आहे कीं सारब्रुकच्या पश्चिमेस जो फ्रेंच लोकांचा पराजय झाला त्यानें त्यांची फारच खराबी झाली. व त्यांच्या मेलेल्यांची व जखमी झालेल्यांची संख्या फार मोठी आहे. दोन हजार फ्रेंच लोक कैद करून आणिले व आणखी येतच आहेत. प्रशियन लोकांचें ही बरेंच नुकसान झालें.

ता० ११ आगष्ट

फ्रेंच राजकीय सभेनें एक कायदा ठरविला आहे कीं पंचवीस वर्षां पासुन पसतीस वर्षांच्या आतले वरतर्फ केलेले सैन्यातील शिपाई व अविवाहित सर्व लोक, तसेच ज्यास मुलें नाहींत ते लोक लढाई करितां जमवावे. या सभेनें सैन्याचे आभार मानिले.

जे लष्करी कायदे फ्रेंच सरकारानें सुचविले होते ते सर्व राजकीय सभेनें पास केले

---

## वऱ्हाड

वऱ्हाडांत मुनसिपाल कामेटयांचे नियम व उपनियम कसे असावे ते ६ वे तारखेच्या रेसिडेन्सी आर्डर मध्यें छापून आले आहेत. त्यांतील आशय आम्ही आपले वाचकांस पुढील अंकांतून कळवूं.

पाऊस दोन दिवस कमी आहे. बाकी दररोज थोडा बहुत पडतच होता. यावर्षी जितका विपुल पर्जन्य झाला तितका दहा पांच वर्षांत झाला नव्हता. एका ठिकाणाहून आम्हास पत्र आलें त्यांत लिहिलें आहे कीं पार्वतीं पाऊस मनस्वी आहे. दररोज एक सारखा पडतो. व जो थेंब पडतो तो जमीनींत जातो. शेत रोवाचे मस्तकास पोचल्याचा सुमार आहे.

उमरावती—या आठवड्यांत पावसानें उघाडी दिली आहे. मध्यें एक दिवस मात्र दोनप्रहराचे सुमारास थोडासा पाऊस आला. पेरण्याचीं कामें झपाटयानें सुरू आहेत. आणीक सुमारे आठ दहा दिवस उघडेल तर फार चांगलें आहे असें शेतकरी लोक म्हणतात. रोगराई फारशी नाहीं. आकाश अभ्रानीं व्याप्त असतें. यामुळें गरमी विशेष होते. स. प्र.

बुलढाण्याचें जुडिशल शिरस्तेदार रा० रामकृष्ण महिपत सेसिपड होत आंत लवकर कार्टांपुढे हजर होण्याकरितां वारंट झालें आहे असें ऐकतो

---

### अकोला

मि० हार्डंग साहेब एथील डिपुटि कमिशनर पुढील महिन्यात विलायतेचे रजेवर जाणार आहेत.

रा. रा. गोविंदराव भागवत एम. ए चंद्रपुरचे हायस्कुलातील हेड मास्तर सोमवारीं यथें येऊन रत्नागिरीस जाण्याकरिता मंगळवारीं निघून गेले.

मेहेरबान लायल साहेब बहादुर कमिशनर याची स्वारी बुलढाण्याकडे बल्या घाट त्याच्या चौकशीकरितां आज गेली. तेथील डिपुटि कमिशनरानीं खुनाचा मुकदमा सेशन कमिट केला आहे.

गेले आठवड्यांत परम हंस नावाचे एक नग्न स्वामी येथे आले होते ते नाशकाकडे गेले.

---

## वर्तमानसार.

हिंदुज्ञानवर्धक या नावाची मुंबईस एक कापत्ररी झाली आहे तिची वर्गणी १७०० रुपये पर्यंत जमली आहे. विद्याज्ञानसंबधी आपले देशातील जुने ग्रंथ मिळवावे असा या कापत्ररीचा उद्देश आहे.

स्वीडन व नार्वे देशात कमी रुंदीचे व स्वस्त दराचे रेलवे आहेत ते पाहण्याकरितां हिंदुस्थानातील रेलवेच्या विलायतेतील कमिटीनें त्या देशात कांहीं शोधक मनुष्य पाठविले आहत.

हिंदुस्थानातून दहा पलटणी विलायत सरकारानें तिकडे मागविल्या आहत असें वर्तमान आहे.

गेल्या आठवड्यात बंगाल्याकडे मोठें वादळ झालें होतें असें समजतें. ईस्ट इंडिया रेलवेकंपनीच्या एका आगबोटीचें नुकसान झालें व तिजवरील कपतान ठार मेला.

गेल्या रविवारीं बोरघाटांतील बोगद्यात वरून कांहीं भाग पडला व तीन तास गाड्यांची खोटी झाली होती. या वर्षीं पाऊस फारच पडत आहे.

कलकत्ते येथील इंजिनिअरिंग कालेजाला सरकारची जी मदत होती ती त्यांनीं बंद केली यामुळें तें कालेज बहुधा बंद होईल असें वाटतें.

पुणें—गेले आठवड्यापासून या आठवड्यात पावसानें कांहीं उघाडी दिली आहे येणें करून राहिलेले पेरणीचे काम पुरें होण्यास हरकत नाहीं. हवेत अंगीं बरीच गर्मी आली आहे. रोगराईचा उपद्रव सामान्य पक्षीं लिहिण्यासारखा नाहीं. बाजारभाव माफक आहे.

आम्हास लिहिण्यास दुःख वाटतें कीं, संस्थान अक्कलकोट येथील मुख्य अधिकारी श्रीमंत रा. मालोजी बाबासाहेब राजे भासले यांजला गेले शनिवारीं देवआज्ञा झाली. यांची प्रकृति एक वर्ष पासून नादुरुस्त होती. यांजला दोन बायका व १ पुत्र आहे.

आनरेबल ज्यानस्काट साहेब कौन्सिलर हे येते सप्तेंबर महिन्यात स्वदेशीं परत जाणार सबब त्याचे जागावर मेहेरबान गिबस साहेब मुंबई हायकोर्टाचे जज्ज हे होणार व यांचे काम मेहेरबान न्हाइट साहेब पुणें अदालतीचे जज्ज हे पहाणार व पुणें अदालतीचे जज्ज मेहेरबान ल्यार पेन्ट साहेब यांस नेमणार असें समजतें.

आनरेबल फ्रान्सिस लायड साहेब मुंबई हायकोर्टाचे जज्ज हे विलायतेस रजेवर जाणार म्हणून त्यांचे जागीं पारशाचे मि. शाबाहेम होणार असें समजलें आहे.

ज्ञा. प्र.

खडकवासल्याजवळ मोठा तलाव बांधीत आहेत. त्याच्या आंत मातीचा बंधारा घातला होता तो फुटला. त्यात रक्त चुना तयार करण्याचें यंत्र गडप झालें आहे तें अद्यापि सांपडलें नाहीं. हा तलाव तयार होण्यास अवकाश आहे तथापि सन १८७१ सालीं त्याच्या कालव्याचें पाणी बाहेरास मिळेल असें आहे. कालव्यांतून नावाही चालणार आहेत.

नारायण बापूजी गोरे, पोष्टाचे खटल्यांत शंकरभट बिन मणीरामभट दातार यानीं सातारकर त्र्यंबकशास्त्री भाटे यांच्या व तीनें रेलवे माजिस्त्रेटाकडे साक्ष दिली ती खोटी ठरून त्यास पुण्याचे असिस्टंट सेशन जज्ज साहेब यांणीं ९ महिन्यांची शिक्षा दिली. यावदल शंकर भट यांणीं सेशन जज्जाकडे अपील केल्यावरून त्यास जामिनावर सुटका केली. ज्ञा. प्र.

नगर—या आठवड्यांत पर्जन्यानें कृपा केली आहे. हवेचें मान या दोन दिवसात उष्णता असल्याचें वाटतें रोगराई

वगैरे कांहीं नाहीं. धान्याचे भाव जे आहेत तेच आहेत. कापसाची तर फारच मंदी आहे. वृ. वै.

नाशीक—मे. ओव्हन्स साहेब यांणीं मुंबईस जाऊन गेल्या सोमवारीं तेथील कलेक्टराचे कामाचा चार्ज घेतला.

पर्जन्य फारसा नसून आकाश नेहमी साभ्र असतें. हवा साफ नसून अपकारक आहे ज्वर आणि आमांश थोडथोडा चालू आहे. ज्ञा. नं.

सातारा—पर्जन्यानें अगदीं कहर करून दिला आहे. शहरांत गोर गरिबांची अतिशय घरेंदारें पडल्यानें एकच आकांत होऊन गेला आहे. थोडे दिवस झाले गुरुवार पेठेंत एका भिंतीखालीं बाळाई या नांवाची बायको चिरडून मरण पावली. आजपर्यंत ३४ इंच पाऊस पडला. म. बि.

रजपुतस्थानामध्यें यंदाही दुष्काळाची भीति आहे असें कलकत्याकडून आलेल्या बातमीवरून कळतें. यंदाच्या जुलै महिन्यांत अगदीं थेंबभर पाऊस पडला नाहीं. धान्याचे भाव चढत चालले आहेत असें समजतें.

बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी यांनीं आपल्यास सिविल सर्विस कमिशनर्स यांच्या विलक्षण कृतीनें खर्च करावा लागला तो भरून द्यावा म्हणून इंडिया आफिसास विनंती केली आहे असें हिंदुपेट्रियट पत्रावरून समजतें.

इंग्लिशमन पत्रावरून असें कळतें कीं विलायतेंत देखील उंच प्रतीच्या विद्येस सरकारचें साह्य आहे असें जुन्या युनिवर्सिटि व शाळा यांस नेमणूका आहेत यांवरून, दुसऱ्या युनिवर्सिटीस म्हणजे लंडन युनिवर्सिटीस १०,००० रु०, स्काच युनिवर्सिटीस दोन लक्ष व ऐरलंडांतील युनिवर्सिटीस वगैरे ९०,००० रु० असे प्रतिवर्षी मिळतात यांवरून, तसेंच युनिवर्सिटी संबंधीं पार्लमेंट मध्यें वादविवाद वेळोवेळीं होतात यांवरून स्पष्ट होतें.

गांवोगांव आपत्रन्या असण्याची किती आवश्यकता आहे हें सर्वांस ठाऊकच आहे. ही आवश्यकता मनांत आणून तीस मदत करण्याकरितां मुंबई सरकारानें नुकताच एक असा ठराव केल्याचें समजतें कीं, मामलेदाराच्या कचेऱ्यांकरतां ज्या ज्या ठिकाणीं नवीन इमारती बांधण्याचें काम सुरू होईल त्या त्या ठिकाणीं याच इमारतींत आपत्ररीकरतां एकेक जागा बांधीत जावी. हा ठराव फारच योग्य झाला असें म्हणावें लागतें. इं. प्र.

नवीन दारू—विलायतेंत कोणी एक नोबल म्हणून गृहस्थ पदार्थविज्ञान शास्त्रांत चांगला निपुण आहे; याणें दारूची जात कांहीं निराळेच पदार्थापासून उत्पन्न करण्याची युक्ति काढिली आहे. या दारूचें नांव कर्त्यानें "डाकाइन्" असें ठेविलें आहे. यांतील मुख्य घटकावयव येणें प्रमाणें: नवसागर, गंधकाचा अर्क, आणि करवतीनें काढलेला लाकडाचा भुसा. या दारूस इतर ओबट रसाचे संबंधानें कांहीं इजा होत नाहीं; तसेंच थंडीत व उन्हांत ठेविल्यानें तिचे गुण कमज्यास्त होत नाहींत; आणि हवेचे योगानें पातळ किंवा टणक न होता मळते; वेळेस दुर्गंध येत नाहीं शिवाय जर ती नुसती खुली जाळली तर ती पासून आवाज अथवा धक्का बसत नाहीं.

प्रिवि कौन्सिलांत अपिलें—हल्लीं प्रिवि कौन्सिलांत अपिलें फार शिल्लक आहेत व यांचे निकालाकरितां आणखी जज्ज नेमणें वगैरे बद्दल विचार चालू असल्या बद्दल आम्हीं मागील अंकात लिहिलें होतें. हल्लीं असें समजतें कीं, हल्लीं हरकोणत्याही मुद्यावर अपिलें होत असतात तीं बंद करून फक्त कायद्याचे मुद्यावर अपिल चालावें असा कायदा करणें योग्य आहे कीं नाहीं असें स्टेट सेक्रेटरीनें हिंदुस्थान सरकारास विचारिलें आहे. ही युक्ती अपिलें कमी करण्यापुरती मात्र बरी आहे. परंतु आजपावेतों राणीच्या कौन्सिलांत अपिल करण्याची उमेद व आशा असे आणि अनेक प्रसंगीं रयतेस न्यायही मिळत असे ती उमेद कमी होऊन न्यायाचें एक द्वार कमी होईल. या बाबतींत तिन्ही प्रेसिडेन्सींचे सरकारांचीं व हायकोर्टांचीं मतें विलायतेस गेल्यानंतर अखेर निकाल होईल.

पुनर्विवाह. ता. २२ जुलई रोजीं भवानीपूर येथें ब्राह्मण जातीच विधवेचा पुनर्विवाह झाल्याचें समजतें.

नरमांस भक्षक—एका इंग्रजी पत्रांत मनुष्यानें मनुष्यास खाल्याबद्दल चमत्कारीक घटल्याची हकीकत अशी लिहिली आहे कीं, सन १८६८ सालाचे प्रारंभीं आरब लोकाचे जातीच्या दोन तरुण स्त्रिया व एक १३ वर्षांचे वयाचा मुलगा अशीं तीन मनुष्यें एकाएकी नाहींशी झालीं. व यांचे काय झालें असावें या बद्दलचा कांहीं थांग मूळ लागला नाहीं; परंतु वरील सालचे अखेरीस महमद या नांवाचा एक आरब नाहींशा झालेल्या स्त्रियांपैकीं एके स्त्रीचा भरड कापडाचा झगा पांघरलेला आढळला. यावरून यास पकडून विचारतां त्याणें असें कबूल केलें कीं मी व आणखी दोन असामींनी मिळून दोघी स्त्रिया व एक मुलगा ठार मारला. नंतर यांचीं प्रेतें आम्हीं जेनतहर येथें एका झोपडींत नेऊन तेथें तीं भक्षिलीं. ज्या ठिकाणीं हें क्रूर कर्म घडलें तेथें मेलेल्या मनुष्यांचीं हाडें सांपडलीं. वर सांगितला महमद याणें हें केवळ कबूल केलें असें नाहीं; परंतु याणें असें सांगितलें कीं सन १८६७ सालीं माझा बाप व भाऊ हे उभयतां मरण पावले या वर्षीं मी त्यांचीं प्रेतें भक्षण केलीं. यावरून महमद यास मृत्यूची शिक्षा दिली.

शेतकी—पाण्याचे कालवे वगैरे शेतकी सुधारण्याचे उपाय करण्याचे कामांत हिंदुस्थान सरकार आजी कडे बरेंच लक्ष पुरवीत आहे. शेताची बंदिस्ती करण्याकरितां, किंवा पाण्याचे पुरवठ्यासाठीं विहिरी किंवा तलाव बांधण्याकरितां, किंवा नवी जमीन जंगलांतून किंवा नदींतून पाडण्यासाठीं शेती लोकांस तगाई सारख्या रकमा देऊन सहाय केलें असतां शेतकीस फायदे होतील असें हिंदुस्थान सरकारास वाटून या बाबतींत कनिष्ठ सरकारांचीं काय मतें आहेत हे विचारिलें आहे. हिंदुस्थान सरकार म्हणतें कीं अशा प्रकारें शेतीस सहाय करण्याची चाल अजून विलायतेंतही चालू आहे व पूर्वीं बंगाल प्रसिडेन्सींत होती परंतु ती असावी तशी नव्हती सबब आतां असा कांहीं तरी बंदोबस्त करणें जरूर आहे. बहुधा हे स्तुत्य विचार कापसाचे वृद्धीसाठीं सुचले असतील. कापसास दर आल्या पासून राज्यांतील तीन चतुर्थांश जमीन कापसानें आटली; धान्य बहुधा काशी पासून रामेश्वर पावेतों चौपट किंवा पांच पट महागें झालें आहे; पुढें स्वस्थ होण्याचा संभव नाहीं; व याचा परिणाम ओरिसा प्रांतांत दाहा लाख रयत लोकांनीं निवाणिशीं भोगिला तरी अजून सरकारानें या कामांत हात घालून कापसाचे वहास कांहीं मर्यादा करण्याचा बेत अजून आला नाहीं काय? ने. ओ.

जोधपुरचे महाराजांचीं व इंग्लिश सरकाराची सांभर तलावा नजीक मीठ तयार करण्याचे व विकण्याच कामाकरितां कांहीं ठराव बंदी झाली आहे.

आज लढाईच्या बातम्या लिहिल्या आहेत त्यावरून एकंदर दिसून येईल कीं, प्रशियन लोकांची सरसी व फ्रेंच लोकांची पिच्छेहाट आहे.

### मुंबई सरकारचे ग्याझेटावरून.

मि० ए. बेमांकिड यास फर्स्ट क्लास जज्ज केलें—मि० आर डब्ल्यु हटर यास सेकंड क्लास जज्ज केलें—मि० डब्ल्यु एच न्यूनहाम यास कोल्हापुरास सिनियर असिस्टंट जज्ज नेमिलें, व यांनीं काम सुरतेस अकटिंग जज्जाचे सूत्रें पहावें.—

बारन डी एच आर्पेट यास भारवाडास पाहिले प्रतीचे अकटिंग जज्ज नेमिलें.—

हायर स्टांडर्डच्या लिखेक युरोपियनाच्या परीक्षा उतरल्या त्यांत सोलापुरचे डिपुटि कलेक्टर मि० लक्ष्मण जगन्नाथ व वाईचे मामलेदार मि० नारायण भिकाजी जोगळेकर या नेटिव गृहस्थांच्याही परीक्षा उतरल्या.

## पत्रव्यवहार.

### वऱ्हाडी भाषेचा मासला.

वऱ्हाडसमाचार कर्ते यांहिस नमस्कार विनंती अशीजे आमच्या उमरावती सदर राव आजपावेतों डेपुटी इनिस्पेक्टर हे गांवांत राहत होते. यांमुळें आम्हांहीस डिपांतुन बुकें हरत घेण्यास बरें होत होतो आता त्यांहीनी गांवापासून लांब जंगलात मकाण तयार करून तेथें राहिण्यास गेले आता आम्हास व लेंपाडपावरून बुकें घेण्यास येनार मानसास मोठी तकलीप पडत असते व गांवात बुक नाहींस मिळत. आम्हांहीस बहुत दूर जावे लागत. तर सरकारानी बुकाहीचा कारखाना गावात ठेवण्याचा हुकम सरकारास केल्यास आम्हांवराडी मानसास व मुलाहीस लोकर जे पाहिजे ते बुक घेण्यास नीट सोय होईल व कारखाना गांवांबटेकलातर सरकारचीहकरीही जंगलापेक्षां गावात उजार होईल. व गावात मकानही किरायाने मिळल व आम्हां लोकावर सरकारचे मोठे उपकार होतील

एक वराडी इस्कुलात नानार

## नोटिसा

नोटिस—नारायण वलद रामजी बोदबकार रहाणार मौजे निंबी तालुके अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमच्याकडे घेणें आमची ज्वारि मुदल ३ तीन खंड्या व याची वाढ पांचशेरीम मुदल रुपये ११ अकरा मे व्याजें असे आम्ही मागितलें असतां दिले नाहींत सबब या नोटिशीनें तुम्हास कळवितों कीं तुम्ही ही नोटिस पावल्यापासून च्यार दिवसांचे आंत ज्वारी व रुपये आम्हास आणून द्यावेत. न दिल्यास कायद्याप्रमाणें तजवीज करून ज्वारी, रुपये व या नोटिशीचा खर्च तुम्हापासून भरून घेऊ कळावें तारीख ९ माहे आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) नारायण रावजी गंधे द. खु.

नोटिस—येका वलद आर्जुन माळी घांगळे धाणेगांवकर हल्लीं वस्ती मौजे नांद्रे तालुके मलकापुर यांस खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुझ्यासी माझा पाठ लागल्यास सुमारे पाच वर्षें झालीं. यानंतर वर्षें सहा महिने मी तुझ्या येथें येत जात होते. परंतु मग न रीतिप्रमाणें तुजसी मजसी संग घडला नाहीं. तत्रापि मी कांहीं दिवस पर्यंत कोणाजवळ न सांगता तशीच राहिले. अखेर माझी खात्री झाली कीं तूं नपुंसक आहेस, नंतर कांहीं दिवस नाऊ देऊन शेवटीं मी आपले आई बापाजवळ सांगितलें तेव्हां पासून फारकत देण्याविषयीं म्हणत आहे. या दरम्यान पंच मारफतीनें हें बोलणें केल्यावरून तूं फारकती देण्याचें कबूल ही केलेस यांप्रमाणें स्टांप कागदावर लिहून दिले नाहीं. आणि पंच लोकांची ही सदरहु पंचाईतीवरून तूं नपुंसक असल्याची खात्री झाली आहे. आतां तुझ्याच्यानें माझा सुख संसार होत नाहीं असें झालें. यास्तव या नोटिशीनें कळवितें कीं आतां तरी पंचांत कबूल केल्याप्रमाणें ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत फारकती द्यावी तसें न झाल्यास आतां मी बिलकूल वाट न पहातां दुसरे तजविजीस लागेन मग मी माहेरीं तीन वर्षें राहिली त्याबद्दल पोटगीचा खर्च व या नोटिशीचा खर्च भरून घेईन हें समजून नोटिस पावल्याबरोबर मुदतीचे आंत फारकत देण्याचें करावें. कळावें तारीख २७ माहे जुलई सन १८७० इसवी.

[सही] सखू मर्द येको माळी

नोटिस बाकेरखा वलद गणानी तेली राहाणार माळापुर यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुजशी माझें लग्न झाल्यास सुमारे १६ वर्षें झालीं. इतक्या मुदतींत तूं मातें च्यार महिने मात्र मला आपले घरीं नेलें होतें. पण तुझ्या आईनें मला फार जाच केला व माझे माय बापाचे घरचें लुगडें मी नेसलेलें होतें तें देखील फेडून घेतलें आणि तेव्हांपासून आजपर्यंत माझे पोषण ही दिलें नाहीं. तर आज १६ वर्षांचे पोटगीचे रुपये दरमहा च्यार प्रमाणें ७६८ रुपये होतात ते ही नोटिस पोचल्यापासून ८ दिवसांत माझे आईबापास आणून द्यावे. तूं मला नांदविण्यास खुषी असल्यास तर तुजपाशीं राहून संसार करण्यास मी कबूल आहे परंतु तुझी आई व बहिण वगैरे चांगल्या चालीचीं नाहींत व जाती बाहेर टाकलेलीं आहेत सबब यांच्यांत मिसळून मी तुझ्या येथें राहण्यास कबूल नाहीं तूं जर अकोल्यांत येऊन माझ्यापाशीं संसार करण्यास कबूल असल्यास तर माझे आईबाप तुला राहण्यास व इतर जी यानंतर न होण्या जोगी असेल ती मदत देण्यास कबूल आहेत. आणि तुला हें पतकरत नसेल तर मला गंधर्व करण्याकरितां फारकत द्यावी. या दोहींतून कोणतीही तजवीज तूं आठ दिवसांत करणार नाहींस व पोट

गीचे रुपये देणार नाहींस तर तुमचर कायद्याप्रमाणें कमाचा हक्क संबंध तोडण्याचा व पोटगीची फिर्याद करीन मग तिचा खर्च व या नोटिशीचा खर्च द्यावा लागेल कळावें तारीख १० माहे आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) बायजा मर्द उकिरडा तेली

---

नोटिसीचें उत्तर तुकाराम वलद महादाजी आत्रजकर दलाल वस्ती पेठ बाळापुर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुम्ही नोटिस ता० १६ जुलई सन मजकूरची दिलेली पोहोचली त्यांत तुम्ही लिहिता कीं आमच्यावर कांहीं एक दोष न ठेवितां जाती बाहेर ठेविलें व त्यामुळें नुकसानी आमची फार होते तर याचा खुलासा आम्हांस कळवावा नाहीं पक्षीं एकंदर नुकसानीची फिर्याद करूं वगैरे मजकूर त्यास याचें उत्तर येणेंकरून तप शिलवार.

पूर्वीं तुमची वर्तणुक आमच्या ध्यार शिष्याप्रमाणें असोन जाती धर्माप्रमाणें होती स्यं प्रकारची वर्तणूक तुमची गुरुशीं होती अलीकडेस एक वर्ष झालें तुम्ही म्हणतां कीं आम्ही तुमच्या मठांतील शिष्य नसोन दुसरे मठांतील आम्ही शिष्ये आहोत त्यामुळें तुमचे मठाशीं आम्हास जरीं नसोन दुसरे मठाकडेस आमचा यापुढें संबंध आहे. असें सर्व तुम्ही पंचां समक्ष कबूल करितां व असें जर आहे तर आम्हास तुमच्या विषयींची कांहीं एक परवा नसोन अर्थी अर्थीहि संबंध आमचा गुरुत्वाचा व तुमचा शिष्यत्वाचा राहिला नाहीं व यामुळेंच आम्ही तुम्हास बोल सांगू शकत नाहीं सदरहू लिहिलेल्या संबंधापासूनच सर्व याची खात्री होईल कीं दोषी कोण आहे? तस्मात हा जातीचा व धर्माचा खिसा अशा प्रकारच्या लिखाचें उत्तर असें प्रसिद्ध पत्रांत आमचे कडून तुम्हास जन्मभरही मिळणार नाहीं व जर तुमची पुरी असेल तर तुम्ही परत येऊन काय निकाल तुम्हास करणें असेल तो करून घ्यावा आणि पंच आम्हास उगाप्रमाणें सांगतील त्याप्रमाणें जाती धर्माप्रमाणें जे आम्हास रास्त दिसेल ते आम्ही करूं तुमचा गुरुभक्ती किती प्रकारे उत्तम आहे हें पाहून फारच आश्चर्य आहे आतां वर्तमानपत्रांत तुम्ही एकदम फिर्याद करूं म्हणोन लिहिलें तर हें लिहिणें केवळ गुरूच्या व गादीच्या नामास फारच अपमान कारक आहे. नोटिशीचा खर्च मिळणार नाहीं. व कितीही तुम्ही नोटिसा अशा बाबदीत दिल्या तर त्याचा जबाब आमचे कडून तुम्हास मिळणार नाहीं तुमच्या नोटिशीचा निरर्थक दुसरे पडले याबदलचा जो खर्च लागला आहे तो तुमच्या पासून घेतला जाईल हे खात्रीनें जाणावें कळावें तारिख १२

१ पंचाक्षरी अप्पा }
१ देवलींग अप्पा } मठाधिकारी
१ व्यंकुअप्पा }
१ हरिअप्पा गठुले
१ सोमाअप्पा डागर

---

नोटिस—बापू वलद महादु पाटील मसले मेंड्याची वाडी व जामीन राघनी सदाशीव दिवेकर मो० बळसदेव यांस देण्यांत येते कीं, तुम्हा म्हणजे बापूवाडे यांस यदा आम्ही आपलें न० १३ चें टक्के शेत बटाईनें लावलें असून आज तूं तीन महिन्यांत शेताची मेहनत व वहीवाट केली नाहीं, व लातेदार रामाजी हाच वहिवाट करित असल्या बद्दल या अंकांत त्यास नोटिस दिली आहे ती पहून जर तुला आतां तें 'टक्के' भागीनें करणें असल्यास ही नोटीस पावल्या पासून २० वीस दिवसांत तूं देऊळगांवीं येऊन दुसरा करारनामा अम्हास लिहून व नोंदऊन द्यावा वयेतोस किंवा नाहीं तें ही १५ दिवसांत उलट नोटीशीनें कळवावें जर मुदतींत उत्तर न आलें व येणें हो न झालें तर तुम्ही आंत दारास मिळून आमचें नुकसान करता असें समजून व तुमचा वहीवा करार नामा बिन रजिस्टर आहे सबब आम्हीं आपले मताचे इच्छे प्रमाणें व्यवस्था करूं तुम्ही जर पुढें हरकत वगैरे करालतर तुम्हावर सर्व आमचे नुकसानीची फिर्याद या नोटीसीचें आधारें केली जाईल कळावें तारिख ९ माहे आगष्ट सन १८७०

(सही) विठ्ठल आत्माराम हागे मु० देऊळगांव राजा द० खु०

---

नोटिस—रामचंद्र विश्वनाथ हागे मौजे पळस देव ता० इंदापूर जि० पुणें यांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येतें कीं, मौ० मजकुरीं सरवे नं० १६ आकार रु० १० चें टक्के नामक शेत आपलें पांच भाऊ मिळून आहे तें आपण दरसाल पाळी प्रमाणें एकेक भाऊ वहिवाटीत आहे. त्याप्रमाणें हल्लीं सन १२८० फसली साल आमचें आहे तुम्हीं गुदस्त सालीं पाळी हरणा वाई कोण हालीहागे होती असून तिला हरकत केली तशी आम्हास न व्हावी म्हणून आम्ही गेले चे माहिन्यांत पळसदेवीं येऊन तुमचे समक्ष शेत भागीनें बापू वल्लद नाहादु बांबे वेडयाचे वाडीकर यांस लावून आणें करारनामा ही तुमचे साक्षिनिशीं दिला आहे. तीच तुम्हास सबब होऊन करारनामा व कदिम वहिवाट न मानतां रामामाळी याजकडून शेतांत पाळी घालवून तुम्हीच वहिवाट करणार आहां असें आम्हास पक्कें समजलें आहे. तरी या नोटिशीनें तुम्हास कळवितों कीं ही पावतांच वाटे यास आजचे याच अंकांत दिलेले नोटिशी प्रमाणें तो इकडे येण्यास कबूल असेल तर शेत त्याचें स्वाधीन करावें नसल्यास तर्ये आमची व दिण मगुबाई आहे तिचे स्वाधीन शेत करून केल्या बद्दल ही नोटिस पावले तारखे पासून १५ दिवसांत नोटिशीनेंच आम्हास कळवावें. मात्र पेरणी हंगामापूर्वी वर लिहिले प्रमाणें न केलां व मुदतशीर उत्तर न पाठविलां स्वस्थ बसून तुम्हीच यंदा टक्के वहिवाटाल तर या नोटिशीचे व करारनाम्याचे व मागील कागदपत्राचे वगैरे आधारानें तुम्हावर सालमजकूरचें ह त्यास उत्तमप्रतीचें होणार आहे. सबब त्याचे नुकसानी बद्दल रुपये ३०० व या नोटिशीचा आणि फिर्यादीचा खर्च रीती प्रमाणें फिर्याद करून भरून घेऊं हें तुम्ही पूर्ण पणें लक्षांत आणून करणें तें करावें कळावे तारिख १२ माहे आगष्ट सन १८७० ई.

[सही] विठ्ठल आत्मरामहागे मु० देऊळगांव राजा ता. चिखली जिल्हे बुलढाणें द. खु.

---

# पद्यात्मक यशवंत चरित्र.

सर्वांस कळावें कीं, ज्यांचें औदार्य, भूतदया, सहनशीलता, परोपकार, धैर्य इत्यादि अनेक सद्गुणांही चहूंकडे सत्कीर्ति गाजत आहे असा लोकोत्तर पुण्यश्लोक पुरुष यशवंतराव महादेव भासेकर हल्लीं मामलेदार तालुके बागलाण ठाणें सटाणें जिल्हा नासिक यांचें आम्ही पद्यात्मक वर्णन करून या ग्रंथास "पद्यात्मक यशवंत चरित्र" हें नांव दिलें आहे. यांत त्या सत्पुरुषाच्या स्वाभाविक स्थितीचें, वर्णन क्रमाचें आणि हेतूनुरूप घडून आलेल्या आश्चर्यकारक गोष्टीचें आर्या श्लोकादि कवितेच्या बहुतेक वृत्तांनी वर्णन लिहिले सद्गृहस्थांच्या उदारमताश्रयाच्या उभारणीनें करून पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत सुंदर टाइपावर छापावयास दिले आहे. हा ग्रंथ आगष्ट सन मजकुर महिन्यांत छपून तयार होईल. याची अष्टपत्री साच्याची पृष्टें सुमारें पाऊणशे पर्यंत (७५) होतील. व कागद नामी असून मोहरेदार घेतला आहे. याची किंमत सुलभ पडावी म्हणून आगाऊ सदरहु आगष्ट महिन्याचे आंत आश्रय देणारास प्रत्येक प्रतीस ०१० व मागाहून घेणारांस ०१२ आणे किंमत ठेविली आहे. मांग महान् महान् सत्पुरुष म्हणजे (साधु) होऊन गेले, त्याच योग्यतेची प्रस्तुत या महीवर ही यशवंत विभूति असल्याचें सर्वत्र प्रसिद्ध असून याचे चरित्रातील अनुभवजन्य कथन केलेल्या वर्णनावरून ही तसे विषयीं सर्वांची खात्री होईल.

या माझ्या परिश्रमाच्या साफल्यास खालीं लिहिल्या ठिकाणीं "उदारांच्या त्यांच्या सोयी प्रमाणें" सर्वांकडून उदार आश्रय मिळेल ही पूर्ण आशा आहे.

पुणें—ज्ञानप्रकाशाचे म्यानेजर यांजकडे.

मुंबई—रा. रा. महादेव चिमणाजी आपटे बी. ए. श्रीमंत जगंनाथ शांकरशेठ यांच्या इंग्रजी स्कूलचे हेडमास्तर यांजकडे.

नगर—रा. रा. सदाशिव यशवंत गाडगीळ डेप्युटी रजिस्ट्रार यांजकडे.

संगमनेर—ता० म० जिल्हा अहमदनगर रा. रा. गोविंद शंकर पिंपळखरे वकील कोर्ट मजकुर यांजकडे.

पंढरपूर—रा. रा. गोविंद विनायक रिसबूड म्युनिसिपालिटी कडील सेक्रेटरी यांजकडे.

नाशिक—रा. रा. रामचंद्र बल्लाळ व टर्बेन मुजूमदार वस्ती पेठ आदितवार यांजकडे.

धुळें—खालीं सही करणार मालक यांजकडे.

शिरपूर—जिल्हा खानदेश येथें रा. रा. पुरुषोत्तम नारायण सांजर यांजकडे.

सदरों दर्शविल्या ठिकाणीं रोख किंवा तप बाहेर गांवच्यासुद्धां टिकिटां पोष्टपह पत्रांनीं पाठविल्या म्हणजे त्या त्या हस्ते टपाल मार्गें मुदतशीर पुस्तकें पोंचविलीं जातील.

ता० २८ मे सन १८७०

केशव सदाशिव रिसबूड.
संगमनेरकर.

---

## जाहिरात.

ड्रॉइंग मास्तर तालुका स्कूल धुळें जिल्हा खानदेश.

किमतीचा दराव. रु.
वर्षाची आगाऊ देणारास ... ...१
साल अखेर ... ... ...७
सहा महिन्याची आगाऊ ... ...१ ८
एक अंकास ९

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ५२ अंकांबद्दल टपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व सालअखेर १ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरु तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही आता मागील हिशोब लक्षांत नवें साल चालू होई तेपून १ महिन्याची मुदत समजावी

---

नोटिसा वगैरे छापण्याचा दर.
१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ०१८
इंग्रजी नोटिशीचे दर ओळीस ०२
एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

---

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते शक्यतोंच लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नांवें तरी शक्यतोंच लिहावीं. तसें नसून नोटिसांत वगैरे कांहीं नावागांवांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अक्टोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरु केलें त्यास अजीच वर्ष होऊन गेलें तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. जाहीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिविण्याची तसदी त्यांनीं आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां सर्वतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिला मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं.

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजवरची व मागील गुदस्त गेल्यासालाबद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहादररुपयास अर्धा आणा प्रमाणें व्याज द्यावें लागेल. ता. १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छ. प. फडके

# वऱ्हाडसमाचार.

THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.

VOL 5 AKOLA:—SATURDAY EVENING— AUGUST 20, 1870 NO 34.

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २० माहे आगष्ट सन १८७० इ०. अंक ३४


## वऱ्हाडसमाचाराच्या बाक्या व त्या संबंधानें विशेष विनंती.

या विषयीं अशा स्थलीं व तेंही विस्तृत लिहिण्यास वाईट वाटतें, परंतु निरुपाया आज आम्हीं या दोन ओळी लिहित आहो, या ज्यांस लागू असतील त्यांनीं क्रोधवश न होतां पैसे पाठवून आम्हांस सत्वर हाय करावें असें आम्हीं त्यास प्रार्थितों.

अकोल्यास आमचा छापखाना येऊन तीन वर्षें झालीं. व एथें वऱ्हाडसमाचार पत्र चालू झाल्यास सपटेंबर महिन्याचे अखेरीस तीन वर्षें पुरीं होतील. या कारखान्याचें एथील सर्व हिशेब तेव्हांपासूनचे आहेत. आम्हीकडील अनुभवावरून असें दिसून आलें आहे कीं, छापखान्याचा गुजारा विशेषेंकरून वर्तमानपत्रावरच होत आहे. व कित्येक व्यवस्थितलोक वऱ्हाड समाचाराचे रुपये अगाऊ पाठवितात व कित्येक वर्षअखेर पाठवितात. व नोटिसा पाठविणार कित्येक लोक राहत, या इतक्यांच्या औदार्यावर व काळजीवर वऱ्हाडसमाचाराचें पोषण आहे, म्हणून आमच्या कारखान्यांत ज्या दहा लोकांचा चरितार्थ चालतो त्यांच्या उदर भरण्याचें व कुटुंब संरक्षणाचें श्रेय या सद्गृहस्थांस आहे व तें असेंच अक्षय असून वर्धमानही असो असें सोत्कंठ आम्हीं इच्छितों.

आतां राहिलेली गोष्ट कोणती म्हणाल तर कित्येक वर्गणीदार अगाऊ किंवा साल भरल्यावरही आपल्याकडील बाकया पाठवीत नाहींत एवढेंच नव्हे. दोन दोन वर्षें होऊन गेलीं व तिसरेंही वर्ष भरत आलें आणि इतक्या अवकाशांत कारखान्याकडून त्यांस बाकया पाठविण्याविषयीं पत्रेंही पुष्कळ गेलीं परंतु त्यांच्या हृदयास त्यांपासून द्रव येण्याजोगें कांहीं झालें नाहीं. शाबास! आश्रयदातेहो, शाबास! धन्य तुमची छाती! तुम्हांकडील पैशास तीन वर्षें होत आलीं, तो कायद्याबाहेर जाण्याचा रंग आला. प्रतिआठवड्याचे पत्रांत आम्ही विनंती करित आलों, व पत्रेंही कित्येक लिहिलीं तो तुम्ही अजूनही व्यवहारदक्ष होऊनये काय? महाराज! काय हा तुमचा धिमेपणा, कीं जो आम्हांस अडचणीच्या खाचेंत निष्ठुरपणानें लोटून देत आहे व तींतून वर यावयास तुमच्या भव्य अब्रूचा पदर धरून कोर्टाच्या पायरीशी गेल्याशिवाय दुसरा टेकाच नाहीं. शाबास! हेंच तुमचें सद्यश वर्णावें काय? बाकया न देणार आश्रयदातेहो, तुम्हांस वर्तमानपत्रें वाचण्याची रुचि आहे त्याअर्थी तुम्ही ठळक लोक आहां, तुमची अब्रू मोठी आहे. तुमच्या आशेवर कारखान्यांतील दहा लोकांचें जीवन आहे. व तुम्हांस अनुकूल आहे तर कारखान्याचें ऋण जें इतकेंवर भारावलें आहे तें काढून आंगावेगळें कां टाकीत नाहीं? कारखान्याचें जीवन जर वर्तमानपत्राच्या पैशावर आहे तर त्याविषयीं हेळसांड आम्हांस करतां येणार नाहीं व थोडी अवधि आहे ती संपली म्हणजे आम्ही फिर्यादी करूं लागलों तरी सरकार त्या हातीं धरणार नाहीं व आम्हांस इनसाफ देणार नाहीं. मग आम्हीं काय बरें करावें? या किंचित व्यवहाराकरितां तुम्हींच कृपाकरून एवढ्या पल्ल्यावर गोष्ट आणूं नये यांत तुमचें थोरपण, कल्याण, व अब्रूचा बचाव आहे "झाकली मूठ सवा लाखाची" याचा लक्षणीत यांप्रसंगीं तुम्हीं वश व्हावें हें फार चांगलें आहे.

आम्हीं मोठे मातबर नाहीं व आमचा भरवसा तुम्हांवर आहे, म्हणून तुम्हां विरुद्ध कोर्टांत जाण्याचा जेव्हां प्रसंग येईल तेव्हां मोठ्या दुःखभरानेंच आम्हांस त्यास वश व्हावें लागेल, अशा कंटाळवाण्या व वाईट गोष्टीची आम्हांस तिळमात्र हौस नाहीं; परंतु करावें काय? एकेक गृहस्थाकडे तीसतीस किंवा पंचवीस पंचवीस रुपये येणें असून तुम्हांपैकीं शेदीडशें गृहस्थ हात आखडून स्वस्थ बसले आहेत, व पत्रोत्तरेंही पाठवीत नाहींत. त्यांस या आमच्या विनंतीची करुणा येवो, व त्यांचा हात पुढें होऊन खुळखुळ रुपये वाजवीत आमचे खजिन्यांत खुला होवो. म्हणजे ती त्यांनीं आम्हांस एक मोठी दणगीच दिल्या सारखे होईल. ज्या कोणास हें लिहिणें वाईट वाटेल त्यांनीं आम्हांस क्षमा करावी. या आठवड्यांत आम्हीं सर्वांस पत्रें लिहिलीं आहेत व मुदत भरत आले त्या बाकयावाले गृहस्थांस आणखीं एकवार लिहू नंतर राजमार्गास लागू. विस्तार झाला म्हणून आतां पुरें करितों.

## वकिलाचे दंडाविषयीं.

मुंबईचे हाय कोर्टांत जे इनसाफ होतात ते फारच समाधान कारक असतात अशी आलीकडे आख्या होऊन गेली आहे व खऱ्या न्यायाचें हेंच लक्षण आहे कीं त्यापासून सर्वत्र समाधान व स्तुति पसरते. धुळ्यास रावसाहेब दाजी गोविंद फर्स्ट क्लास सबॉर्डिनेट जज्ज आहेत यांनीं काशिनाथ विठ्ठल नावाच्या एका वकिलास पांच रुपये दंड केला व जिल्हाजज्जानें तो अपिलांत कायम केला असतां हाय कोर्टांतून रद्द झाला. ही गोष्ट एवढीच ऐकून इकडील लोकांस व अधिकाऱ्यांस आश्चर्य वाटेल. इकडे वकिलास विशेष तर कोठचा पण तिकडील वकिला इतका सुद्धां मान नाहीं ही जिल्ह्याच्या हुजूर कचेऱ्याची जागा असतां एथें बहुतेक न्यायाधीशापुढें वकिलांस उभे राहावें लागतें कोणी अधिकाऱ्यांनीं त्यांस मागें गोंधळ्या सारखे झगे घालण्याचा हुकूम दिला होता. एक युरोपियन न्यायाधीश अनुदार नेटिव गृहस्थांस साक्षीस बोलावून दुराग्रहानें आल्या पुढें उभे करित असतात व हाच त्यांचा बाणा म्हणावा तर यःकश्चित बाना! बुणगा कोणी टोपी पाटलुणाचा गोरा मनुष्य तितक्यांत आला तर त्यास खुर्ची सरसावून पुढें देण्याकरितां बेजार होतात तेव्हां अशा प्रकारच्या अधिकाऱ्याकडून इकडे वकील व इतर भले लोक यांनीं आपला योग्य सन्मान पावणें हें मोठें दुरपास्त आहे. अस्तु. दिवसानुदिवस वऱ्हाडांत भले अधिकारी चांगले येऊन लोकांच्या मानाचें व हक्काचें रक्षण होवो अशी आमची इच्छा आहे.

धुळ्याचे दाजी गोविंद यांनीं सदरहु वकिलास दंड करण्याचे कामांत आपला राग, दुराग्रह, व कायद्याचें अज्ञान दाखविलें आहे असें दिसतें. व ही गोष्ट त्यांनीं आपल्या वऱ्हाडा सारख्या प्रांतांत असून केली असती तर ती उलटली नसती पण तें पडलें मुंबई इलाखा, व अखेर पल्ल्या सपडलें हायकोर्टा सारखें उत्तम कोर्ट, म्हणून. त्यांनीं गैरशिस्तीनें बांधलेली दंडाची इमारत समूळ ढासळून पडली यांत दोष कोणाचा! असो. आतां त्या मुकदम्याची थोडक्यांत आम्ही हकीकत सांगतो.

रावसाहेब दाजी गोविंद सबॉर्डिनेट जज्ज यांच्या पुढें एक दिवाणी मुकदमा चालत होता व त्यांत एक पक्षकाराकडून रा. काशिनाथ विठ्ठल हे वकील होते. त्यानीं साक्षीदाराकडून जबाब घेण्या करितां एक सवाल कोर्टा पुढें आणिला सब० जज्जांनीं तो सवाल करूनये म्हणून सांगितलें. वकिलास तें बरें न वाटून तो सवाल करावाच असा कित्येक वेळां त्यानें आग्रह दाखविला. व निदान कोर्टानें हा सवाल लिहून तरी घ्यावा असें सांगितलें सब. ज. नीं तें ऐकलें नाहीं व वकिलास पांच रुपये दंड केला. आणि प्रोसिडिंगांत लिहिलें कीं वकिलानें नकार केला म्हणून सन १८४६ चा आक्ट १ व हुकूम अन्वयें हा दंड केला. वकिलानें त्यावर रा० होवर्ट साहेब जिल्हा जज्ज यांजकडे अपील केलें त्यांनीं त्याच्या चौकशींत आपलें मत असें लिहिलें कीं सन १८४६ च्या पहिल्या आक्टा प्रमाणें सब. ज. नीं दंड केला ही चूक केली. त्यांनीं आपल्या फैंडिंगांत असें लिहिलें कीं स. ज. चे लिहिण्यावरून वकिलानें कोर्टाची बेअदबी केली असें दिसतें सबब त्यास पिनल कोडचे २२८ वे कलमा अन्वयें शिक्षा योग्य आहे म्हणून आम्हीं ती मंजूर करितों आणि मालूम असें वाटतें कीं वकिलानें आपण होऊन आपणास शिक्षेस पात्र करून घेतलें. होवर्ट साहेब आणखीं असें लिहितात कीं सबा. ज. नीं या दंडाच्या वाट त्याची चौकशी बरोबर केली नाहीं. क्रिमिनल प्रोसिजर कोडच्या १६३ वे कलमा प्रमाणें वाहिवाट करणें त्यांस योग्य होतें. व अपराध्याचे सदर्हू अपराधा बद्दल काय बोलणें होतें तें लिहून घेऊन ठरावयास चुकावयाचें नव्हते. आतां हा गैरशिस्तपणा चौकशीच्या कामीं झाला परंतु तेणें करून गैरइनसाफ झाला असें आम्हांस न दिसल्यामुळें आम्हीं क्रि० प्रो० को० च्या ४३९ कलमा प्रमाणें त्याचा ठराव फिरवित नाहीं.

यानंतर वकील मजकूर यानें मुंबईचे हायकोर्टास अर्ज केला कीं सबा० जज्ज व नि० जज्ज यानीं हा दंड करण्यांत कायद्याची चूक केली आहे ती दुरुस्त होऊन दंड रद्द व्हावा. हायकोर्टानें धुळ्याहून दोन्ही कोर्टांचे कागदपत्र आणविले. अर्जदारतर्फे वकील नानाभाई हरिदास हे होते. धुळ्याहून सरकारतर्फे शिक्षेची मजबुदी राखण्यास कोणी हजर नव्हते व एकतर्फी चौकशी सुरू झाली.

मि० जस्टिस गिब्स साहेब म्हणाले कीं, सबार्डिनेट जज्जाचे हुकुमाचा प्रथम विचार करू. सन १८४६ चे पहिले आक्टांत फक्त एक १० वें कलम या बाबतींत आहे त्यांत प्रिन्सिपल सदरअमीन व सदर अमीन वकिलास दंड करण्यास मुक्त्यार असल्याचें लिहिलें आहे. व प्रि० स० अमीन हा हुद्दा फर्स्ट क्लास सबा० जज्जाचाच आहे. याजकरितां वकील कोण कोणत्या प्रसंगीं स० ज० चे दंडास पात्र होतो तें पाहण्याचें आम्हांस अगत्य दिसलें. तेव्हां वकिलास दंड करण्याचे प्रसंगात सन १८२७ चा का० २ बाब ६ ही मात्र दिसून आली. तिजमध्यें कलम ५० रकम ३, कलम ५१ रकम २, व क० ५४ रकम १ हे वकिलाचे अपराधार्थ दंड करण्याचे भाग आहेत त्यांत फी घेऊन वकील कराराप्रमाणें न वर्तेल, घेतलेले कागदपत्र कुळास परत न देईल, व कोर्टास कळविल्यावाचून गैरहजर राहील तर दंडाची शिक्षा सांगितली आहे व यांपैकीं एकही प्रकार अर्जदाराकडून घडला नाहीं. व यावरून वकील काशिनाथ विठ्ठल सन १८४६ चे पहिले आक्टाप्रमाणें दंड करण्याजोगा अपराधी नाहीं सबब सबा० जज्जाचा हुकूम चुकीचा आहे.

आतां जिल्हा जज्जाचे लिहिण्याचा विचार करूं. यांनीं सबार्डिनेट जज्जाची कायद्याची चुकी काढलीच. आणखीं त्यांनीं पिनल कोडचे २२८ क० प्रमाणें बेअदबीचा गुन्हा होतो असें त्या गोष्टीचें स्थापन केलें आहे. ते म्हणतात स० ज० चे लिहिलेल्या शब्दांत हा अपराध येतो. परंतु दंडाच्या शिक्षेंत बदल करीत नाहींत. त्यांचे मनांत आणखीं एक अशी शंका आली कीं स० ज० पुढें क्रि० प्रो० च्या १६३ क० प्रमाणें चौकशी झाली नाहीं, व त्याच प्रो० च्या ४३९ क० प्रमाणें त्यांत हात घालण्यास आपणास अधिकार नाहीं असें ही त्यांच्या मनांत आलें. आम्हांस वाटतें कीं १६३ कलमांतील ठरावावर अपील आहे. व ४१३ कलमाप्रमाणें जिल्हा जज्जाचा हुकूम शेवटचा आहे. आणि ज

म्हाकडेस या कामीं रेव. अपील झालें नाहीं; तथापि स. १८२७चे दुसरे कायद्याप्रमाणे इनसाफाचे कागद आणवून पाहण्याचा मयोग्य दिसला तसा हुकूम देण्याचा आम्हांस अधिकार आहे व त्यांत ही गोष्ट येऊं शकते नंतर मिठिंद कौसलचे किंत्येक मुकदम्यांचे एथें दाखले दाखविण्यांत आले. व त्यांच्या आधारें मि. जस्टिस गिब्स साहेब म्हणाले कीं जर अर्जदारास कोर्टाच्या नेमलेल्या अपराधाकरितां आरोपी ठरविलें असतें व त्याच्या बचावा विषयींचें त्याचें बोलणें लिहून घेतलें असतें तर आम्हांस यांत हात घालण्यास जागा नसती; परंतु हा लिहून घेण्याचा प्रकार या प्रकरणांत, राहून गेला आहे सबब हेंच कारण याकोर्टाचे हुकूम फिरविण्या; व दंड परत करण्याचा हुकुम देण्यास स्वत सिद्ध पुरें आहे. व तसें करावें असा या कोर्टाचा हुकुम आहे.

## वसूल.

| | |
|---|---|
| म. डाकटर सिक्रा साहेब. | १२८८ |
| रेवरेंड एटाकिन साहेब | ६ |
| श्री. रा. अपा साहेब जमखंडीकर. | ९८४ |
| मे. ताजुद्दीन साहेब. | ९८१२ |
| रा. रा. श्रीराम भिकाजी जटार. | ६ |
| ,, रामकृष्ण महिपत. | ८८१५८६ |
| मि. नाळकरामजी पोलिस इन्स्पे. | ९८४ |
| ,, मिंडदखा कंट्राक्टर. | १४ |
| रा. रामचंद्र विनायक मास्तर | ७ |
| ,, दौलतराव देशमुख | २३८१० |
| ,, शिवराम गड्याजी कुळ० | १५८१२ |
| ,, मोरो रावजी वकील | २० |
| ,, केशव यादव वकील | ६ |
| ,, विनायक शिवराम कोबिंगझार्क | ८ |
| ,, राजाराम बापाजी खामगावकर | ९८४ |
| मि. आसदखां | ३८८ |
| मि. अनासबेग इनामदार | ८ |
| कुसगिलाल कलाल | ११ |

## वऱ्हाड

हैदराबादचे दिवाण साहेब नवाब सालर जंग बहादुर यांस स्टार आफ इंडिया हा किताब मागेंच मिळाला आहे तो महाराणी साहेबानीं आणखी वाढवून वरच्या प्रतीचा दिला. म्हणजे ते आतां नाईट ग्रांड कम्यांडर आफ दि स्टार आफ इंडिया या पदवींस आले. या दिवाण साहेबांची लायकी इंग्लिश सरकारांत दिसानुदिवस वाढत आहे ही मोठी संतोषाची गोष्ट आहे. या उभय राज्य संकतांत आमच्या वऱ्हाड प्रांतास कायमची सौख्यस्थिति येण्याचा एकादे प्रसंगीं फायदा होवो असे आम्हीं इच्छितों व तसा कांहीं रंगही कदाचित असेल,

उमरावती शहरास बडाळी एथील पाणी बांधून आणून पुरवावें व त्यास सुमारें ? लक्ष रुपये खर्च येईल तो कांहीं सरकारानें, व कांहीं मुनसिपाल कमेटीनें, व कांहीं लोकांनीं आपल्यावर कर घेऊन पुरवावा अशी सम प्रकाशाची सिफारस आहे.

मि. जी आर एन सेलबी यांस वऱ्हाडांत मोजणीखात्याकडे प्रोबेशनरी असिस्टंट नेमलें ते आपले कामावर येऊन रुजू झाले.

उमरावतीचिया स्माल्लकाज कोर्टांचे मुकरच

नउन मेनर मैजोज तीन महिन्यांचे हक्काचे रजेवर गेले होते ते परत येऊन त्यानीं आपले कामाचा चार्ज मि. निकोलेट यांज जवळून तारीख ११ मिनहू रोजीं घेऊन आपलें काम पाहूं लागले.

मि. रतनजी जामासजी आसिस्टंट कमिशनर व फुलगांवर माजिस्ट्रेट हे घोड्यावरून पडल्या मुळें त्यांची तबीयत बिघडली आहे हलीं ते दोन महिन्यांचे हक्काची रजा घेऊन तारीख १२ रोजीं उमरावतीहून पुणें, मुंबई वगैरे ठिकाणीं जाण्याकरितां रवाना झाले. त्यांचे जाग्यावर मि. निकोलेट साहेब होणार अशी बोलवा आहे. मग कोण येईल तें पाहावें. स. प.

### अकोला

मे. लायल साहेब कमिशनर बुलढाण्याहून उदईक यथें येतील.

मे. हार्डन साहेब डिपुटी कमिशनर संबाचे दुसरे तारखेस विलायतेचे रजेवर जाणार.

या आठवड्यांत पर्जन्यानें चांगली घाड दिली. व हवाही मोठी रमणीय झाली आहे. रोगराई कांहीं नाहीं. तरी शेतांतू पाणी फार झाल्यानें पिकास नुकसान आहे असें म्हणतात.

डाक्टरखात्याकडे पोलिसाकडून पगार चविण्याची जी वहिवाट सुरू झाली आहे ती फारच गैर सोईची व तेणेंकरून बारीक लोकांस पगार मिळण्यास पहिल्याहून पट वेळ लागूं लागला असा चहूकडून बोभाटा आमचे कडे आला आहे तर डायरेक्टर साहेबानीं या कामीं चांगली नजर रवून जेणेंकरून खेड्यापाड्यांत पडलेल्या रीब गुरीब मास्तर लोकांची गैरसोय नाहींशी होईल व त्यांस पगार लवकर मिळेल तें करावें म्हणजे त्यांच्या दयालु पणास व ज्ञानास भूषण होईल.

## वर्तमानसार.

लढाईसंबंधी बातम्या—स्ट्रासबर्ग येथें चहूकडून जर्मन फौजेनें वेढा दिला त्यामुळें तथील फ्रेंच सैन्य पारिसकडे मागें हटलें—फ्रान्स देशांत प्रशियन लोक राहात त्यांस काढून देण्याचा इरादा आहे—प्रशियाचे राजानें जाहिरनामा काढिला कीं सुखवस्तु फ्रेंच लोक आमचे राष्ट्रांत राहिल्यास आम्हांकडून त्यांस उपद्रव होणार नाहीं. आमची लढाई तरवार धरणारांशीं बर आहे—लढाईमुळें स्पेनचें राजधानीशहर माद्रिद एथेंही मोठी गडबड झाली आहे—फ्रेंचांचें सैन्य मेस एथें जमत आहे व प्रशियाचे घोडेस्वार वगैरे त्या नजीक येत आहेत. मोठा युध्द संग्राम होण्याचा प्रसंग आतांच आहे—फ्रेंच बादशहाचा पुत्र लंडन शहरास गेला आहे—प्राशियन लोकांनीं फ्रेंचाचें नान्सी शहर घेतलें—जर्मनीच्या वायव्य भागास फ्रेंचांचा गराडा पडला—जर्मन लोकांचीं १४०० कुटुंबें पारिस शहरांतून हाकून लाविलीं—पारिस शहराचें उपनगर लाविलेट एथें गडबड झाली आहे—१६ वे तारखेस मेस नजीक १२ तास एक लढाई झाली तींत दोन्हीही बाजू आपआपला जय झाला असें लिहितात.

कोल्हापूर इलाख्याचा गुदस्त सालचा वार्षिक रिपोर्ट न्यायाधिशांकडून महाराजास जाऊन तो छापून प्रसिद्ध झाला आहे. मटोंच दरबारांतून असल्या गोष्टी बाहेर पडूं लागल्या हें दशाचें सुचिन्ह होय.

केप आफ गुडहोपकडे हिऱ्याच्या खाणीचा तपास लागला आहे.

महाबळेश्वरास जुलाई अखेर पावेतों १९७ इंच पाऊस पडला व माथेरानास २५१ इंच पडला असें समजतें.

हिंदुलोकांच लग्न संबंधीं खर्च कमुकच असावे वगैरे याजकडे सरकार लक्ष पुरविणार अशी ऐकिव बातमी होती ती खरी नाहीं.

न्यूयार्क येथें उन्हाच्या तापानें ६० मनुष्यें मरण पावलीं व येकास उष्णता सोसेना म्हणून त्यानें जीव दिला. काय हा अनर्थ!

रा. रा. गणेशशास्त्री मालवणकर यांचे हायकोर्टांतील अपिलाचा या आठवड्यांत निकाल होणार होता.

रजपुत संस्थानांत सरकारी रेलवेचें काम फार झपाट्यानें चाललें आहे. एप्रील महिन्यांत सुरवात झाली तर आज २९ मैल पावेतों साधे सडकेचें काम तयार झालें आहे व आणखी चार महिन्यांनीं साही नदीचा पूल शिवाय करून बाकी ५० मैल पावतो म्हणजे दिल्लीपासून रेवारी पावेतों आगगाडी चालू होईल असा सुमार आहे.

म्हैसूर व कुर्ग येथील चीफ कमिशनरास सरकारी बंगल्याबद्दल भाडें पडत असे तें माफ केलें आहे. व त्यांचे पगारही इतर चीफकमिशनरा बरोबर केले आहेत.

मुरारचे छावणींत कांहीं गडबड झाल्याची बातमी आहे. परंतु सरकारी खबर त्याविषयीं कांहींच नाहीं त्यावरून ती खरी नसावी.

कलकत्यांतील बाबू लोकांत वर्गणी चालली आहे ५००० रु०जमवावे व बाबू लाल मित्र यास विलायतेस लोकांच्या लोकल सेसचे कराबद्दल वगैरे तकरारी सांगावयास पाठवावे असा विचार आहे.

मुंबईचे आनरेबल मि. टकर साहेब कौसलदार ६ महिन्यांचे रजेवर विलायतेस जाणार म्हणून बातमी होती ती खोटी ठरली.

मुंबईहून तीन लक्ष रुपयांची मोत्यें विलायतेस गेलीं होतीं. पारिस शहरांत वगैरे त्यांचा खप व्हावयाचा परंतु लढाईच कारणानें झाला नाहीं. आतां तीं मोत्यें परत येत आहेत तेव्हां मुंबईसही त्यांचा भाव कांहीं उतरेल असें दिसतें.

असीरगडास कांहीं आरब सरदार नजर कैदेंत आहेत व त्यांवर देखरेखीस एक सरकारी आफिसर आहे त्याचे हाताखालीं एक दुभाष्या देण्याविषयीं सरकारानें महिन्याचे १००रुपयांचें सांगशन केलें आहे.

बेकारी कडील झाला रेलवेचें काम फार समाधानकारक रितीनें चाललें आहे.

वायव्यप्रांताच्या रिविन्यु कोर्टानें हायकोर्टाचेठरावावरून असें सरक्युलर केलें आहे कीं इनकम ट्याक्स संबंधीं जी चौकशी चालावयाची ती खुद कलेक्टरचे समोर चालली पाहिजे.

इघुगास नदीच्या पुरानें नुकसान झालें याचें पत्रक तयार केलें आहे त्याची बेरीज २२१८०९ रुपये आहे. त्यांत कित्येक लोकांनीं रकमा फुगवून लिहिल्या त्या बरोबर रचें नुकसान झालें तें वजा करून लोकांस निव्वळ नुकसान शकडा साडेबारा रुपये प्रमाणें कंपनसेशन दिलें व ३३६६६.पु संबंधी इतर खर्चाकरितां लागले मिळून एकंदर १६९०० रुपये वाटले त्यांत णी किती दिले त्याचा तपशील.

| | |
|---|---|
| सावकार लोक | २००० रु० |
| कामदार लोक | १००० रु० |
| खासगीकडून | ३००० रु० |
| सरकारातून | १०९०० |
| | १६९०० |

सिंगापूरपाकडील पत्रांत असें लिहिलें आहे कीं हत्तीच्या पोटाखालून गेले असतां त्वग्रोग दूर होतात.

नभाचे राजानें पंजाब युनिवर्सिटी ११००० रुपये बक्षिस दिले व राजपुत्र ड्यूक आफ एडिनबरो यांचे नावचे स्कालरशिपाकरितां ५००० रुपये दिले व रुपये पाठविण्यास अवकाश झाला म्हणून त्याचे व्याजाबद्दल १००० रुपये पाठवून दिले. यांचें नांव वचन पाळणें.

आतां विलायतेस मार्सेलिसच्या वाटेनें येणार उतारू लोकांत फ्रेंच कारभाऱ्या कडून पास घेऊन पुढें गेलें पाहिजे. व उत्तर जर्मन फौजेचे लोकांस तर फ्रेंचांनीं तिकडून जाऊं देण्याचें मना केलें आहे.

खालीं लिहिलेले गृहस्थान मुंबई कायदे कौन्सलचे आडिशनल मेंबर नेमिले :-

१. आनरेबल ऱ्हावल्होकेट जनरल.
१. आनरेबल नेल निबल.
१. आनरेबल डी. सासून सी एस. ऐ
१. आनरेबल मंगळदास नथुभाई.
१ आनरेबल बेरामजी जीजी भाई.
१. आनरेबल जमसेटजी जीजीभाई बारोनेट.
१. गिबर्टन स्तुअर्ट.

येणें प्रमाणें गृहस्थांस नेमलें आहे.

बृ. ?.

कळपी तोफ—अमेरिकेच्या युनैटेड स्टेटस देशांत टेनेसी प्रांतांतील नाशविलें एथें राहणाऱ्या एका कारागिरानें एक मशीन प्रकारची तोफ किंवा बंदुक केली आहे. तिला १२ नळ्या असून, त्या मागून म्हणजे कान्याकडून भरता येतील अशी योजना केली आहे; आणि एक कळ केली आहे ती फिरविली म्हणजे बंदुक ६३ सेकंदांत २७ वेळां भरती व सुटते. असें म्हणतात कीं, या बंदुकीपासून दीड मैल (पाऊण कोस) अंतरावर एक पलटण असलें तर चार मिनिटांमध्यें त्यांतील दोनशें मनुष्यांचा फडशा उडवितां येईल. जर हें सर्व खरें असलें तर हें इलहाटपट काळ रूपच आहे असें म्हटलें पाहिजे, व याच्या योगानें पुढील लढायांत मनुष्यसंहार बेसुमार होत जाईल. तर राजे लोकांनीं आतां आपले वाद लढाया करून नव्हे तर पंचांकडून तोडरेत जावे, हें योग्य आहे.

कलकत्ता-वर्तमानपत्रांत असें लिहिलें आहे कीं, सरकारानें एका माहितगार इंजिनियरास, कलकत्ता शहराची तटबंदी वगैरे तपासून पाहतो व परदेशाहून जहाजां

रक्षक आल्यास तें शहर टिकाव धरून राहील किंवा कसें याविषयीं रिपोर्ट करावा म्हणून नेमलें आहे. कांहीं वालांटियर लोकांची भरती करून त्यांस हत्यारें वगैरे देऊन सरकार त्यांचा एक रिसाला करणार व पायदळही तेथें ज्यास्त ठेवणार, म्हणून दाट वदंता आहे. गवर्नर जनरल व त्यांचें कौन्सिल सिमल्याहून सालाबादच्या पेक्षां यंदा लवकर येणार आहे. या सर्वांचें कारण काय असावें? कोणी म्हणतात कीं युरोपांत लढाई चालली आहे त्यावरून, व कोणी म्हणतात कीं चीन देशांत गडबड आहे यावरून.

ता० १४ जुलै रोजीं मुंबईस रायल एशीयाटिक मंडळीची मासिक सभा भरली होती तिची हकीकत ता० ८ मिनहूच्या टैम्स आफ इंडिया पत्रांत छापली आहे. तीवरून कळतें कीं सदरील प्रसंगीं डाक्टर भाऊ दाजी सभेचे अध्यक्ष यानीं कांहीं जुनाट नाण्यांविषयीं एक आणि रावसाहेब विश्वनाथ नारायण मंडलिक यानीं महाबळेश्वर येथें कृष्णेच्या उगमाजवळ जें देवस्थान आहे तेथील भक्तीचे रीत वगैरे याविषयी एक असे दोन निबंध वाचले. पहिला निबंध ज्या ८३ नाण्यांविषयीं आहे तीं नाशिक जिल्ह्यांत मौजे देवळणा तालुके बागलाण एथें कांहीं मुलांस एकादीच्या कांठीं सांपडलीं, व तीं नाशिकचे कलेक्टर मेहरबान आर्थिकन साहेब यानीं या मंडळीकडे पाठविलीं. त्यांवर नंदीचें चित्र असून त्याच्या भोंवता "राजा परम महेश्वर, मानसमृत देवध्यान अंकास" असा लेख आहे. हीं नाणीं इसवी सनाच्या चौथ्या शतकांत दक्षिणेंतील कोण राजानें पाडलीं असावी असें डा. भाऊ ह्यांचें मत आहे. दुसरा निबंध नागपूरच्या संधानें लिहिला आहे.

कलकता येथें ता० १२ ची तार आली तिजवरून तेथून वीस लक्ष व मद्रासेहून वीस लक्ष असे चाळीस लक्ष रु० विलायतेस रवाना होणार असें समजतें. खेरीज चाळीस लक्ष मुंबईहून मिळून ८० लक्ष रु० गेले. याचा अर्थ व कारण समजत नाहीं. ज्ञा.

पार्शी लोकांतील दोन बायकांनीं कलावीणीचा धंदा करण्याकरितां नवीन कायद्याप्रमाणें आपलीं नांवें नोंदविलीं आज वरून त्या लोकांमध्यें मोठा गवगवा झाला आहे. कांहीं लोकांचें म्हणणें त्यांस पार्शी धर्मांबाहेर टाकावें व कांहीं कांचें म्हणणें तसें करतां येत नाहीं. लोक त्यांजशीं संबंध ठेवणार नाहींत परंतु त्या धर्माच्या नांवांत असें म्हणण्यास लोकांस अधिकार नाहीं.

चमत्कार—इंडियन मेडिकल ग्याझेटांत असा एक चमत्कार कळतो कीं, एका ट्रोरियनवून युरोशियन बाईबापांच्या सात आठवड्यांच्या मुलीच्या स्तनांतून एक चमचाभर दूध निघतें. त्या दुधांत सर्व दुधाचे योग्य गुण आहेत असें समजतें.

नागपुर येथें पाण्याच्या पुरवठ्याची सोय करण्याकरितां हिंदुस्थानसरकारानें तीन लक्ष पंचेचाळीस हजार रु० नागपुर म्युनिसिपालिटीस व्याज टक्का साडेचार टक्के व्याजानें देण्याचें कबूल केलें. यांस पांढरपट्टी तारण लावून दिली.

सर्व सवार्डिनेट जज्ज म्हणजे मुनसफ वगैरे व सर्व सवार्डिनेट माजिस्ट्रेट म्हणजे मामलेदार या सर्वांकडे गवरमेंट ग्याझेट ह्मणजे सरकारी ग्याझेट याची एकेक प्रत पाठवीत जावी असा ठराव झाला.

कलकत्ता येथील आदि ब्रम्हसमाजाचे मुख्य प्रधान आचार्य बाबू देवेंद्रनाथ टागोर यांनीं पुष्कळ दिवस समाजाचें वगैरे काम चालविलें. आतां सर्व प्रपंच वगैरेची विशेष लटपट सोडून हिमालयामध्यें धर्मशाळा या गांवीं स्वस्थ परमेश्वर चिंतनांत आपला काळ घालविण्याचा त्यांनीं निश्चय केला आहे. असें मिररवरून कळतें. इं. प्र.

मुंबईसरकारावर फिर्याद—आमचे समजण्यांत असें आलें आहे कीं, नंदुरबार एथील जमीदार यांनीं खानदेश डिस्ट्रिक्ट कोर्टांत मुंबई सरकारावर फिर्याद दिली आहे. फिर्यादींतील दाव्याची रकम २.२४,६२३८७८७ ची आहे. हल्लीं तिची तपासणी होऊन राजिष्टरांत दाखल होईल. फिर्याद करण्याचें मुख्य कारण असें आहे कीं, जमीदार लोकांकडेस बहुत दिवस चालले हक्क शाबीद करून पुन्हा त्याप्रमाणें ते हक्क आपलेकडे पूर्ववत प्रमाणें चालावे ह्मणून आहे. खा. वै.

हिंदूंचे मृत्युपत्राचा कायदा—या कायद्याचा मसुदा गव्हरनर जनरल यांचे कायदेकौन्सिलापुढें पुष्कळ दिवस पावेतों घत होता. सर्व हिंदुस्थानांतील हिंदु लोक या कायद्यास नाखुष असून त्यांणीं कडा अर्जी केले होते. परंतु ते सर्व कोकडे राहून अखेरीस थोडे दिवसांपूर्वी तो कायदा पसंत झाल्याचें समजतें. हा कायदा तारीख १ सप्टेंबर १८७० पासून अमलांत येईल. जी कलमें नसण्याविषय हिंदु लोक इतके झटत होते तीं कलमें या कायद्यांत कायम ठेविलीं आहेत असें समजतें. सरकारचेच कृपेनें होईल हिंदु लोक सुशिक्षित विद्यासुसंपन्न होऊन सांप्रत त्यांस त्यांच्या अवश्यकता चांगल्या समजूं लागल्या आहेत, ही गोष्ट सरकार समजत आहे असें असतां सर्व हिंदुलोकांचे मताचा धिक्कार करून आपल्याच मतास इतकें महत्व आमचे सरकारानें देणें हें थोडें आश्चर्यास्पद खरें.

हिंदुस्थान सरकारानें तावांतील सरकारांस कळविलें आहे कीं, आतां सरकारी कारखान्यासाठीं जितक्या ["फोरेमन" [कारखान्यांत देखरेख करणारांनो मुख्य असतो तो) लोकांची आपणास जरूर आहे, तितके आयते तयार मिळणार नाहींत करितां रेलवेचवगैरे कामांकरितां उपकरणाची जरूर आहे त्यांत देशी लोकांस तयार करण्याची फार मेहेनत घेतली पाहिजे. सबब रेलवे वगैरे मोठ मोठे लोकोपयोगी कामाचे कारखाने सरकार सुरू करील त्यांत येऊन हें काम शिकण्याकरितां लोकांस उत्तेजन दिलें पाहिजे. यास एक विशेष खात्रीचा उपाय दिसतो कीं, कांहीं मोठ मोठ्या कारखान्यांचे संबंधानें एक एक शाळा स्थापावी आणि तींत उच्च प्रतीचे कसबाचें हरकोणतेंहि काम जबाबदारीनें करण्याकरितां जे विशेष होतकरू दिसतील त्या लोकांस शाळेंत घेऊन यांत्रिक शास्त्राचीं मूलतत्वें व नकाशे काढण्याचें वगैरे शिकवावें. सबब या गोष्टीस हिंदुस्थान सरकार विशेष महत्व देत आहे. हें जर त्या त्या तावांतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मनावर चांगलें ठसविलें तर या उपायापासून सरकाराचा इरादा सिद्धीस जाईल यांत संशय नाहीं. हिंदुस्थान सरकारचें असें म्हणणें नाहीं कीं, हिंदु लोकांचे अंगीं जबाबदारीनें काम करण्याचें सामर्थ्य आल्या वांचून व त्या बद्दलची पुरी खातरी झाल्यावांचून त्यांस फोरमेनच्या जागा द्याव्या. परंतु या लिहिण्याचा मुख्य उद्देश असा आहे कीं, वरील जबाबदारीच्या जागा नेटिवांस लायक करण्याकरितां व योग्य सतत उपाय तावांतील सरकारांनीं केले पाहिजेत. हा उद्देश सिद्धीस नेण्याकरितां जे उपाय किंवा ज्या सूचना योग्य दिसतील त्या कळविण्या विषयीं हिंदुस्थान सरकारानें तावांतील सरकारास लिहिलें आहे. ने. ओ.

डाक्टर भाऊ दाजी यांच्या एथें आनरेबल गिबस, आनरे० केनाल, डाक्टर युलेट व आणखी तीन साहेब ता० भाऊ यांचे औषध घेणाऱ्या रक्तपितिग्रस्तांस पाहण्याकरितां गेले होते. त्यांनीं फार बारीक रीतीनें रोग्याची परीक्षा केली, व त्यापैकीं कितीएक रोग्यांस पुष्कळ गुण पडला त्यावरून त्यांस आश्चर्य वाटलें.

ठाण्यास बऱ्याच दिवसांपासून महामारीचा उपद्रव चालला आहे तो अद्याप शमला नाहीं असें तेथील पत्रावरून कळतें.

मुंबई सरकारानें मद्रास सरकारास असें लिहिलें आहे कीं, बहुतकरून येत्या नोवेंबरच्या १ ल्या तारखेस कलबुर्ग्याच्या पलीकडे कृष्णानदीपर्यंत आगगाडी चालू होईल, आणि ता० १ जानुएरी १८७१ च्या सुमारास रायचुरापर्यंत नुसतें एंजिन जाऊं लागेल. मद्रासेकडून रायचुराकडे जो लोखंडी रस्ता होत आहे तो १८७१ च्या मार्चपर्यंत पुरा होणार नाहीं असें मद्रास सरकारास वाटतें. ज्ञा. द.

नगरांत गेले आठवड्यांत पर्जन्यानें उग्ररूप धारण केलें होतें. त्यांत विशेष गोष्ट ही कीं, विजांचा चमचमाट व मेघांचा कडकडाट जो कांहीं विलक्षण प्रकारें झाला तसा पूर्वी वीस पंचवीस वर्षांत झाला नसेल असी सर्वतोमुखीं बोलवा आहे. त्या प्रसंगीं लहान मुलें भेदरलीं हें विशेष नवल नाहीं; परंतु मोठमोठ्यांचें दोंक दरारले जाऊन आतां होणार तरी काय? किंवा हे प्रलयकाळचे अभिलक्षण आहेत कीं काय, अशी चिंता भाकून ते भयानें एकमेकांचा आश्रय धरून बसले. ही भयंकर रात्र बहुतकरून जागरणांतच गेली. पर्जन्य अतिशय जोरानें पडला. आतां एवढेंच सुख मानावयाचें कीं कोठें वीज पडून नाश झाल्याची अद्याप वदंता आली नाहीं. ज्ञा. सि.

---

मागाहून आलेली जाहिरात.

FOR SALE

A half bred Arabian Horse is to be sold at a cheap Price For Particulars apply to Shricrishna Myral Clerk Exec Engrs office Berar Irrigation

## जाहिरात

विक्री साठीं

[अरबी घोडा व देशी घोडी यांजपासून पैदा झालेला] आरबी घोडा स्वस्त किमतींत विकावयाचा आहे. त्याची विशेष माहिती खालीं सही करणाराकडे मिळेल.

(सही) श्रीकृष्ण मैराळ क्लार्क
इरिगेशनचे एकाझि. इंजि. आफिस
वऱ्हाड

## श्रावणीची थट्टा.

(मनोरंजक हिंदुपंचांतून.)

पात्रें—घन शामपंत, आत्मारामपंत, सदाशिवभट, हरभट, बाब्या, व पंच.

नारळी पोर्णिमेचे दिवशीं श्रावणीचे अनुष्ठानास सुधारलेली मंडळी जमली. व सदाशिव भटांनीं आचमन करून आरंभ केला. सुमुखश्चैकदंतश्च० इतक्यांत—

घन:—भटजी भटजी हीं ढोंगें आम्हांस नकोत. संक्षेपांत सांगा व दोषनिरसनार्थ संकल्प चालवा म्हणजे झालें.

भटजी—बरें आहे चालूद्या.

श्लोक

॥देव नाहीं धर्म नाहीं कर्म नाहीं भुमंडळीं ॥
॥फक्त एक असे वर्मचर्म भेद नसे तया॥१॥

म्हणा:—केशव राव बी. ए, नारायण राव एम. ए, माधव राव एल.एल. बी, गोविंद राव बी. ए, राव बहादुर विष्णुपंत, खा बहा. मधुसूदनराव, आली बाहदुर. त्रिविक्रमनाना, इत्यादि चतुर्विंशति नामानि कृत्वा

श्लोक

॥तीन वर्षें कृतं पापं शत्रुत्वा साधितं मया विधवाविवाह योगानें, खन्या बापा क्षमा करीं ॥ १ ॥ दूधवाही जलं॥ ग्लासं नशीपीठंच स्कूर्ना ॥ पीठा रोपति कांटयानें॥ दाहि चमचा वगृह्यतां॥२॥ ॥ लाहिरी कोवताचा तो॥ द्रव्यें कडानि खर्चिलं॥ वकील बारिष्टराशींतो॥ साह्य घेऊनिगां तया ॥ ३ ॥

म्हणा—चार अब्दपर्यंतं पापं कृतंमया अन्यथा भाषणं, धर्मभ्रष्टता स्वीकार नूतन यादी कृता बहया तद्दोष शमनार्थं पंचगव्यं करिष्ये.

सदाशिव—महाराज आतां पंचगव्य प्राशन करा.

आत्माराम.—आम्हीं नाहीं बाबा घेणार. गाईचा गू घेतो कोण? उगाच गू खाण्याचा आग्रह कां!

सदाशिव.—जसें तुमच्या कज्जांत एकाद्यास लवादनामा लिहवावा त्याचा अनुमतानें कज्जा घेणें तसाच हा प्रकार आहे.

घन:—बरें बाबा गू माती द्या एकदां.

व. घेतात.

श्लोक

। मान्वी होन मया दत्ता गळे वृथा आतां तुम्हीं ॥ जीर्ण काढोनि टाकावे, तोडिन पाहिजे तरी ॥ १ ॥

सदाशि० आतां गोमूत्रस्नान. महाराज घ्या! हातांत गोमुत्र.

घन:शा०—काय हो असें हें तांबड्या रंगाचें सें काय दिसतें? बाटली वदलली नाहींनां?

पायांस चोळण्याकरितां दारू ठेविली होती वाळू ती आणली नाहींनांर?

बाल्या.—नाय बा! माला काय ठाव कपण हा गोमूतर दिसतांका नाय?

हरभट.—अहो तुम्हांस दुसरें कांहींच दिसत नाहीं. वेढ! अशी कुठें गोष्ट तरी घडेल?

सदा०. हं चालूद्या. समिधा आहो होम करा. विचाराय स्वाहा, सुधारणा इदंनमम. धर्माय स्वाहा, कदाचरणाय इदंनम म.—सुकर्मा य स्वाहा! वेदांत पुस्तकाय इदंनमम.—पुनर्विवाहाय स्वाहा. पाटाय इदंनमम. कामा वास्याय स्वाहा! पीजिंगा इदंनमम—अनेक वादाय स्वाहा बहिष्कार नि० धुराय स्वाहा डोळे फुटीव इदंनमम. शत्रुत्वाय स्वा० त्वद्दयोपरि हट मरणाय इदं नमम.

आत्माराम—अहो आतां आपले दोष गेले असतील नाहीं नेरें? आतां यहेंसे सोडावाटर घेऊन त्यावर थोडें तीर्थ घेऊ. कायहो माहाभेव भटजी.

पंच.—खरें हो खरें.! त्या सोडावाटरावर तीर्थच घेणें उपयोगी? त्यावर पंचगव्य काय हो करणार नाहीं. वगैरेसादिष्ट झा गेल.

---

## नोटिसा

---

**नो**टिस—दखवी मर्द रघू गाडगे माळी रहाणार पनान तालुके मोर्तिजापुर इजकडून भ्रतारास—तू नपुंसक आहेस. व तसा असल्याबद्दल पंचानीं नेम केला कीं कलावणींचे घरीं पाठवून चौकशी करावी त्यावरून तू नपुंसक आहेस असें कलावणिचे सांगण्यावरून सिद्ध झालें. तेव्हां तू प्रात:काळीं पळून वर लिहिलेले गावीं गला आहेस. म्हणून मी नोटिस देते कीं पंधरा दिवसांचे आंत तू फारकती द्यावी नाहीं तर कांहीं योग्य कारण असल्यास दाखवावें. नाहीं तर फारकत मिळविण्याकरितां मी तुजवर दावा करीन. व दुसरी सजवीज करीन कळावें. तारीख १७ माहे आगष्ट सन १८७० इसवी मुक्काम अकोलें.

( सही ) रखमी मर्द रघू गाडगे.

**नो**टिस—सखाराम वल्लद देवजी शिंपी वस्ती मौजे लिमखेड तर्फ कारल तालुके दर्यापुर जिल्हा इलिचपुर यास गुजी मर्द सखाराम शिंपी वस्ती मौजे खंडाळे तालुके अकोट इजकडून नोटिस देण्यांत येते कीं तूं तारीख २९ माहे जुलई सन १८७० इसवी रोजीं आजगावास येऊन कबूल करून गेलास कीं मी पंधरा दिवसांनीं तुजला नांदविण्याविशीं जामीनदार आणून तुजला घेऊन जाईन याप्रमाणें कबूल करून गेलास त्यानला सुमारे वीस बावीस दिवस झाले अद्यापि जामीन आणिला नाहीं व मजला नेलें ही नाहीं त्यावरून, तुजमध्यें मजला पोसण्याचें शौर्य नाहीं असें वाटतें.

आणि मजला ऋतु प्राप्त होण्यास सुमारे च्यार पांच महिने झाले असोन तूं मजजवळ न रहातां बाहेर फिरत रहातोस तस्मात तूं पुरुषत्वांत नाहींस असें दिसत आहे.

एकंदर तु मजला आपले जवळ नेले तेव्हां जो भक्कामाणुस आकाजी शिंपी सावरकराची नामीनी दिल्हीं होती त्याजबरोबर तू मजला खाण्याविण्यास न घातल्यावरून सांणी मजला पुन्हां माझे आईचे घरीं आणून घातलें तेव्हां पासून मी आपले मातोश्रीचे घरींच आहे मजला अन्नवस्त्रा वगैरे फारच अडचण आहे यावरून या नोटिसीनें कळविण्यांत येते कीं आठ पंधरा दिवसांचे आत तू मजला दुसरा नवरा करण्याविषयीं फारकती द्यावी या नोटिसीचा खर्चा बद्दल तुजवर फिर्याद करून रुपये घेतले जातील कळावें. तारिख १४ माहे अगष्ट सन १८७० इसवी मुक्काम खंडाळें

[ सही ] गुजी मर्द सखाराम शिंपी वस्ती खंडाळ निशाणी हातची नांगडोची

---

**नो**टिस—राजश्री उपाजी वल्लद माहादजी रहाणार मौजे दवचौंन तालुके मलकापूर यासी भवानी वल्लद सटवाजी माळी खेगत रहाणार कसबे फतेखेडें तालुके मेहेकर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं आमची कन्याची बायको नांमे मुक्ती ही मनपासून पळून गेली तिचा शोध करितां मी जिवंत असतां तुम्ही तिजी पाठ लाविला त्याचें कारण आम्हास जरूर समजलें पाहीजे याजकरितां तुम्ही जातीमें आमच गावीं नोटिस पावल्या दिवसापासून दहा दिवसाचे आत आपले जातींत येऊन कारण दाखवावें असें आपण न केल्यास रितीप्रमाणें आम्हीं सरकारांत फिर्याद करूं. तारिख १६ माहे आगष्ट सन १८७० इसवी

[ सही ] भवानी वल्लद सटवाजी माळी खेगत निशाणी हातचा नांगर

---

## जाहिराती.

### संस्कृत आणि प्राकृत कोश.

**ही** नवीन "डिक्स्नारी"यांत अमरकोश, त्रिकांडकोष, मेदिनी हारावली, एकाक्षरि ह्या पांच कोशांतील संस्कृत शब्दांस लिंग, अंत व प्राकृत अर्थ जितके होतात तितके लिहून अकारादि निघंटरीनें तयार करून छापणें सुरू आहे. या कोशाची सर्वांस आवश्यकता असून विशेषें करून शाळाखात्यांतील मास्तर व विद्यार्थी लोकांस फारच उपयोगी आहे. हें बुक चांगले शाही कागदावर छापीत आहों. ज्यास हें बुक पाहिजे असेल त्यांणीं माहे आक्टोबर सन १८७० इ० चे आंत पैसा पाठविल्यास एक प्रतीस रुपये ४ पडतील. बाहेरगांवचे घेणारे यांस डांक हाशिल पडणार नाहीं. पैसा पाठविणें तो हुंडीनें अगर नोटीनें किंवा पोस्टाच्या तिकिटा पाठविणें झाल्यास दर रुपयास ८१ प्रमाणें वर्ताबळा पाठविला पाहिजे. सर्व टिकिटा ८८६ दराच्या पाठविल्यास वर्ताळ्याबद्दल दर रुपयास ८८६ पाठविल्यास हरकत नाहीं. हीं पुस्तकें थोडीं छापीत आहों यास्तव आमची भरती होई पावेतों ज्या लोकांकडून आगाऊ पैसा येईल त्यास हीं बुकें मिळतील. भरती झाल्यावर उशीरानें पैसा येईल तो ज्यांचा त्यांस परत करूं यास्तव ज्यांस हें पुस्तक पाहिजे असेल त्यांणीं पैसा लवकर पाठवावयाची तजवीज ठेवावी.

पुणें, ता० १७ माहे आगष्ट सन १८७० } नारो आप्पाजी गडबोले.

## पद्यात्मक यशवंत चरित्र.

**सर्वांस** कळावें कीं, ज्याचें औदार्य, भूतदया, सहनशीलता, परोपकार, धैर्य इत्यादि अनेक सद्गुणांची चहूंकडे सत्कीर्ति गाजत आहे असा कोकोत्तर पुण्यश्लोक पुरुष यशवंतराव महादेव भोसेकर वकीं मामलेदार तालुके बागलाण ठाणें सटाणें जिल्हा नासिक याचें आम्ही पद्यात्मक वर्णन करून या ग्रंथास "पद्यात्मक यशवंत चरित्र" हें नाव दिलें आहे. यांत त्या सत्पुरुषाच्या स्वाभाविक स्थितीचें, वर्णन क्रमाचे आणि हेतूनुरूप घडून आलेल्या आश्चर्यकारक गोष्टीचे आर्या श्लोकादि कवितेचा बहुतेक वृत्तांनी वर्णन कित्येक सद्गृहस्थांच्या उत्तेजनाश्रयाच्या उभारणीनें करून पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत सुंदर टाइपावर छापावयास दिलें आहे. हा ग्रंथ आगष्ट सन मजकुर महिन्यांत छापून तयार होईल. याची अष्टपत्री आकाराची पृष्ठें सुमारें पाउणशे पर्यंत ( ७५ ) होतील. व कागद गाढी असून मोहरेदार घातला आहे. याची किंमत सुलभ पडावी म्हणून आगाऊ तहरहु आगष्ट महिन्याचे आंत आश्रय देणारांस प्रत्येक प्रतीस ८१० व मागाहून घेणारांस ८१२ आणे किंमत ठेविली आ[illegible]. यांचे महान् महान् सत्पुरुष म्हणजे साधु ) होऊन गेले, त्यांत यशवंतची प्रकृत या महीवर ही यशवंत विभूति यास त्याचें सर्वत्र प्रसिद्ध असून या चरित्रांतील अनुभवजन्य कथन केलेल्या वर्णनावरून हो तसें विषयीं सर्वांची खात्री होईल.

या माझ्या परिश्रमाच्या साफल्यास खालीं लिहिल्या ठिकाणीं "ज्यांच्या त्याच्या सोयी प्रमाणें" सर्वांकडून उदार आश्रय मिळेल ही पूर्ण आशा आहे.

पुणें—ज्ञानप्रकाशाचे म्यानेजर यांजकडे.

मुंबई—रा. रा. महादेव चिमणाजी आपटे बी. ए. श्रीमंत सगुणाबाईसाहेब यांच्या इंग्लिश स्कुलचे हेडमास्तर यांजकडे.

नगर—रा. रा. सदाशिव यशवंत गोडबोले डेप्युटी रजिस्ट्रार यांजकडे.

संगमनेर—ता० म० जिल्हा अहमदनगर रा. रा. गोविंद शंकर पिंपळखरे वकील कोर्ट मजकुर यांजकडे.

पंढरपूर—रा. रा. गोविंद विनायक रिसबूड म्युनिसिपालिटी कचेरीचे सेक्रेटरी यांजकडे.

नाशिक—रा. रा. रामचंद्र बल्लाळ व टवर्धन मुजूमदार वस्ती पेठ आदितवार यांजकडे.

धुळें—शाळीं सही करणार यांजकडे.

शिरपूर—जिल्हा खानदेश येथें रा. रा. पुरुषोत्तम नारायण मानकर यांजकडे.

सदरी दर्शविल्या ठिकाणीं रोख किंमत अगर वर्ताबळ्यासुद्धा टिकिटा पोष्टेज पत्रांनीं पाठवाव्या म्हणजे त्या त्यांस त्या डपाक मार्गे मुदतशीर पुस्तकें पाठविलीं जातील.

ता० २८ मे सन १८७०

### केशव सदाशिव रिसबूड.

संगमनेरकर.

ट्रेनिंग मास्तर तालुका स्कूल धुळें जिल्हा खानदेश.

---

## जाहिरात.

### किंमतीचे दराव.

| | |
|---|---|
| वर्षाची आगाऊ देणारास | १ |
| डाक खर्च | ७ |
| सहा महिन्याची आगाऊ | १ ८ |
| एक अंकास | ९ |

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे ९१ आठवड्यांबद्दल डपाल खर्च आगाऊ पडेल तो १ रु. ४ आणे व डाकखर्च १ रु० ८ आणे.

आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र घेण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही त्यांचा मागील हिशेब साफ नसेल तर डाक चालू होऊन तेथून १ महिन्याची मुदत समजावी

### नोटिसा वगैरे छापण्याचे दर.

| | |
|---|---|
| १० ओळी पर्यंत | १ रुपया |
| १० ओळींवर प्रत्येक ओळीस | ०१८६ |
| इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस | ०८ |

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस ठरावाप्रमाणें किंमत पडेल.

---

TO OUR SUBCRIBERS.

We beg to reqest that our Subscribers will forward as soon as possible their suscriptions for the present year; and trust that they will be so goo as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berr Samachar*

---

सूचना—नोटिसा इतर मजकूर छापावयास पाठविणारांनीं ते सालकोस लिहिल्यास फार चांगलें. तेवढ्यात मनुष्यांचीं व गावांचीं नांवें तरी सालकोस लिहावीं. तसें नसून नोटिसांवगैरे कांहीं नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हावर नाहीं.

एडिटर व० स०

---

## वर्गणिदारांस विनंती.

सन १८६७ चे आक्टोबर महिन्यांत सदरहू अकोल्यास वऱ्हाडसमाचार पत्र सुरू केलें त्यास अजीच वर्षें होऊन गेलीं तर अजून बहुत न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हास मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार लेख लिहविण्याची तसदी त्यांनीं आम्हास देऊं नये व आपणास घेऊं नये. याकरितां प्रत्येकें आमची त्यांस ही विनंती आहे. व हिचा मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र येथून बंद करून ज्या लोकांनीं आमचा दरवर्षीं मागील गुदस्त गेल्यासाला बद्दलची बाकी येणें असल्यास पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दर रुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज पडूं लागेल. ता १ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

---

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां छ. म. केळे

# वऱ्हाड समाचार.

**THE VARAD SAMACHAR OR NEWS OF BERAR.**

VOL. 5 AKOLA:—SATURDAY EVENING— AUGUST 27, 1870 NO 35

पुस्तक ५. अकोला, शनिवार सायंकाळ तारीख २७ माहे आगष्ट सन १८७० इ०. अंक ३५


## देऊळगावराजा एथील खून.

पैशाकरितां उलट्या काळजाचीं माणसें काय करितील, व काय न करितील याचा नियम नाहीं. दहा रुपयांच्या अंगावरील दागिन्याकरितां देखील निर्दय व क्रूर मनुष्यें तान्ह्या व गोजिरवाण्या बालकांचे प्राण घेतात. असे मुकद्दमे आपण पाहिले आहेत. व यांत तर एक लाख रुपयांचें आमिष होतें म्हणून या लटक्याचें स्वरूपही भयंकर झालें. या प्रकरणांत मोठ्या मानवान व धनवान राजघराण्यांतील दोघा पुरुषांनीं आपला भाचा ३२ वर्षांचे वयाचा सर्व काम कान पहात होता तो विष घालून मारिला आहे. याची थोडक्यांत हकीकत सांगतो.

या देऊळगावास बालाजीचें संस्थान मोठें आहे. त्या बालाजीस लाखो रुपयांची वर्षास कानगी येत असते. व देवास तो गाव जहागिर आहे. त्याजबद्दल राजे मानशिंग व कारभारी हरिसा यांचा किमेक वर्षे वाद चालला होता व नऊ लक्ष रुपयांची फिर्याद कित्येक कोडतांतून चालत होती व रेसिडेंट साहेबांकडे तिचा अखेर निकाल राजे मानशिंग यांचे वतीनें झाला. ही गोष्ट वाचकांस ठाऊक असलेच. हे राजे मानशिंग वयानें लहान दहा बारा वर्षांचे असून पहिल्यापासून सर्व कुटुंबासुद्धां हैदराबादेसच राहत होते ते गुदस्तां आपली मालकी ठरल्यावर देऊळगावास आले. व त्यांचे सापत्न बंधू रासोजीराव हे प्रौढ व हुशार असल्यामुळें ते सर्व कारभार पहात होते. संस्थानचा वाद सुरू होता तेव्हां खर्चाकरितां जालनापुरचे सावकार कन्हय्यालाल यापासून वेळोवेळ लागेल तें कर्ज घेतलें आहे. व राजे हैदराबादेहून आले नव्हते तेव्हां सर्व कारभार राजाचे मामा राजे रामचंद्रराव बाबा साहेब, व कन्हय्यालाल सावकार, व दाजी नारायण वकील हे पाहात होते व रासोजीरावांनींही कारभार त्यांकडेसच ठेऊन त्यांस मोठाल्या नेमणुका करून दिल्या होत्या. कन्हय्यालाल सालीना तीन हजार रुपये, व मामा रामचंद्रराव आणि दाजी नारायण यांस दोन दोन हजार रुपये असा सालीना नेमणुका करून दिल्या होत्या व त्या शिवाय कारकून दहा पंधरा, शिरस्तेदार, शिपाई वगैरे संस्थानाकडे फार मोठा खर्च होता.

गुदस्तांचे दसऱ्याचे यात्रेंत बालाजीस कानगी सुमारें पावणे दोन लक्ष रुपयांची मिळाली असा शोध आहे. त्या पैकी संस्थान वहीस सारे ७४००० रुपये जमा आहेत बाकीचा दाखला नाहीं व ते रुपये राजे रामचंद्र राव, दाजी नारायण वकील वगैरे मंडळीनीं लांबविल्याच्या अंदेशावरून रासोजी राव यांनीं संस्थानचे कागद पत्रांचा तपास करण्याचा निश्चय केला व सर्व लोकांस ताकिदी दिल्या कीं अमुक दिवशीं तुमची चौकशी करावयाची आहे तर तुम्ही कागद पत्र तयार ठेवावे व त्या नियमित दिवसाच्या पूर्वी थोडे दिवस रासोजीराव हा विशेष आजार नसतां ताड फाड मेला तेव्हां चौकशी झाली त्या वेळेस कांहीं पत्ता लागला नाहीं परंतु संशय राहिला. पुढें हल्लीं कृत कर्मी लोकांचें पाप उघडीस येऊन हा मुकदमा पुन्हां धरला गेला. यांत सरकार तर्फे इतका पुरावा झाला कीं रासोजीस एकंदर तीनदा विष घातलें. या कामांत आरोपी १ रामचंद्र राव देसाई २ गोविंदराव देसाई, ३ दाजी नारायण वकील, ४ नारायण शास्त्री, ५ विठ्ठलराव, ६ नारायण खंडेराव, व सातवा गणेश दास मारवाडी हे होते. नंबर एक व दोन हे मयताचे मामा असून त्यांतून पहिल्यास मयता पासून २००० रुपयांची नेमणूक होती. तिसरे नंबरचा आरोपी हा मयताच्या पदरीं कित्येक वर्षे सालीना २००७ रुपये घेऊन वकीली करणार आहे. नारायण शास्त्री हा या गांवचा वैद्य नंबर पांच व साहा हे मयताच्या पदरचे संस्थानचे कारकून व मारवाडी हा एक या गांवचा दुकानदार होय. असा पुरावा झाला आहे कीं हे सातजण मयतास विष घालून मारण्या करितां कट करित होते. गणेश दास यांचे दुकानांतून सोमल खरेदी केला, नारायण शास्त्री वैद्य यानें रासोजी करितां कांहीं नवीन उत्तम औषध तयार केलें आहे अशी सदरहु मंडळीनीं त्याकडे शिफारस केल्यावरून रासोजीनें औषध घेतलें. तें पांढरें चूर्ण होतें. दोन प्रहरचे भोजनांत रामचंद्रराव व गोविंदराव यांनीं रासोजीस आपल्या घरचा कांहीं मासाचा पदार्थ फरमाशी म्हणून आणून वाढला व त्यांत एक पांढरी पुडी कालविली होती नंतर त्याचा वाला झाला तेव्हांही नारायण शास्त्री वैद्य यानें एक पांढरी पुडि त्यास दिली. व तें तिन्हीं वेळचें एकच सोमल या नांवचें विष होतें व त्याचे योगानें रासोजिराव हा तिसरे प्रहरीं मरण पावला.

आरोपितांनीं आपले तर्फे मयताची बायको, सापत्न भाई, सापत्न बंधू. व एक खिजमदगार यांच्या साक्षी दिल्या त्यांनीं सांगितलें कीं मयतास आजार होता तेणें करून तो मेला व अन्नांत विष नव्हतें. सापत्न बंधु राजे मानशिंग हे रासोजी राजा बरोबर जेवले व खिजमतगार रासोजीचे ताटांत राहिलेलें अन्न जेवला आणि त्यांस कांहीं झालें नाहीं असा पुरावा केला.

कमिशनर मे. लायल साहेब यांनी या कामीं फार बारिक विचार करून ठराव सांगितला. तो फार विस्ताराचा आहे सबब पुढील अंकांत घेऊ. त्यांनीं ठरविलें आहे कीं, पहिलें व तिसरे वेळीं सोमलाच्या पुड्या दिल्या म्हणून पुरावा झाला आहे तो असंभव्य दिसतो. कारण विष देऊन ठार मारण्याचें अत्यंत गुप्त मसलतीचें काम तें कोणी च्यार चौघे लोक भोवताले असतां त्या समक्ष करणार नाहीं. मधले वेळीं जेवणाचे पदार्थांत विष घालून दिलें ही गोष्ट खरी दिसते. सराऱ्यावरील अबदुल्ला नावाच्या साक्षीदारानें सांगितलें कीं, नंबर एकचा कैदी रामचंद्रराव याचे सांगण्यावरून त्याचा बंधू नंबर दोनचा कैदी गोविंदराव यानें आपले घरून कोंबडीचे मांसाचा कांहीं पदार्थ तयार केलेला पात्रांत घालून आणिला, इतक्यांत रामचंद्ररावांनीं तें बाजूस नेऊन आपले जवळची एक पांढरी पुडी त्यांत टाकिली तेव्हां गोविंदरावानें त्यास विचारिलें कीं, सकाळीं पुडी दिली तिजपासून कांहीं झालें नाहीं काय! रामचंद्रराव म्हणाला, हो. कांहीं झालें नाहीं, म्हणून ही आणली पुडी देतो. अबदुल्ला तेथून जवळ असल्या कारणानें व समोरचे दार उघडें असल्याकारणानें त्यानें तें कृत्य पाहिलें व तें बोलणें ऐकिलें, व आम्हांस तें भरवशाचें दिसतें. संस्थानचे पैशांतून लाख रुपये नाहींसे झाले त्यांतून रामचंद्ररावानें १०,००० रुपये खाल्ले व रासोजी राव त्यांची झडती घेणार होता हा पुरावा झाला आहे. तेव्हां या सर्वांच्या छपावणी करितां त्या दोघा भाऊ भावांनीं रासोजीरावाचे जेवणांत खचित विष घातलें असावें अशी आमची खात्री होते राणी आहे त्याबाई मयताची सापत्न आई हिच्या साक्षीवर आम्हीं भरवसा ठेवित नाहीं, कां तर रासोजी हा तिचा सापत्न मुलगा असून रामचंद्रराव व गोविंदराव हे तिचे सख्खे बंधू त्यांच्या बचावाकरितां ती खोटें बोलेल व दुसऱ्या साक्षीवरही कित्येक कारणांनीं भरंवसा ठेवितां येत नाहीं, सबब कैदी रामचंद्रराव व गोविंदराव यांजवर रासोजीराव यास विष घालून मारल्याचा गुन्हा शाबित आहे व त्या करितां त्या दोघांस जन्मपर्यंत काळेपाण्यावर पाठविण्याची शिक्षा आम्हीं देतों. व बाकीचे पांच आरोपितांवर गुन्हा शाबित नाहीं सबब त्यांस सोडून देतों.

हा ठराव ऐकून पुष्कळ लोकांनीं माना डोलविल्या व मे० लायल साहेब यांचे न्यायाची तारिफ केली.

आतां संस्थानचा पैसा नाहींसा झाला व तो कामदार वगैरे लोकांकडे गेला याची चौकशी सुरू होणार आहे.

हें एकंदर प्रकरण फारच भयंकर होय व हें करणारांची छातीही दगडाची होय. एकवेळ चौकशी होऊन हा अपराध छपला गेला होता परंतु पाप फार दिवस छपत नाहीं अशी म्हण आहे त्याप्रमाणें ईश्वरानें त्यांचें दुष्ट कृत्य उघडीस आणिलें व त्यांस शासन दिलें हें योग्य झालें. पुढील चौकशींतही न्यायाचें खरें स्वरूप बाहेर पडून अपराध्यास शासन व निरपराधी वृथा गांजले गेले असतील तर त्यांस पुनःश्री खप मिळो असें आम्हीं इच्छितों.

कोणी म्हणतात कीं या लटक्याच्या प्रभावानें लाच खाऊ लोक बरेच भ्याले आहेत. ईश्वर करो आणि तें भय त्यांस अक्षय असो. सभय राहून प्रतिष्ठित वागणूकीनें नगावें हें, निर्भयपणें तोंडास काळें लावणारीं कृत्यें करून मरण्यापेक्षां फार चांगलें आहे असें त्यांचेठायीं उपतिष्ठेल तर फार चांगलें होईल.

## लढाई.

फ्रेंच व प्रशियन लोकांची या आठवड्यांत नवी एकादी लढाई झाली नाहीं. ता० १४, १६, व १८ रोजीं मिळून तीन लढाया झाल्या त्यांत प्रशियन ४०००० व फ्रेंच ५०००० मेले, जखमी झाले, व कैद झाले अशीं वर्तमानें आहेत. लढायांत प्रशियन लोकांचा जय झाला व फ्रेंच पराभव पावले. दोन्ही सैन्याचे मुख्य भाग नवझ जवळ आले आहेत तेव्हां लवकरच एकादी मोठी लढाई होईल असा सुमार आहे. लढाई या देवीनें विक्राळ वदन पसरलें आहे, ९०००० मनुष्यांचा फाराळ झाला, भोजन समारंभ अजून पुढेंच आहे, त्यांत किति लाख खपतात पहावें।

## सुभाषित श्लोक.

कीर्तनासि नरहो[1] तुम्हि जा गा ॥ कीर्तनासि नरहो तुम्हि जागों[2] ॥ कीर्तनासि नरहो तुम्हि जागों[3] ॥ कीर्तनासि नरहो तुम्हि जा गों[4] ॥ १॥ घडीभरीच्या विषयासुखाला ॥ देवा जसा बाहतसे पखाला ॥ लोकांगमे चांग वऱ्हाड आलें ॥ वऱ्हाड नाहें वरहाड आलें ॥ २ ॥ गेला न तीर्थीं नर पाव[5]लान ॥ त्याला हरी तो कधि पावलों[6] न ॥ गाठीं कयाच्या नरि पावलों[7] न ॥ ताडी तया बाईलें[8] पावलानें ॥ ३भांगीं[9] कांतीं[11] नाकात रोयां[12] ॥किल्या बिधीनें नर कातरोंया[13] ॥ जो सांपडेना नर कातरोंया ॥ तो योग्य होतां नरका तराया ॥ ४ ॥

१ संबोधन. २ स्थळ. ३ निजूनका. ४ देवाचे गुणानुवाद गा. ५ पायानें ६ प्रसन्न झाला. ७ चार आणे. ८ बायको. ९ लायांनीं १० सोनें ११ स्त्रिया १२ कर्तरी. १३ कातरण्यास.

# वऱ्हाडाकरितां मुनसिपल रूल.

आमानी मुलखांत सन १८६७ चे १५ वे आकटोबर हुकुम ज्या मुनसिपल कमिट्या हल्लीं आहेत व पुढें होतील त्या सर्वांच्या स्थापना व अधिकार खालीं लिहिलेले नियमाप्रमाणें असावेत असें हैदराबादचे रेसिडेंट साहेबांनीं ठरविलें आहे.

१. मुनसिपल कमिटीमध्यें खालीप्रमाणें सरकारी कामदार व इतर गृहस्थ मेंबर असावे.

२. खालीं लिहिलेले कामदार जिल्ह्याच्या हुजूर कचेरीच्या ठिकाणीं हुद्याच्या संबंधानें मुनसिपल कमिटीचे मेंबर समजावे.

डिपुटि कमिशनर
सिविल सर्जन.
लोकलफंड इंजिनियर.
एक्झिक्युटिव इंजिनियर.
पोलिस सुपिरटेंडेंट.
आसिस्टंट कमिशनर ( त्या तालुक्याचे व शहराचे माजिस्त्रेटी अधिकाराचे)

३. जिल्ह्याच्या हुजुर शहराशिवाय इतर गावीं सरकारी हुद्याच्या संबंधानें मेंबर असावेत.—

डिपुटि कमिशनर ( त्यांचे गैरहजिरींत तेथील असिस्टंट कमिशनर प्रेसिडेंट समजावे. )
असिस्टंट कमिशनर.
तहशिलदार

४. पोलिस सुपिरटेंडेंट यांस आपले जिल्ह्यांतील पाहिजे त्या गावच्या मुनसिपल कमिटीमध्यें हजर राहण्यास, संभाषण करण्यास, व स्वताचें मत देण्यास अधिकार आहे.

५. शहराच्या विस्ताराप्रमाणें व जरूरी प्रमाणें सरकारी कामदाराशिवाय इतर गृहस्थ मेंबर नेमावयाचे ते शहराच्या विस्ताराप्रमाणें व जरूरीप्रमाणें वेळोवेळ नेमावे.

६. हे मेंबर नेमावयाचे ते कमिशनराच्या लिहिण्यावरून रेसिडेंट साहेब नेमितील व त्यांचीं नावें रेसिडेन्सी आर्डरमध्यें छापून प्रसिद्ध करितील.

७. हे मेंबर दोन वर्षेपर्यंत राहतील. व पुढें दुसरे नेमले जातील किंवा विशेष कारणावरून पहिलेच कायम करण्यांत येतील.

८ विशेष अपवाद खेरिज करून जिल्ह्यांतील सर्व मुनसिपाल कमिट्यांचे प्रेसिडेंट डिपुटि कमिशनर हे होतील. व्हाईस प्रेसिडेंट सदर स्टेशनाचे जागीं सर्व मेंबरांचे अनुमतानें होईल व इतर ठिकाणीं तेथील असिस्टंट कमिशनर होतील.

९ कायद्या मध्यें मुनसिपल कमिट्यांनीं जीं जीं कामें करण्या विषयीं सांगितलें आहे त्या त्या कामाकरितां त्यांच्याकडे आलेला तो सर्व पैसा खर्च करण्यास त्यांस पूर्ण अधिकार आहे. आणि इतर कामींही कमिटीनें वरिष्ठ अधिकाऱ्यांचें सांगशन आणिल्या पूर्वी तें करावयाचें तें खालील नियमानुरूप करावें

१ पुढील वर्षीं जी जमा पावयाची व जो खर्च व्हावयाचा त्याचें बजट कमिशनरसाहेबाचे मार्फतीनें रेसिडेंटसाहेबांच्या पाब्लिक वर्क्स खात्याच्या सेक्रेटरीकडे प्रत्येक मुनसिपालकमिटीनें पाठवीत जावें. तसेंच मागील सालांत दुसऱ्या कामासाठीं योजलेला पैसा शिलक राहिला असेल तर तो नव्या दुसऱ्या कामाकरितां घेण्याविषयींची परवानगी मागत जावी. व अशा प्रकारें सांगशन आल्याशिवाय कोणतेंही काम होऊनये. व बजेट केव्हां पाठवित जावें व कशाप्रकारें पाठवित जावें त्याविषयीं वेळोवेळ ठरविलें जाईल.

२ मुनसिपल कमिटीच्या सभा भरतात त्यांचें प्रोसिडिंगाचीनक्कल माहितीकरितां कमिशनर साहेबांकडे पाठवीत जावी व त्यांस कधीं आवश्यक वाटेलतर ते रेसिडेंटसाहेबांकडे पाठवितील व ते दर तीनमहिन्यांनीं तेथील वर्तमानपत्रांत त्याची हकीकत छापवितील.

३ पांचशें किंवा त्याहून अधिक रुपयांचें इंजनेरी काम करविणें असेल तेव्हां त्याचा नकाशा व खर्चाचे अजमासाचें पत्रक सुपिरटेंडिंग इंजिनियर यांसपसंत झालेलें पाहिजे.

४ एखादें काम नवीन तयार करते वेळीं त्याचे संरक्षणा करितां पुढें खर्च लागणार असेल तर त्याचाही अजमास त्या कामाचे अजमास पत्रका बरोबर पाठवित जावा.

५ मुनसिपाल कमिटीनें सरकारास एक वार्षिक रिपोर्ट नमुना ठरवून देतील त्या प्रमाणें पाठवित जावा व त्या सोबत जमखर्चाचा हिशेब पाठवित जावा.

१० सन १८६७ चे १५ वे आकटोबरचे ९ वे कलमांत मुनसिपाल कमिटीचीं जीं कामें सांगितलीं आहेत तीं:—" प्रत्येक मुनसिपाल कमेटीनें आपले फंडांतून पोलिसा करितां जो पैसा द्यावयाचा ठराव होईल तो देऊन बाकी राहील त्यांतून सवड असेल त्याप्रमाणें सार्वजनिक रस्ते, मोऱ्या, तळीं, पाण्याचे नळ, यांची दुरुस्ती व स्वच्छता ठेवावी. रस्त्यावर पाणी शिंपावें व दिवे लावावे; तसेच नवे रस्ते, मोऱ्या, तळी, व पाण्याचे नळ बांधावे. व गरीब लोकां करितां जागा, दवाखाने, बाजार, व इतर सार्वजनिक उपयोगाचीं, सुधारणेचीं व स्वस्थतेचीं कामें करावीं व त्यांस मदत करावी, या प्रमाणेंच शहरांत नवीन शाळा घालण्यास, किंवा आहेत त्या चालविण्यास मदत करावी" रहदारी बंगले व सराया. यांचा यांत सामावेश होतो असें समजावें.

११ वरील कलमा वरून दिसते कीं मुनसिपाल कमिटीचें पहिलें काम मुनसिपल आकटाच्या १३ व्या कलमा प्रमाणें पोलिसा करितां योग्य व पुरेशी मदत करणें हें आहे. पोलिसा करितां मुनसिपल कमिटीनें काय द्यावें हें ठरविणें इलाख्याच्या सरकाराकडे आहे. आणि तसा कांहीं ठराव झाला नाहीं तोंपर्यंत हल्लीं शहर पोलिसास जो खर्च लागत आहे तो मु॰ क. नें देत जावा.

(पुढें चालु)

## वर्तमानसार.

तुर्कस्थानची खबर काबुलाकडून समजली आहे कीं कोकंद, ताशकंद, समरकंद हजरत सुलतान, आणि यार्तम एथें रशियन लोकांची सुमारें ६०००० फौज आहे व आणखी अधिकाधिक येत आहे. ताजकंद एथें शहरांत रशियन सरकारानें बराका बांधल्या त्या तोफखान्याकडे योजिल्या व शहरांबाहेर फौजेकरितां हल्लीं दुसरी छावणी बांधण्याचें काम चालू आहे. कोकंदचे कुदेयारखान यांस रशियाचे बादशहानें फरजंद अशी पदवी दिली. रशियन लोकांनीं कोकंद एथें पक्क्या सडका केल्या आहेत, व एक सुंदर बाग केला आहे. रशियन सरकारची कांहीं फौज हल्लीं यार्कंद व चीनकडे जाण्याचे तयारींत आहे

मद्रास इलाख्यास कोळशाची चांगली खाण शोधून काढण्याचा कोणी प्रयत्न करील तर त्यास ५०००० रुपयांचें इनाम मिळावें अशी सूचना झाली होती परंतु डा. ओल्डहामे साहेबांनी खात्रीपूर्वक असें कळविलें आहे कीं मद्रास इलाख्यांत कोळशाची खाण सापडण्याचा अगदि संभव नाहीं.

मुंबईच्या हाय कोर्टांत सर एम आर वेस्ट्राप साहेब चीफ जस्टिस झाले म्हणून त्यांस बारिस्टर लोकांनीं मोठी मेजवानी दिली.

रेलवे कंपन्यांनीं आप आपसात ठराव केला आहे कीं मुंबई, कलकत्ता, व लाहोर या दरम्यानच्या सर्व आगगाड्या एका वेगानें म्हणजे तासांत २५ मैल याप्रमाणें चालवावयाच्या.

मद्रासपासून सिंगापुरपर्यंत तारायंत्राचें काम चालू होतें तें पुरें होत आलें आहे.

कृष्णा नदीला पूर येऊन सांगली या गावीं १०० घरें व त्या आसपास २०० घरें वाहवलीं असें कळतें.

मुंबई सरकारचे सेक्रेटरी खात्यांत रा. रा. नारायण महादेव परमानंद हे अकटिंग असिस्टंट जुडिशल सेक्रेटरी होते त्यांस हल्लीं रिविन्यु व जनरल खात्याकडे मि. लेस्टर साहेबांचे जागीं असिस्टंट सेक्रेटरी नेमलें.

गणेश बापुजी मालवणकर यांजवर डा॰ फ्रेजर साहेबांकडे खोट्या कागदाचा मुकदमा होता तो नाशाबिद म्हणून सोडून दिला.

नोवेंबर महिन्याचे २१ वे तारखेस मुंबईंत म्याट्रिक्युलेशनची परीक्षा सुरू होईल.

वतनदार लोकांचें हक्का विषयीं मुंबईचे कायदे कौसलापुढें एक आकटाचा मसुदा येणार आहे असें समजतें. काय हरण करणार पाहावें.

काश्मिरास गेल्या महिन्याचे २९ वे तारखेस मोठी आग लागून १५० घरें जळालीं. व या महिन्याचे ४ थे तारखेस पुन्हा आग लागून ११० घरें जळालीं. मोठें नुकसान झालें. महाराज साहेबांनीं दुःखित लोकांस चांगली मदत केली.

मुंबई सरकारानें कलाकौशल्याची शाळा स्थापन करण्याचे कामाकरितां नऊ लक्ष रुपयांचें सांगशन मागितलें व त्यांपैकीं सात लक्षांचें वरिष्ठ सरकारानें कबूल केलें. तसेंच मद्रास सरकारानें एक लक्षाचें मागितलें आहे व एक लक्ष रुपये लोकांकडून मिळवावे असा त्यांचा विचार असल्याचें कळतें.

बाबूकेशव चंद्रसेनयांनीं खुद महाराणी साहेबांची भेट घेतली वत्यांचें त्यांचें भाषण झालें अशी खबर आली आहे.

कर्नल अंडरसन काठेवाडचे पालिटिकल एजंट विलायतेस रजेवर गेले होते ते परत यावयास निघाले.

आपखुषीनें शिपाईगिरी करण्यास तयार होऊन आपआपसांत पगार न घेतां पलटणी भरतात व सरकारी पलटणप्रमाणें तयारी ठेवून प्रसंग सरकारास मदत करितात त्यांस व्हालंटियर म्हणतात. तें काम जी. आय. पी. रेलवेच्या आफिसरांनीं करण्याचा विचार चालविला आहे असें कळतें.

### गैरकायदा अफू

ता॰ ५ मिगहू रोजीं इंदुराहून दक्षिणेंत गैर कायदा जात असलेली आठ पासून नऊ हजारापर्यंत किंमतीची अफू धुळयास धरली गेली. अलीकडे दोन वर्षांत धुळें तालुक्यांत बरीच गैर कायदा अफू हमेषा धरिली जाते. यावरून ह्या तालुक्यांतील सरकारी नौकर चोकसनीसपणें सरकारी नौकरी बजावितात असें समजलें पाहिजे. लोक हजारों तऱ्हेनें लबाडी करून माळव्यांतून इंग्रजी अमलांत अफू आणितात. पूर्वी एकवार धुळयासच काशीयात्रेहून गंगोदकाच्या कावडी लोकांस नेण्याचा प्रघात आहे त्याप्रमाणें यात्रेकरूचीं सोंगें घेऊन कावडींत अफू भरून नेतांना लोक पकडले गेले होतेच. ती युक्ति लोकनीं काढविली. इंदुर, ग्वालेर, हीं मराठी राज्यें आहेत व त्या राज्यांतील दरबारी लोकांचा संबंध दक्षिणेंत सातारा. फलटण वगैरे ठिकाणीं असल्यामुळें हमेष ते लोक आपल्या बरोबर दहा पांच घोडीं वगैरे घेऊन सरदारी डौलानें आपल्या देशीं जातात येतात. त्यांस मराठी दरबारचे नौकर म्हणून मार्गांत मदत करितात. अडथळा करित नाहींत. असें पाहून बयाजी बिन बाळाजी आवटे गुरव, कोंडाई मर्द सजण आतारीण राहणार फलटण व राजाराम वलद बापु शिंपी राहणार वाटीर नजीक फलटण या त्रिवर्गांनीं इंदूर दरबारचे आपण कोणी नौकर आहों असें सोंग घेऊन बरोबर कडान मोठीं सोळा घोडीं जमविलीं आणि त्या घोड्यांवरच्या जिनांत नमद्याच्या मध्यें अफूच्या थैल्या मोठ्या बंदोबस्तानें घालून वरून बुरणूस बनात वगैरे लावून उत्तम प्रतीची मराठीशाई अफूनें भरलेलीं खोगीरें घोड्यांवर घालून मोठ्या थाटानें अफू इंदुराहून दक्षिण प्रांतीं नेण्याचा क्रम चालविला होता. ही अफूभरित खोगीरें इतक्या सफाईनें शिवून तयार केलीं होतीं कीं, साधारण पाहणारास घोड्यांच्या खोगरांत कांहीं घातलें असावें असा संशय आणण्यास कांहीं जागाच नव्हती व ह्या युक्तीच्या बेमालूमपणावरून कित्येक स्वाऱ्या त्या लोकांनीं अलीकडे मारल्या असाव्या असें अनुमान होतें. आणि वास्तविक त्यांचें नशीब फुटलें नसतें व त्यांच्या युक्तीस भेद्या या ठिकाणीं पैदा झाला नसता तर आणखी पुष्कळ दिवस बयाजी राव वगैरे आपला धंदा सुरक्षितपणें चालवितें यांत संशय नाहीं.

जुडीशियलकमीटी बिल.—इकडील अपीलें विलायतेंत होतात, त्यांचा निकाल लौकर होण्यासाठीं जुडीशियल कमीटींत आणखी दोन जज्जांची नेमणूक करून त्यांच्या खर्चांसाठीं दरसाल हिंदुस्थानावर

२०००० रुपये बसमावे असें बिल कामन्सच्या सभेंत इंग्लिश प्रधानांनीं आणलें होतें; पण त्याविरुद्ध पुष्कळ मतें पडल्यामुळें व विशेषेंकरून हिंदुस्थानावर खर्चाचा बोजा ठेवण्याविरुद्ध मतें पडल्यामुळें तें नापास झालें.

सोलापुर—हल्लीं पर्जन्य अगदीं नाहीं. वारा मनस्वी सुटतो गावांत ज्वर व हगवणीचे उपद्रव झाले आहेत. आणखी थोडे दिवस पर्जन्य न पडेल तर बरें होईल.

तुरुंगावरील इन्स्पेक्टर जनराल हे ता० १९ रोजीं येथें आपले कचेरीसह आले आहेत. तुरुंगाचे हिशेब तपासणीचें काम चाललें आहे.

मौजे येकरुक येथील तळावाचें काम पाहण्याकरितां एरिगेशन सुपरिंटेंडिंग इंजिनियर मे० कर्नल फाइफ साहेब आले होते. झालेलें काम साहेबांनीं पाहून नापसंत केलें व त्याबद्दल मे० क्याबल साहेब एक्झिक्युटीव इंजिनियर यांस दोष दिला. आणि सदहू तळ्यांतील पाणी साल मजकुरीं एकदम धरूं नये असा हुकूम दिल्याचें ऐकतों. हल्लीं ठाऊर मधून पाणी सुमारें तीन स्कायर फुट मोऱ्यांत सोडलें आहे. आतां साल मजकुरीं जास्त पाणी धरतील असा रंग दिसत नाहीं. आता सदर तळ्याचें बांधणी काम मजबूद करण्याकरितां नवीन इष्टमेट करण्याचें काम त्वरित चाललें आहे. क. रु.

पुणें—विश्रामबागेंतील हायस्कुलांत दोन दिवसांपूर्वीं मोठी गंमत झाली. शाळेंतील कांहीं बाकें मोडलीं असें तेथील हेडमास्तर मि० जेकब साहेबांच्या दृष्टीस पडलें. परंतु तीं कोणीं मोडलीं हें समजेना तेव्हां साहेबांनीं असा हुकूम फर्माविला कीं, ज्या खोलींत हीं बाकें मोडलीं आहेत त्या खोलींत जाणारे अगर बसणारे जे वर्ग आहेत त्यांतील सर्व विद्यार्थ्यांनीं मिळून तीं बाकें भरून द्यावीं व त्याशिवाय त्यांनां शिक्षेदाखल उभे रहावें. ह्याप्रमाणें ते विद्यार्थी बाकें भरून देण्यास नाराजी होते असें नाहीं, पण उभे राहण्यास मात्र ते कबूल होईनात; कारण ते म्हणाले आम्हीं गुन्हा केला नाहीं. हें त्यांचें म्हणणें साहेबांस न आवडून त्यांनीं ६३ मुलें शाळेंतून एकदम हकून दिलीं. ह्याचा सर्व शहरभर बोभाट झाला आहे.

### अक्कलकोटचे राजे.

कैलासवासी श्रीमंत भोसले यांच्या गादीवर त्यांचा मुलगा उमर वर्षे ३ चा याचें नांव शाहाजीराव भोसले असें ठेवून त्यांस सरकारानें ता० २० आगस्ट रोजीं [illegible] ४ वाजतां अक्कलकोटास गादीवर बसविलें. त्यांस सन्मानार्थ सरकारांतून नांव पोषाक दिले. सर्व संस्थानच्या कारभार करण्याचा अधिकार मेजर वेंबगार्टनर साहेब यांस सरकारानें सोंपविला आहे. या समारंभाचा बेतनात मेजर साहेब यांणीं चांगला ठेविला होता. त्यांत त्यांच्या पदरचे मानकरी व श्रीमंत तळेगांवकर दाभाडे यांणीं खोपरिकोच्या संबंधानें व मानकरी यांणीं सदहु दिवशीं पोषाख केला. मेजर वेंबगार्टनर यांणीं स्वतः राजेसाहेबांस पोषाख दिला. कचेरीच्या समारंभाच्या वेळीं वाघ करून संस्थानांतून २१ तोफा वाजल्या. लोकसंख्या त्या वेळीं २००० हून जास्त होती. संस्थानच्या चालीप्रमाणें मेजर साहेब यांणीं पानसुपारी अत्तर गुलाब वाटून कचेरी बरखास्त करविली. आनंदाची साखर गांवोगांवीं पाठविली. याप्रमाणें झाल्याचें वर्तमान आम्हास कळल्यावरून संतोष झाला आहे. ज्ञा. प्र.

### मागाहून आलेल्या नोटिसा

नोटिस—सकुबाई एको माळी राहाणार निमगाव बुर्ली बस्ती मौजे मांदरें तालुके मलकापूर इजला खालीं सही करणारे याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तूं माझ्याशीं पाट लाविल्यास आज सुमारें सात वर्षें झालीं व पाट लागल्यापासून नेहमीं तूं माझे घरीं सर्व प्रकारें नीट रितीनें वागत असल्याचें जातींतील लोकांस जाहीर असून आज सुमारें च्यार महिन्यांपासून बदफैली करण्याचें इरादानें तूं माझे घरीं न राहातां माहेरीं जाउन राहिली आहेस व मजला फारकत देण्याविषयीं वऱ्हाडसमाचार तारीख १३ माहे आगष्ट सन १८७० इसवीचें वर्तमानपत्रांत नोटिस दिली आहेस त्यावरून कळविण्यांत येतें कीं तुझे नोटिसींतील मजकुर सर्व खोटा आहे मी तुझा सर्व प्रकारें पाळणपोषण करण्यास आहे याजबद्दल मागें पंचाईतींत ठरलेंच आहे. मी नपुंसक असतों तर तुझ्यानें माझे येथें सहा सात वर्षें तूं जाणती असून कधींही काढवली नसती तर ही नोटिस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत तूं माझे घरीं येऊन पूर्ववत प्रमाणें न राहिल्यास तुला फारकत तर मिळावयाची नाहींच पण जातींतून बाळीत टाकण्याविषयीं तजवीज करून एकंदर रुपये २२० | ३०० चा ऐवज घेऊन गेल्याबद्दल व माझें नुकसान आणि विश्वासघात केल्याबद्दल तुमचेवर सरकार मार्फत तजवीज केली जाईल. कळावें तारीख २३ माह आगष्ट सन १८७० इसवी.

(सही) एको वल्लद अर्जून माळी याचे हातची खुद निशाणी कुदळ.

नोटिस—खालीं सही करणार यांजकडून लिहून जाण्याची ऐसीजे जयराम बाबाजी कयकाडी पांडे वडदकर रहाणार वाशिम जात ब्राम्हण यांस कळावें कीं तुम्ही आम्ही उभयता भाऊबंद असोन तुमचे आमचे माळोदाचे तसमे दोन समाईक असोन आम्ही आपले घर पाडून नवीन तयार करितों त्यास समाईक पैकीं दोन तसमे ओहत यावर निमे तसम्याचा पेंड काढून टाकतो त्यास निमे तसम्याचा जोरा होईल तो तुम्ही काढावा अगर तुझी काढीत नसल्यास आम्ही आपले तसम्याचा पेंड काढून लाकडे वगैरे आम्ही काढून घेतों पुन्हा याजबद्दल फिर्याद केली असतां त्याची नुकसानी बद्दल व कोर्ट खर्चाबद्दल आमचे कडून काहीं मिळू शकणार नाहीं आणि आज तारखेपासून १५ पंधरा दिवसांची मुदत तुमचला दिली तारीख २४ माहे आगस्ट सन १८०० इसवी.

[सही] गोविंद पाडूरंग कयकाडी पांडे फाळेगांव परगणें वाशिम

नोटिस—सुभायतखा वल्लद नथेखा मुसलमान वस्ती कुरणखेड तालुके अकोलें यांस नोटिस देण्यांत येतें कीं तुम्हां कडेस खातेबाकी रुपये २६॥ शिवाय व्याज न घेतें अलाम देऊ दिलाऊ करितात तर या नोटिसीचे ता. पासून आठादिवसांत निकाल करावा न केल्यास नोटिसीचे खर्च सुद्धां कोर्टमार्फत रुपये घेतले जातील कळावें तारीख २३ माह आगष्ट सन १८७० इसवी

(सही) मोतीराम हिंमतराम दुकान कुरणखेड दस्तुरखुद.

नोटिस—बनजी वल्लद उदेभान पाटील रहाणार रायखेडे तालुके अकोट जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं आमचे रुपये ५०० पांचशे व शिवाय व्याज बालचंद मुलचंद याजकडून घेणें असतां त्याजपासून तुमचा गहाण रोखा नंबर १ आम्ही आपले लहन्यांत घेतला सबब नोटिस तुम्हास दिली आहे तर हे रुपये तुम्ही पंधरा दिवसांत गणोबा इवाजी बजाज तकझोरकर यास द्यावे न दिल्यास तुम्हावर दिवाणींत दावा केला जाईल कळावें तारीख २३ माहे आगष्ट सन १८७० इसवी.

[सही] महादुसा जीवनसा पटवी बाळापुरकर.

नोटिस—झनाजी वल्लद उदेभान पाटील रहाणार रायखेड तालुके आकोट यांस खालीं सही करणार याजकडून देण्यांत येतें आशीजे आमचे रुपये ५०० व शिवाय व्याज बालचंद मुलचंद यांजपासून घेणें असतां त्याजपासून तुमचा गाहाण रोखा नंबर १ एकचा आम्हीं आपले लहन्यांत घेतले सबब नोटिस तुम्हांस दिली आहे तर हे रुपये तुम्ही पंधरा दिवसांत गणोबा इवसाजी बजाज तकझोलकर यास द्यावे. न दिल्हे तर तुम्हावर दिवाणींत दावा केला जाईल ता० २३ माहे आगष्ट सन १८७० इसवी

(सही) महादुसा जीवनसा पटवी बाळापूरकर.

## वऱ्हाड.

उमरावती पावसानें अगदी उघाडी दिली होती. आकाश अभ्रांनीं व्याप्त असतें, या मुळें गरमी फारच होत असते. पाहाटेस गार वारा सुटतो या वेळेस थंडीचें चिन्ह आहेत असें भासतें. गांवांत रोगराई म्हणण्या सारखी कांहीं नाहीं.

उमरावती व बडनेरा यांचे दरम्यान होणारे आगगाडी करितां जी जमीन पाहिजे आहे ती रयतेकडून घेऊन त्या बदल मोबदला देण्याची रकम ठरविण्याविषयीं तहशिलदारास हुकूम झाल्याचें कळतें.

येथील स्माल्काज कोर्टाचे जज मेजर मॅक्लीन यांचें लग्न तारीख १७ माहे आगष्ट सन मजकूर रोजीं बुधवारीं मि. फ्याड्री साहेब बुलढाण्याचे डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट यांचे बहिणीशीं झालें. या प्रसंगीं कर्नल बुषबी, क्यापटन मेकंझी, मि. फ्याड्री हे साहेब आले होते. सदर स्टेशन मधील व बाहेरून आलेले साहेब लोक या लग्नाचे गडबडींत व मनरंजनांत इतके गढून गेले होते कीं, बुधवारीं तर कोणीच अंमलदार कचेरींस आले नव्हते.

मिस्तर रसलनी मामालनी अ० क० हे रजेवर आहेत तों पर्यंत यांचे कामाचा चार्ज मिस्तर निकोलेट यांणीं घेऊन तें काम पहाण्यास लागले. स. म.

बुलढाणें (मित्राकडून) या जिल्ह्यांत मागील व नवीन आलेले मिळून च्यार मुकदमे मेहेरबान डि० कमिशनर साहेबांनीं सेशन कमिट केले होते त्याचे चौकशी करितां कमिशनर साहेब तारीख १४ आगस्ट १८७० रोजीं बुलढाण्यास येऊन तारीख १५ पासून सेशनास आरंभ झाला.

१. तारीख १५ रोजीं दोन खटल्याचा निकाल झाला. कैदी नारायण वलद दिपाजी राहणार मौजे खंडाळे ता० मेहेकर याणें सवा महिन्यामागें फिर्यादी कृष्णाजी माळी याचा आठ वर्षांचा मुलगा याचे अंगावरील चांदी सोन्याचे डागिने किंमत रुपये १९ चे काढून घेऊन त्या बिचारे मुलास एका ओहळांत पाण्यांत गाडून वर न दगड वगैरे दाबून दिले होते. दुसरे दिवशीं एक बैल चोरी करून डोणगांवचे बाजारांत विकण्यास गेला असतां तो ओळखला गेला त्या कारणानें नरसय्या हेड का० नें कैदीचा झाडा घेतला असतां सदरहु डागिने अंगरख्याचे खिशांत सांपडले याजवर अपराध साबित होऊन त्या तरुण वयाचे मुलास फाशीची शिक्षा सुनावली गेली. वाईट संगतींत बसण्याचा हा परिणाम आहे.

२. दुसरा मुकदमा येऊळघाट स्टेशनचे हद्दीतील मौजे टाकळी येथील गंगया चांभार यानें आपला जावाई चिमणा चांभार याजला रात्रीस निजल्या ठिकाणीं काठीनें मारून प्रेत जंगलांत टाकून दिलें असा होता. यांत पुरावा अगदीं पोकळ असल्या कारणानें हा म्हातारा चांभार कैदेंतून मुक्त झाला.

३. या मुकदम्यांत रामप्रताप, बुर्हाणदीन छोटूराम, आणि कालूराम हे चवघे मारवाडी शेट राहणार मौजे खरगडी यांजवर असा आरोप होता कीं, कैदी नंबर १ याचे बायकोला कैदी नंबर ३ | ४ यांचे आज्ञेवरून कैदी नंबर १ | २ यांणीं ती कलह करीत असल्यामुळें गांवांत एके विहिरींत टाकून दिलें या गोष्टीस तीन चार महिने झाले परंतु सात आठ साक्षिदार सांगत कीं, आमचे समोर तिजला रात्रीस विहिरींत टाकलें आहे. ह्या शेटजीनीं मुंबईहून मि० वारंट आटकिन्सन बारिस्टर बोलावून आणविलें होते आणि वऱ्हाडांतील प्रख्यात वकील मि० अमृतराव बाबाजी यांसही वकील दिलें होते ह्या मुकदम्यांत तर ह्या उभयतां गृहस्थांनीं यश मिळविलें म्हणजे सर्व कैदी निर्दोषी ठरून मुक्त झाले हा मुकदमा ता० १७ रोजीं चालून ता० १८ रोजीं खलास झाला.

४. नंतर ता० १८ रोजीं अकरा वाजे पासून प्रसिद्ध देऊळगांवचे मुकदम्याची शुरवात झाली ती ता० २० मिनहु रोजीं सर्व चौकशी पूर्ण झाली. यांत कैदी होते ते.—

१ रामचंद्रराव देसाई.
२ गोविंदराव देसाई
३ दामो नारायण वकील
४ नारायण शास्त्री.
५ विठ्ठलराव.
६ नारायण खंडेराव.
७ गणेशदास मारवाडी.

=

ह्यांतही बर किबिक्लेके बारिस्टर व पांडुरंग गोविंद वकील हे कैद्यांकडून आणि सरकाराकडून प्रासिक्युटर मि० अमृतराव आबाजी वकील हे काम चालवित होते. पुरावा उभय पक्षाकडून चांगला झाला आणि असेसर लोकांनीं गुन्हा शाबीत दिसत नाहीं असे अभिप्राय दिले. ज्या मुकदम्याकडेस लोकदोहींलोकांचे डोळ लागले होते त्या मुकदम्याचा शेवटी असाच ठरून मेहेरबान कमिशनर साहेब हे आकोटी आकोल्यास निघुन गेले आणि हुकुम देऊन गेले कीं सर्व कैदी आकोल्यास रवाना करावे त्याप्रमाणें मि० मुबारकअली इ० हे कैदीस घेऊन अकोल्यास येत आहेत. निकाल हुकुम होणाचा तो तेथेंच होईल याप्रमाणें हकीकत आहे.

आमगावची तहशील कचेरी ता० १ सपटेंबरपासून सुरू होणार. व तेथें रा० रा. सखाराम दत्तात्रय यांस तहशीलदार व रा० दामोदर गणेशयांस नायबतहशीलदार नेमलें.

जळगावचे तहशीलदार मिरबजीर अली यांचे पेनशनाविषयीं लिहुन गेलें होतें तें हुजूरुन पास होऊनें आलें.

रा. दुनिया सिंग पोलीस इन्स्पेक्टर यांस बुलढाण्याहून मेहकरास नेमिलें.

## अकोला

कमिशनर साहेबांनीं बुलढाणा सेशन पैकीं देऊळगावचा खुनी खटला अखेर निकाल सांगण्याकरितां एथें आणिला होता व सातकैदी पैकीं दोघांस काळे पाण्याच्या कैदेच्या शिक्षा दिल्या व पांचांस सोडुन दिलें याविषयीं पहिले पृष्ठ वर सविस्तर पहावें.

मि० हार्डन साहेब डिपुटीकमिशनर १० वे तारखेस बिलायतेस एक वर्षाचे रजेवर जाणार. व त्यांचे जाग्यावर मि० मेकंजी साहिब वाशिमचे येणार असें ऐकतों.

मि० हचिन्सन साहेब एथिल कायमचे डि० कमिशनर आकटोबर महिन्यांत परत येणार. यांनीं विलायतेस गेल्यावर आपला विवाह केला.

कमिशनर कोर्टांत रा० बाबणलाल रामलाल व सितारमल यांस असेसर नेमिले होतें ते वक्तशीर हजर झाले नाहींत म्हणून पहिल्यास १९ व दुसऱ्यास ५० रुपये दंड झाला.

या आठवड्यांत कमिशनर साहेबांची स्वारी सेशनाकरितां वाशिमास जाणार आहे.

कमिशनर साहेबांनीं जाहिरनामा काढिला आहे कीं कोर्ट फीचे आक्टाप्रमाणें दस्तैवज प्रतीचे कागदावर टिकिटें लाऊन आमचे कोर्टांत वकीलपत्रें नकला मिळण्याकरितां दाखल करितात तर तसें न करितां या जाहिरखबरेचे तारखेपासून पुढें जे कागद सदरील तिकीट लाऊन दाखल करणें ते सोंडे फुलिस्केप कागद असावे.

## नोटिसा

नोटिस—रामजी यशवंत पांडू सांगळे राहाणार मौजे मऊळके तालुके मेहेकर यांस देण्यांत येते कीं तुम्ही लावणी व गूळ दोन पल्ले आम्हास देऊ करून ३७॥ रुपये घेऊन गेला तो करारप्रमाणें अजून गूळ दिला नाहीं तरी ह्या नोटिशीनें कळवितों कीं तुम्हीं लिहून दिल्याप्रमाणें दोन पल्ले गूळ म्हणजे १६॥ मण गूळ आजपासून अगर नोटिस पोंचल्यापासून आठ दिवसांचे आंत बदरहु गूळ आणून द्यावा. आठ दिवसांचे आंत न दिल्यास दर मणास पाच रुपये प्रमाणें जो आकार होईल तो दोनोप्रचारचें व्याजानें ह्या नोटिसीचे खर्चासुद्धां फिर्याद करून भरुपये घेऊन आमचे रुपयांचा उलगडा होई पर्यंत तुमचे सोताचा माल वगैरे कागदास लिहून दिल्यास सारवर फिर्याद करून माल जप्त करू कळावें तारीख १९ माहे आगष्ट सन १८७० इ.

(सही) मनरूप पन्नालाल ब. खु.

---


## FOR SALE

A half bred Arabian Horse is to be sold at a cheap Price For Particulars apply to
Shricrishna Myral Clerk
Exec Engrs office Berar
Irrigation

## जाहिरात

विक्री साठीं

एक हाफ ब्रेड [अरबी घोडा व देशी घोडी यांनपासून पैदा झाला तो] आरबी घोडा स्वस्त किंमतींत विकावयाचा आहे त्यांची विशेष माहिती खाली सही करणाराकडे मिळेल.

(सही) श्रीकृष्ण मैराळ क्लार्क
इरिगेशनचे एक्सि. इंजि. आफिस
वऱ्हाड

## जाहिराती.

### संस्कृत आणि प्राकृत कोश.

ही नवीन "डिक्सनरी"यांत अमरकोश, त्रिकांडशेष, मेदिनी, हारावली, एकाक्षरी ह्या पांच कोशांतील संस्कृत शब्दास लिंग, अंत व प्राकृत अर्थ जितके होतात तितके लिहून अकारादि लिहिणारीनें तयार करून छापणें सुरू आहे. या कोशाची सर्वांस आवश्यकता असून विशेषें करून शाळाखात्यातील मास्तर व विद्यार्थी लोकांस फारच उपयोगी आहे. हें बुक चांगले जाडी कागदावर छापीत आहों. ज्यांस हें बुक पाहिजे असेल त्यांनीं माहे आक्टोबर सन १८७० इ० चे आंत पैसा पाठविल्यास एक प्रतीस रुपये ४ पडतील. बाहेरगांवचे घेणारे यांस डांक हाशील पडणार नाहीं. पैसा पाठविणें तो हुंडीनें अगर नोटीनें किंवा पोस्टाच्या तिकिटा पाठविणें झाल्यास दर रुपयास ८१ प्रमाणें वर्तावळा पाठविला पाहिजे. अर्ध टिकिटा ८८६ दराच्या पाठविल्यास वर्ताळ्याबद्दल दर रुपयास ८८१ पाठविल्यास हरकत नाहीं. हीं पुस्तकें थोडीं छापीत आहो यास्तव आमची भरती होई पावेतों ज्या लोकांकडून आगाऊ पैसा येईल त्यांस हीं बुकें मिळतील. भरती झाल्यावर उशिरानें पैसा येईल तो ज्यांचा त्यांस परत करूं यास्तव ज्यांस हें पुस्तक पाहिजे असेल त्यांणीं पैसा लवकर पाठवावयाची तजवीज ठेवावी.

पुणें, ता० १७ माहे आगष्ट सन १८७० } नारो आप्पाजी गडबोले.

## पद्यात्मक यशवंत चरित्र.

सर्वांस कळावें कीं, ज्यांचे अतितार्थ, भूतदया, सहनशीलता, परोपकार, धैर्य इत्यादि अनेक सद्गुणांची चहूंकडे सत्कीर्ति गाजत आहे असा लोकोत्तर पुण्यश्लोक पुरुष यशवंतराव महाराज भोंसेकर वर्ही मामलेदार तालुके बागलाण ठाणें सटाणें जिल्हा नासिक यांचे आम्ही पद्यात्मक वर्णन करून या ग्रंथास "पद्यात्मक यशवंत चरित्र" हें नांव दिलें आहे. यांत त्या सत्पुरुषाच्या स्वाभाविक स्थितीचें, वर्णन करावे आणि हेतूनुरूप घडून आलेल्या आश्चर्यकारक गोष्टीचे आर्या श्लोकादि कवितेच्या बहुतेक वृत्तांनी वर्णन लिहिले सद्गृहस्थांच्या उत्तेजनाश्रयाच्या उभारणीनें करून पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत सुंदर टाइपावर छापावयास दिलें आहे. हा ग्रंथ आगष्ट सन मजकुर महिन्यांत छपून तयार होईल. याची अष्टपत्री साच्याची पृष्ठें सुमारें पाउणशे पर्यंत (७५) होतील. व कागद जाडी असून मोबरेदार घातला आहे. याची किंमत सुलभ पडावी म्हणून आगाऊ बदरहु आगष्ट महिन्याचे आंत आश्रय देणारास प्रत्येक प्रतीस ८१० व मागाहून नेणारांस ८१२ आणे किंमत ठेविली आहे. मोठ मोठे महान् महान् सत्पुरुष म्हणजे (साधु) होऊन गेले, त्याच योग्यतेची प्रस्तुत या महीवर ही यशवंत विभूति असल्याचें सर्वत्र प्रसिद्ध असून या चरित्रांतील अनुभवजन्य कथन केलेल्या वर्णनावरून ही तसे विषयीं सर्वांची खात्री होईल.

या माझ्या परिश्रमाच्या साफल्यास खालीं लिहिल्या ठिकाणीं "ज्यांच्या त्यांच्या सोयी प्रमाणें" सर्वांकडून उदार आश्रय मिळेल ही पूर्ण आशा आहे.

पुणें—ज्ञानप्रकाशचे म्यानेजर यांजकडे.

मुंबई—रा. रा. महादेव चिमणाजी आपटे बी. ए. श्रीमंत जगन्नाथ शंकर शेट यांच्या इंग्लिश स्कुलचे हेडमास्तर यांजकडे.

नगर—रा. रा सदाशिव यशवंत गोडबोले डेप्युटी रजिस्ट्रार यांजकडे.

संगमनेर—ता० व० जिल्हा अहमदनगर रा. रा. गोविंद शंकर पिंपळनेरकर वकील कोर्ट मजकूर यांजकडे.

पंढरपूर—रा. रा. गोविंद विनायक रिसबूड म्युनिसिपालिटी कडील सेक्रेटरी यांजकडे.

नाशिक—रा. रा. रामचंद्र बल्लाळ पटवर्धन मुजूमदार वस्ती पेठ आदितवार यांजकडे.

धुळें—खालीं सही करणार मालक यांजकडे.

शिरपूर—जिल्हा खानदेश येथें रा. रा. पुरुषोत्तम नारायण मानकर यांजकडे.

सदरी सांगितल्या ठिकाणीं रोख किंमत अगर वर्तावळ्यासुद्धां टिकिटें पोष्ट पेड पत्रांनीं पाठवाव्या म्हणजे त्यां त्यांस उपाक मार्गें मुदतशीर पुस्तकें पाठविलीं जातील.

ता० २८ मे सन १८७०

केशव सदाशिव
रिसबूड.
संगमनेरकर.
ट्रेनिंग मास्तर तालुका स्कूल धुळें
जिल्हा खानदेश.


---

## जाहिरात.

किंमतीचे ठराव.

वर्षाची आगाऊ देणारास ... ६
साल अखेर ... .. ...७
सहा महिन्याची आगाऊ ... ..१ ८
एक अंकास ९

या शहरा बाहेरील लोकांस वर्षाचे १२ आणे टपालखर्चाबद्दल ज्यास्त आगाऊ पडेल तो ६ रु. ४ आणे व साल अखेर ७ रु० ८ आणे.

☞ आगाऊ पैसा देण्याची मुदत पत्र येण्याचे सुरू तारखेपासून १ महिनेपर्यंत समजावी. व जुने वर्गणीदारांसही आजपर्यंतचा मागील हिशेब करून नवें साल चालू होतें तेथून १ महिन्याची मुदत समजावी

जाहिरात वगैरे छापण्याचे दर.

१० ओळी पर्यंत ... ... ... १ रुपया
१० ओळींवर प्रत्येक ओळीस ८१८
इंग्लिश नोटिसीचे दर ओळीस ८४

एकच मजकूर वारंवार छापणें असल्यास दर ओळीस एक आण्याप्रमाणें किंमत पडेल.

TO OUR SUBSCRIBERS.

We beg to request that our Subscribers will forward as soon as possible their subscriptions for the present year; and trust that they will be so good as to pay up all arrears without delay.

*Proprietors of Berar Samachar*

सूचना—नोटिसा व इतर मजकूर छापण्यास पाठविणारांनीं ते बाळबोध लिहिल्यास फार चांगलें. निदान मनुष्यांचीं व गावांचीं नावें तरी बाळबोध असावीं. तसें नसून नोटिसांचे वगैरे कामी नावागावांची चूक झाल्यास त्याची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

एडिटर व० स०

## वर्गणीदारांस विनंती.

सन १८६७ चे अकटोबर महिन्यांत आम्ही अकोल्यास वऱ्हाडसमाचारपत्र सुरू केलें त्यास अदीच वर्ष होऊन गेलें तर अजून वसूल न दिलेल्या आमच्या प्रिय वर्गणीदारांनीं आपला वसूल या महिन्यांत सत्वर पाठवून आम्हांस मदत करावी. उशीर लावून त्या योगें वारंवार पत्रें लिहिण्याची तसदी आम्हांस देऊं नये व आपणास घेऊं नये, याकरितां नम्रतेनें आमची त्यांस ही विनंती आहे. व हि मान्य करणारांचे आम्ही उपकार मानूं

वऱ्हाडसमाचाराचे मालक

वऱ्हाडसमाचार वर्तमानपत्र घेण्याचें बंद करून ज्या लोकांनीं आजपर्यंतची मागील गुदस्त गेल्यासाला बद्दलची बाकी येणें असलेली पाठविली नाहीं त्यांस कळावें कीं, दरमहा दररुपयास अर्धा आणा प्रमाणें त्यांस व्याज द्यावें लागेल. ता ९ माहे आक्टोबर सन १८६८

वऱ्हाडसमाचाराचे मालक

हें पत्र अकोला येथें वऱ्हाडसमाचार छापखान्यांत मालकांकरितां ग. म. फडके